




# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, ■ बुधवार १५ एप्रिल २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठे १०








# मुलींचे अश्लील व्हिडिओ व्हायरल करणारा गजाआड

## ३५० अश्लील व्हिडीओ व्हायरल; राज्यभरात खळबळ

### -आरोपीला २१ एप्रिल पर्यंत पीसीआर

**अमरावती/प्रतिनिधीः-** समाज माध्यमांद्वारे अल्पवयीन मुलींशी जवळीक साधून त्यांची अश्लील छायाचित्रे आणि व्हिडिओ प्रसारित करणाऱ्या एका १९ वर्षीय तरूणाला परतवाडा पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. अयान अहमद तन्वीर अहमद असे या संशयित आरोपीचे नाव असून त्याच्यावर 'पोक्सो'सह माहिती तंत्रज्ञान कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात १८० हून अधिक मुलींचे व्हिडिओ प्रसारीत करण्यात आल्याचा दावा करण्यात आल्याने या प्रकरणाचे गांभीर्य वाढले आहे. परतवाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत काही मुलींचे आणि एका तरूणाचे आक्षेपार्ह व्हिडीओ आणि छायाचित्रे समाज माध्यमांवर प्रसारित होत असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली होती. पोलीस अधीक्षक कार्यालयाने दिलेल्या माहितीनुसार आरोपी अयान अहमद याने विविध मुलींशी ओळख वाढवून त्यांच्या इच्छेविरूद्ध अश्लील चित्रीकरण केले आणि ते फोटो-व्हिडीओ समाज माध्यमांवर प्रसारित करून त्यांची बदनामी करण्याचा प्रयत्न केला. आरोपीला अटक केल्यानंतर अचलपूर न्यायालयात दाखल करण्यात आले. जिथे न्यायालयाने त्याला ७ दिवस म्हणजे २१ एप्रिल पर्यंत पीसीआर दिला आहे. या दरम्यान त्याच्याकडून आणखी काही माहिती पुढे येणार असल्याची शक्यता आहे.





### आरोपी एमआयएमचा पदाधिकारी

मुलींच्या लैंगिक अत्याचाराच्या प्रकरणातील मुख्य आरोपी एमआयएम पक्षाचा पदाधिकारी आहे. एमआयएमचे शहराध्यक्ष हाजी इरफान खान यांच्याकडून नियुक्तीपत्र स्वीकारताना अयान अहमदचे व्हिडिओ आणि फोटो आता समोर आले आहेत. अयानने गेल्या महापालिका निवडणुकीवेळी बडनेरा येथे झालेल्या असदुद्दीन ओवीसी यांच्या सभेच्या स्टेजवर उपस्थित राहून रिल्स शूट केल्याचेही समोर आले आहे. आरोपी अयानच्या इंस्टाग्रामवर या संदर्भातील व्हिडिओ पोस्ट करण्यात आले होते. मात्र सध्या ते डिलिट केल्याचं निदर्शनास आले आहे.

### पीडित मुली या अल्पवयीन-

प्राथमिक तपासात पीडित मुली या अल्पवयीन असल्याचे समोर आले आहे. या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून पोलीस अंमलदार निलेश काळे यांच्या तक्रारीवरून परतवाडा पोलिसांनी आरोपी विरूद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतले असून त्याचा मोबाईल जप्त करण्यात आला आहे.

**पीडितांना तक्रारीसाठी समोर येण्याचे आवाहन-** बदनामीच्या भीतीपोटी अद्याप कोणतीही पीडित मुलगी किंवा तिचे पालक तक्रार देण्यासाठी पुढे आलेले नाहीत. या पार्श्वभूमीवर अमरावती ग्रामीण पोलिसांनी पीडित कुटुंबीयांना सहकार्याचे आवाहन केले आहे. पीडित मुलींची ओळख पूर्णपणे गोपनीय ठेवली जाईल. त्यांना समुपदेशनासह सर्व कायदेशीर मदत दिली जाईल, तरी अशा प्रवृत्तींना शिक्षा होण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन पोलीस अधीक्षक कार्यालयातर्फे करण्यात आले आहे. नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेऊ नये आणि समाज माध्यमांवरील आक्षेपार्ह पोस्टला प्रतिसाद देऊ नये, असेही पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

### अमरावती प्रकरण गंभीर, दोषींना कठोर शिक्षा होणार -महसूल मंत्री बावनकुळे

नागपूर : अमरावतीतील महिला अत्याचार प्रकरण अत्यंत गंभीर असून त्यातील दोषींना कठोरात कठोर शिक्षा दिली जाणार असल्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले. महसूलमंत्री तथा नागपूर आणि अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नागपूर येथे प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. अमरावती प्रकरणाबाबत बोलताना बावनकुळे म्हणाले, हे प्रकरण समोर आल्यानंतर पोलिसांशी तातडीने चर्चा करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या घटनेची दखल घेतली आहे. स्थानिक लोकप्रतिनिधींनी पुरावे पोलिसांकडे सादर केले असून सखोल चौकशी सुरू आहे. हा अत्यंत संवेदनशील आणि गंभीर विषय असून सरकार याकडे पूर्ण गांभीर्याने पाहत आहे.

**३५० व्हिडिओ केले वायरल-** आरोपी अयान अहमदने अनेक तरूणींना प्रेमाच्या जाळ्यात ओढले. त्यांना फसवून ब्लॅकमेल केले. त्यांच्यावर लैंगिक अत्याचार केला. त्याने १८० तरुणींचे लैंगिक शोषण केले. ३५० व्हिडिओ व्हायरल केल्याचा आरोप भाजपचे खासदार अनिल बोंडे यांनी केला. भोंदू खरातनंतर या प्रकरणाने राज्यात खळबळ उडवून दिली आहे. आरोपीचा मोबाईल ताब्यात घेऊन, तपासाला सुरुवात केली आहे. अनेक धक्कादायक अश्लील व्हिडियो त्याच्या मोबाईलमध्ये असल्याची माहिती सुत्रांनी दिलेली आहे. आरोपीने हे व्हिडिओ इतर मित्रांना पाठवले का याचाही शोध पोलीस घेत आहे.

> पीडित महिलांनी तक्रारीसाठी पुढे यावं. सायबरकडून माहिती घेतली जात आहे. पीडित महिलांची ओळख गुप्त ठेवली जाईल. आम्ही हेल्पलाईन नंबर दिले आहे. पालकांनी भीती न बाळगता समोर यावं. तक्रारदारांपैकी कोणाचेही नाव समोर येणार नाही.
>
> **-सुरेश मस्के,** पोलीस निरीक्षक, परतवाडा

**मोबाईलमध्ये मिळाले ८ तरुणी सोबत व्हिडिओ**

आरोपी अयान अहमदचा मोबाईल पोलिसांनी ताब्यात घेतला. आरोपीच्या मोबाईलमध्ये त्याचे ७ ते ८ तरुणी सोबत फोटो आणि व्हिडिओ आहेत. हे अश्लील व्हिडिओ आरोपीने व्हायरल केले की त्याच्या मित्राने व्हायरल केले हे तपासातून समोर येणार आहे. आज दुपारी आरोपी अयान अहमद याला अचलपूर येथील ☞(पान २ वर)

# लोकसभा सदस्य संख्या ८५० वर जाणार!

## केंद्र सरकार मतदारसंघ पुनर्रचनेसह ३ विधेयके आणण्याच्या तयारीत

**नवी दिल्ली,/वृत्तसेवाः** केंद्र सरकार लोकसभा आणि विधानसभेच्या जागांची पुनर्रचना करण्यासाठी आणि महिला आरक्षण लागू करण्यासाठी तीन महत्त्वाची विधेयके आणण्याच्या तयारीत आहे. या विधेयकांमध्ये घटनादुरुस्ती, मतदारसंघांची पुनर्रचना आणि केंद्रशासित प्रदेशांशी संबंधित कायद्यांमधील बदलांचा समावेश आहे. ही विधेयके १६ एप्रिलपासून सुरू होणाऱ्या संसदेच्या विशेष अधिवेशनात सादर केली जातील. सरकारने या विधेयकांच्या प्रती खासदारांना पाठवल्या आहेत.

या प्रस्तावित संविधान (१३१ वी दुरुस्ती) विधेयकाद्वारे लोकसभेच्या जागांची कमाल संख्या ८५० पर्यंत वाढवण्याचा प्रयत्न आहे. यामध्ये लोकसभेच्या एकूण जागांची संख्या ८५० पर्यंत वाढवण्याची तरतूद आहे. ८१५ जागा राज्यांसाठी आणि ३५ जागा केंद्रशासित प्रदेशांसाठी राखीव असतील. यामुळे



लोकसंख्येच्या आधारावर जागांचे पुनर्वितरण आणि सीमांकन आयोगाद्वारे नवीन सीमा निश्चित करण्याचा मार्ग मोकळा होईल. सध्या लोकसभेच्या जागांची कमाल संख्या ५५२ आहे, ज्यामध्ये दोन अँग्लो-इंडियन जागांचा समावेश आहे.

महिला आरक्षण लागू करण्याचे सरकारचे मुख्य उद्दिष्ट जनगणना आणि मतदारसंघ पुनर्रचना प्रक्रियेशी संबंधित असल्यामुळे प्रलंबित असलेले महिला आरक्षण लागू करणे, हे सरकारचे मुख्य उद्दिष्ट आहे. नवीन तरतुदींनुसार, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींमधील महिलांसह, अंदाजे एक-तृतीयांश जागा महिलांसाठी राखीव ठेवल्या जातील. मतदारसंघ पुनर्रचना विधेयक, २०२६ नुसार, मतदारसंघ पुनर्रचना आयोगाला नवीनतम प्रकाशित जनगणनेच्या आधारे जागा आणि मतदारसंघांची पुनर्रचना करणे बंधनकारक असेल. याचा अर्थ असा की, मतदारसंघ पुनर्रचना २०११ च्या जनगणनेवर आधारित असेल.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्व राजकीय पक्षांना या विधेयकाला पाठिंबा देण्याचे आवाहन केले आहे. डेहराडून येथील एका कार्यक्रमात बोलताना ते म्हणाले की, चार दशकांच्या प्रदीर्घ प्रतीक्षे☞(पान २ वर)

## इश मोदी आणि ट्रम्प यांच्यात फोनवरून चर्चा

**नवी दिल्ली :** मध्य पूर्व आशियात शांतता प्रस्थापित करण्यासाठी अमेरिका आणि इराण यांच्यात झालेल्या युद्धबंदीच्या करारानंतर, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यात पहिली दूरध्वनी चर्चा पार पडली. सुमारे ४०



मिनिटे चाललेल्या या संभाषणात दोन्ही नेत्यांनी जागतिक आणि द्विपक्षीय मुद्द्यांवर सविस्तर चर्चा केली. या संवादानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक?सवर केलेल?या पोस?टमध?ये म?हटलं की, माझे मित्र, राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा मला फोन आला. विविध क्षेत्रांमध्ये आमच्या द्विपक्षीय सहकार्यात साध्य झालेल्या महत्त्वपूर्ण प्रगतीचा आम्ही आढावा घेतला. सर्वच क्षेत्रांमध्ये आमची 'सर्वसमावेशक जागतिक सामरिक भागीदारी' अधिक बळकट करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. आम्ही पश्चिम आशियातील परिस्थितीवरही चर्चा केली आणि 'हॉर्मुझची सामुद्रधुनी' खुली व सुरक्षित ठेवण्याच्या महत्त्वावर भर दिला. भारतातील अमेरिकेचे दूत सर्जियो गोर यांनी सांगितले की, 'या संभाषणादरम्यान इराणमधील युद्ध परिस्थिती आणि दोन्ही देशांमधील व्यापार या प्रमुख विषयांवर चर्चा करण्यात आली.' या संवादादरम्यान☞(पान २ वर)

## पाण्याचा शेतकऱ्यांना प्रत्यक्ष लाभ मिळायला हवाः नितीन गडकरी

**नागपूर /वृत्तसंस्था-:** केवळ सिंचनाच्या सुविधा उभारणे पुरेसे नाही, तर त्या पाण्याचा शेतकऱ्यांना प्रत्यक्ष कसा लाभ होईल यावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. यासाठी 'इंटिग्रेटेड' (समग्र) अभ्यासावर आधारित नियोजनाची गरज अधोरेखित कोणतेही काम शेवटच्या घटकापर्यंत पोहोचले पाहिजे याचा विचार करा, असे आवाहन केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केले. गोसेखुर्द प्रकल्पांतर्गत



कार्यरत पाणी वापर संस्था, लाभार्थी शेतकरी तसेच सिंचन, कृषी विभाग आणि नाबार्डच्या अधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण आढावा बैठक गडकरी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीत प्रकल्पाच्या प्रगतीचा आढावा घेताना पाण्याच्या प्रभावी वापरातून शेती उत्पादन वाढवणे आणि ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत करण्यावर विशेष भर देण्यात आला. ☞(पान २ वर)

## सम्राट चौधरी होणार बिहारचे नवे मुख्यमंत्री

**भाजप विधिमंडळ नेतेपदी एकमताने निवड**

**पाटणा /वृत्तसंस्था-:** नितीश कुमारांनी आज (दि. १४) मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिला. यानंतर भाजप आमदारांच्य विधिमंडळ नेतेपदी सम्राट चौधरी यांची एकमताने निवड झाली आहे. त्यामुळे आता सम्राट चौधरी हे बिहारचे पुढचे मुख्यमंत्री असतील, हे स्पष्ट झाले आहे.

पाटणा येथे केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांच्या प्रमुख उपस्थितीत भाजप विधिमंडळ पक्षाची महत्त्वपूर्ण



बैठक पार पडली. या बैठकीत विजय सिन्हा, मंगल पांडे आणि दिलीप जायसवाल यांनी भाजप आमदार दल नेतेपदासाठी सम्राट चौधरी यांच्या नावाचा प्रस्ताव मांडला, ज्याला उपस्थित आमदारांनी उत्स्फूर्त अनुमोदन दिले.


मिळालेल्या माहितीनुसार, सम्राट चौधरी थोड्याच वेळात राज्यपाल लेफ्टिनेंट जनरल (निवृत्त) सय्यद अता हसनैन यांची भेट घेणार आहेत. या भेटीत ते राज्यपालांकडे सत्तास्थापनेचा दावा सादर करतील. सम्राट चौधरी यांच्या या निवडीमुळे बिहारच्या राजकारणात आता नव्या पर्वाला सुरुवात होणार आहे.

दोन वेळा उपमुख्यमंत्री राहिलेले सम्राट चौधरी हे बिहारचे नवे मुख्यमंत्री बनण्यास सज्ज आहेत. भाजपमधील विश्वसनीय सूत्रांनुसार, सम्राट चौधरी हेच बिहारचे पुढील मुख्यमंत्री असतील. नितीश कुमार यांचीही सम्राट चौधरी यांची मुख्यमंत्रीपदी नियुक्ती व्हावी, अशी इच्छा होती. नितीश कुमार यांच्या आग्रहास्तवच भाजपच्या पक्षश्रेष्ठींनी सम्राट चौधरी यांच्या नावाला अंतिम मंजुरी दिल्याची चर्चा बिहारच्या राजकारणात रंगली आहे.

सम्राट चौधरी यांना राजकारणाचे बाळकडू घरातूनच मिळाले. त्यांचे वडील शकुनी चौधरी हे तारापूर मतदारसंघातून सहावेळा आमदार म्हणून निवडून आले होते, तर त्यांच्या मातोश्री पार्वती देवी यांनीही विधिमंडळात लोकप्रतिनिधा☞(पान २ वर)

## शेतकऱ्याने मृत्युला कवटाळले, नातेवाईक पोस्टमार्टमसाठी दोन तास ताटकळले

**बोरखेड /वृत्तसंस्था-**५२ वर्षीय शेतकरी लक्ष्मण भानुदास क्षीरसागर यांनी कर्जबाजारीपणाला कंटाळून आत्महत्या केली. मंगळवारी (१४ एप्रिल) दुपारी २ वाजेच्या सुमारास त्यांनी स्वतःच्या शेतात गळफास घेऊन आयुष्य संपवले. बीड तालुक्यातील बोरखेड येथे ही घटना घडली. त्यांचा मृतदेह लिंबागणेश प्राथमिक आरोग्य



केंद्रात नेण्यात आला, पण नातेवाईकांना शवविच्छेदनासाठी दोन तास ताटकळत उभे राहावे लागले. लक्ष्मण क्षीरसागर यांच्यावर कर्ज होते अशी माहिती मिळाली. कर्जामुळे ते गेल्या काही दिवसांपासून विवंचनेत होते. मंगळवारी दुपारी त्यांनी शेतातील लिंबाच्या झाडाला गळफास घेतला. घटनेची माहिती मिळताच लिंबागणेश पोलीस ठाण्याचे कर्मचारी गणेश परझने, मन्सूर शेख व अविनाश घुंगरड यांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला ☞(पान २ वर)




# जाती - धर्माचा विचार न करता नराधम म्हणून शिक्षा व्हावी

## मुस्लिम संघटना आक्रमक, अयानच्या साथीदारांचा शोध घेण्याची मागणी



**अचलपूर/ प्रतिनिधी**

अचलपूर-परतवाडा जुळ्या शहरासह अमरावतीतील अल्पवयीन मुलींसोबत अश्विल कृत्य करणाऱ्या अयान याच्या सोबत असणाऱ्या साथीदारांचा शोध घेऊन कठोर कारवाई करण्याची मागणी मुस्लिम संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. अयान ने केलेले हे कृत्य समाजासाठी घातक आहे. प्रत्येक समाजातील नागरिकांनी एकत्रीत येऊन पुन्हा असा अयान जन्माला येणार नाही याकरीता भर चौकात कठोर शिक्षा देण्याची मागणी मुस्लिम संघटनेच्या वतीने अचलपूर उपविभागीय अधिकारी , उपविभागीय पोलिस अधिकारी शुभम कुमार यांना दिलेल्या निवेदनातून करण्यात आली आहे . या प्रकरणाची एसआयटी करून चौकशी करण्यात यावी अशी मागणी सुद्धा यावेळी करण्यात आली. अचलपूर शहराचे काजी ग्यासूद्दीन यांच्या नेतृत्वात निवेदन देण्यात आले. या प्रकरणी गावातील निरागस मुलींचे अश्विल व्हिडओं व्हायरल करणाऱ्यांचा शोध घेऊन कारवाई करण्यात यावी.

गरज पडल्यास अशा लोकांना कठोर शिक्षा व्हावी असे प्रावधान करावे. शहरात होत असलेला हा प्रकार गंभीर आहे. जाती धर्माचा विचार न करता नराधम म्हणून शिक्षा व्हावी अशी मागणी यावेळी मुस्लिम संघटनेच्या वतीने करण्यात आली.

# श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात



**अमरावती/ प्रतिनिधी**


श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयामध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकर व डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष गावंडे यांनी आपल्या विस्तृत मनोगतात सांगितले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार तसेच एक महान विचारवंत, समाजसुधारक, अर्थतज्ज्ञ व शिक्षणप्रेमी होते. त्यांनी समाजातील अन्याय, विषमता आणि अस्पृश्यता दूर करण्यासाठी आयुष्यभर संघर्ष केला. 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा त्यांचा संदेश आजही प्रत्येकासाठी प्रेरणादायी आहे.तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार हे केवळ इतिहासापुरते मर्यादित नसून आजच्या आधुनिक समाजासाठीही ते तितकेच मार्गदर्शक आहेत, असे त्यांनी याप्रसंगी नमूद केले.

सदर कार्यक्रमास आय.क्यू.ए.सी. समन्वयक डॉ. पुष्पलता देशमुख सह महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन डॉ.सुशांत कुकडे यांनी केले.

# सावंगा विठोबा नगरीत अमावस्या निमित्त चंदन उटी उत्सव

## कापुराच्या अवधूत नगरीत पुन्हा एक भक्तीपूर्ण पर्वणी!



**चांदुर रेल्वे:-** अमरावती जिल्ह्यातील चांदुर रेल्वे तालुक्यात प्रसिद्ध असलेले तीर्थक्षेत्र कापुराची यात्रा म्हणून नावलौकिक असलेली अवधूत नगरी श्री क्षेत्र सावंगा (विठोबा) येथील श्री विठोबा संस्थान उर्फ श्रीकृष्ण अवधूत बुवा संस्थानच्या वतीने नुकताच गुढीपाडवा रामनवमी यात्रा महोत्सव संस्थानच्या सुयोग्य नियोजनात मोठ्या उत्साहात पार पडला. लाखों संख्येने भाविकांनी दर्शन घेऊन शेकडो क्विंटल कापुर जाळून आपल्या मनोकामना अवधूत चरणी मांडल्या.

यात्रा महोत्सवानंतर येथे दिनांक १७ एप्रिल २०२६, शुक्रवारला दुपारी ४.३० वाजता चंदन उटी उत्सव आयोजित केला आहे.

याप्रसंगी संस्थानचे विश्वस्त मंडळ व स्थानिक तसेच बाहेरगावच्या भाविक भक्तांची उपस्थिती राहणार आहे.

चैत्र अमावस्या निमित्त संस्थानच्या वतीने 'चंदन-उटी' उत्सवाचे आयोजन करण्यात आले असून, यानंतर बाहेरगावाहून येणाऱ्या भाविकांसाठी 'महाप्रसाद' (अन्नदान) कार्यक्रम होणार आहे. हा महाप्रसाद कार्यक्रम अन्नदान दाते प्रज्वल राजू काळे रा.हरसूल जि.यवतमाळ यांच्या वतीने व संस्थानच्या अन्नदान समितीच्या नियोजनात होणार आहे.

या वर्षी संस्थानचे वतीने अधिक मास निमित्त भजन मांडीचे आयोजन करण्यात येत आहे, तरी या भजन मांडीत बाहेर गावातील अवधूत भजन मंडळांनी सहभागी व्हावे, असे आवाहन संस्थान तर्फे करण्यात आले आहे.

सर्व भाविक भक्तांनी तन, मन आणि धनाने सहकार्य करून या पवित्र कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थानचे अध्यक्ष पुंजाराम नेमाडे, उपाध्यक्ष कृपासागर राऊत, सचिव अशोक सोनवाल सर्व विश्वस्त विनायक पाटील, गोविंद राठोड, फुलसिंग राठोड, चरणदास कांडलकर, प्रविण कुकडकर, लक्ष्मण राठोड, वैभव मानकर, स्वप्नील चौधरी समस्त विश्वस्त मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# तिवसा तालुक्यात वर्धा नदीपात्रातून वाळूचे अवैध उत्खनन

**तिवसा/ प्रतिनिधी**

तालुक्यातील अनेक वाळू घाटांचे लिलाव शासकीय प्रक्रिया पार पाडून पूर्णत्वास झाले असले तरी ज्या नियम व अटी घाट धारकांना देण्यात आल्या आहे त्याचे काही ठिकाणी पालन करण्यात येत नसल्याचे गेल्या काही दिवसांपासून दिसून येत आहे. काही नदीपात्रात तर अवैधरित्या उत्खनन होत असल्याचा प्रकार समोर येत आहे.आता या गैरप्रकारावर महसूल विभाग कारवाईसाठी समोर येईल का,याकडे जनतेचे लक्ष लागले आहे.

तिवसा तालुक्यात जावरा, फत्तेपुर, इसापुर, नमस्कारी ,चांदुर ढोरे, धामंत्री असे अनेक वाळू घाट आहेत.या घाटांपैकी काहींचे रीतसर लिलाव देखील झाले आहे मात्र यापैकी काही घाटात नियमबाह्य प्रकार घडत आहे.काही ठिकाणी खुलेआम पोकलॅन्डच्या साहाय्याने, डोंग्याच्या साहाय्याने नदीपात्र पोखरून वाळू काढण्यात येत आहे.जे पर्यावरणाच्या दृष्टीने हानिकारक असून मशीनच्या साहाय्याने कुठल्याही प्रकारची वाळू काढण्याची परवानगी नसतांना महसूल विभागाला अंधारात ठेवून हा प्रकार होत आहे.संपूर्ण तिवसा तालुक्यात अवैध वाळू उत्खननाबाबत चर्चा सुरू असून देखील त्यादिशेने कारवाईसाठी संबंधित विभाग पुढाकार का घेत नाही,हा प्रश्न निर्माण झाला आहे.



तर दुसरीकडे रात्रीच्या अंधारात क्षमतेपेक्षा अधिक वाळू ट्रकमध्ये भरून वाहतूक केल्या जात आहे.

असे असतांना वाळूच्या ट्रकांची साधी चौकशी देखील हायवेवर गस्तीवर असलेल्या पोलीस प्रशासन, वाहतूक पोलीस,आरटीओ यांच्याकडून का केल्या जात नाही,असा प्रश्न निर्माण झाला आहे.

**महसूल व पोलीस यांचा संयुक्त चेकपोस्ट असावा**

घाटातून होणारी वाहतूक नियमानुसार होतेय का किंवा ईतर हद्दीतील वाहने आपल्या हद्दीत येतेय का, वाळूच्या वाहनाकडे त्याबाबत रॉयल्टी आहे का,असेल तर रॉयल्टीवरील वाळू व वाहनातील वाळू किती ब्रास आहे, याची चौकशी करण्यासाठी पोलीस व महसूल विभागाकडून हायवेवर संयुक्त चेक पोस्ट उभारणी करणे गरजेचे असल्याचे बोलल्या जात आहे.

---

वाळूच्या वाहनांना रात्री देखील वाहतुक करण्याची परवानगी दिली आहे.मात्र ती नियमात असावी, रॉयल्टीपेक्षा जास्त वाळू वाहनात नसावी ही अट दिली आहे.मात्र क्षमतेपेक्षा अधिक वाळू वाहतूक होत असेल तर निश्चितपणे चौकशी करून कारवाई करू.

**मयुर कळसे** तहसीलदार, तिवसा.

# माकप तर्फे डॉ . बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी

**तिवसा/ प्रतिनिधी**

मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टी तर्फे रामचंद्र घंगारे भवन तिवसा येथे डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती साजरी करण्यात आली . या प्रसंगी साहित्यीक ईब्राहीम खान यांचे हस्ते बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रतीमेस पुष्पहार अर्पन करुन अभीवादन करण्यात आले . या



प्रसंगी डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार व आजची देशाअंतर्गत परीस्थीती यावर माकप तालुका सचीव दिलीप शापामोहन यांनी विचार मांडले. या प्रसंगी माकपच्या मोहीनी शापामोहन, विठोबा लोणारे, सुनील तायडे , महादेव गारपवार , अजय गारपवार ईत्यादी कार्यकर्ते मोठ्या संख्येने हजर होते . आभार प्रदर्शन शोभा गोंडाने यांनी केले.

## पेज १ वरून...

**मुलींचे अश्लील व्हिडिओ व्हायरल....**

न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने त्याला सात दिवसांची २१ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. पोलिसांनी आरोपीचा मोबाईल जप्त केला असून त्याचा तपास सुरू करण्यात आला आहे. या प्रकरणात सायबर विभागाने समाज माध्यमांवरील प्रसारित व्हिडिओ, फोटो हटविण्याचे काम सुरू केले आहे. ज्यांनी हे व्हिडिओ डाउनलोड केले, त्यांच्याकडून ते पुन्हा समाज माध्यमांवर प्रसारित होण्याचा धोका आहे. पोलीस अशा पोस्टवर नजर ठेवून आहे, अशी माहिती ग्रामीण पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी दिली आहे.

**लोकसभा सदस्य संख्या ८५० वर ....**

नंतर संसदेने महिला आरक्षण कायदा मंजूर केला असून, त्यामुळे लोकसभा आणि राज्य विधानसभांमध्ये ३३ टक्के आरक्षणाचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यांनी यावर जोर दिला की, या कायद्याच्या अंमलबजावणीत आणखी विलंब होऊ नये आणि २०२९ पूर्वी त्याची अंमलबजावणी होणे ही देशाच्या 'महिला शक्ती'ची अपेक्षा आहे. विरोधी पक्षांचा मतदारसंघ पुनर्रचनेला तीव्र आक्षेप

दुसरीकडे, विरोधी पक्षांनी या प्रस्तावावर तीव्र आक्षेप घेतले आहेत. विरोधी पक्षांचा आरोप आहे की, मतदारसंघ पुनर्रचनेच्या प्रक्रियेमुळे दक्षिणेकडील राज्यांच्या प्रतिनिधित्वावर प्रतिकूल परिणाम होऊ शकतो. त्यांचा युक्तिवाद आहे की, लोकसंख्येच्या आधारावर जागांचे पुनर्वितरण केल्यास दक्षिण भारतीय राज्यांच्या जागा कमी होऊ शकतात. त?यामुळे त्यांचा राजकीय सहभाग कमी होईल. तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनी केंद्र सरकारवर राज्यांशी पुरेशी चर्चा न करता घटनादुरुस्ती लादल्याचा आरोप केला आहे.जर राज्याच्या हिताला धक्का पोहोचला किंवा दक्षिणेकडील राज्यांशी असमतोल निर्माण झाला, तर तामिळनाडूमध्ये व्यापक आंदोलन सुरू केले जाईल, असा इशाराही त?यांनी दिला आहे. जनगणनेपूर्वी मतदारसंघ पुनर्रचना प्रक्रिया घाईघाईने पार पाडण्याच्या पद्धतीवरही विरोधी पक्षाने प्रश्नचिन्ह उपस्थित केले असून, नवीन लोकसंख्येच्या आकडेवारीशिवाय जागांची पुनर्रचना करणे अन्यायकारक ठरेल, असा दावाही केला आहे.

**पेट्रोल १८ तर डिझेल ३५ रुपयांनी ...**

खात्यातील तुटीसाठीदेखील धोकादायक ठरत आहेत. २०२६ च्या पहिल्या तिमाहीपर्यंत ही तूट २० अब्ज डॉलर्सपर्यंत वाढू शकते असा अंदाज आहे. सरकारी महसुलात तेलावरील उत्पादन शुल्काचा वाटा सातत्याने कमी होत आहे. २०१७ च्या आर्थिक वर्षात ते २२इ होते आणि आता ते केवळ ८इ पर्यंत खाली आले आहे. सरकारने संपूर्ण उत्पादन शुल्क काढून टाकले तरी सध्याच्या किमतीनुसार तेल कंपन्यांचे नुकसान पूर्णपणे भरून निघणार नाही. ऑगस्ट २०२२ नंतर प्रथमच अमेरिकेत पेट्रोलची सरासरी किंमत प्रति गॅलन ४ डॉलरच्या वर गेली आहे. पाकिस्तान, नेपाळ आणि श्रीलंका यांसारख्या अनेक शेजारी देशांनीही पेट्रोल आणि डिझेलच्या किमती वाढवल्या आहेत.

**पाण्याचा शेतकऱ्यांना प्रत्यक्ष लाभ ....**

बैठकीस गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू प्रशांत बोकारे, जलसंपदा विभागाचे मुख्य अभियंता गवळी, पाटील, जलसंधारण विभाग नागपूरचे अप्पर आयुक्त तथा मुख्य अभियंता अनंत जगताप, साखरकर, जनकल्याणकारी समिती नागपूरचे अध्यक्ष सुमंत पुणतांबेकर, पाणी वापर संस्थांचे पदाधिकारी मिलिंद जोशी आणि राजेंद्र देशकर उपस्थित होते.गडकरी पुढे म्हणाले, केवळ सिंचनाच्या सुविधा उभारणे पुरेसे नाही, तर त्या पाण्याचा शेतकऱ्यांना प्रत्यक्ष कसा लाभ होईल यावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. 'उत्पादन आणि उत्पादकता वाढणे, सिंचन झालेल्या भागात रोजगारनिर्मिती होणे, छोटे उद्योग उभे राहणे आणि त्यातून ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ मिळणे, या सर्वांचा एकत्रित विचार करूनच नियोजन झाले पाहिजे.विदर्भात पावसावर अवलंबून असलेली शेती मोठ्या प्रमाणावर आहे. अनियमित पावसामुळे उत्पादनात चढ-उतार होत असल्याने शेतकऱ्यांना आर्थिक अनिश्चिततेला सामोरे जावे लागते. अशा परिस्थितीत गोसे खुर्दसारखे मोठे सिंचन प्रकल्प शेतकऱ्यांसाठी जीवनदायी ठरत आहेत. नियोजनबद्ध पाणीपुरवठा झाल्यास केवळ पिकांचे उत्पादनच वाढत नाही, तर पीक विविधीकरण, दुहेरी पिकपद्धती आणि प्रक्रिया उद्योगांना चालना मिळू शकते. असा विश्वास व्यक्त करण्यात आला. प्रास्ताविक मिलिंद जोशी यांनी केले.

**सम्राट चौधरी होणार बिहारचे ....**

म्हणून काम केले आहे. या राजकीय वारसामुळे सम्राट चौधरी यांचा राजकारणात अत्यंत कमी वयात प्रवेश झाला. त्यांनी १९९९ मध्ये राष्ट्रीय जनता दलातून (आरजेडी) आपल्या राजकीय कारकीर्दीला सुरुवात केली.

२०१७ मध्ये त्यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. भाजपने त्यांच्याकडे प्रदेश उपाध्यक्ष आणि त्यानंतर २०२३ मध्ये बिहार प्रदेशाध्यक्षपदाची जबाबदारी सोपवली होती. जानेवारी २०२४ मध्ये नितीश कुमार यांच्या नेतृत्वाखालील एनडीए (ॐ) सरकारमध्ये त्यांची उपमुख्यमंत्री म्हणून नियुक्ती करण्यात आली.जातीय समीकरणे महत्त्वाची ठरणाऱ्या बिहारच्या राजकारणात सम्राट चौधरी हे भाजपचा प्रमुख 'ओबीसी' चेहरा मानले जातात. पक्षाची रणनीती आखण्यात आणि संघटनात्मक बांधणी करण्यात त्यांचा मोठा वाटा आहे. आपल्या कुटुंबाचा बालेकिल्ला असलेल्या तारापूर सारख्या मतदारसंघांत त्यांनी आपली पकड मजबूत ठेवत तळागाळातील कार्यकर्त्यांशी संपर्क कायम ठेवला आहे.

**शेतकऱ्याने मृत्युला कवटाळले, नातेवाईक ....**

आणि मृतदेह शवविच्छेदनासाठी लिंबागणेश येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात पाठवला. मृतदेह आरोग्य केंद्रात आणल्यानंतर तिथे शवविच्छेदनासाठी आवश्यक साधनसामग्री आणि कर्मचारीच उपलब्ध नसल्याचे समोर आले. वैद्यकीय अधिकारी डॉ. ऋषिकेश आंधळे यांनी मृतदेह नेकनूर येथील ग्रामीण रुग्णालयात नेण्याचा सल्ला दिला.

या सर्व गोंधळात आणि कागदी प्रक्रियेत दोन तास विलंब झाल्याने मयताचे नातेवाईक रामदास क्षीरसागर, नवनाथ क्षीरसागर, दशरथ क्षीरसागर आणि सरपंच सुनील अनपट यांना प्रचंड मानसिक त्रास सहन करावा लागला.

## पेज १० वरून...

**पीएम मोदी आणि ट्रम्प यांच्यात ....**

पंतप्रधान मोदींनी ट्रम्प यांचे कौतुक करताना म्हटले की, 'भारतातील लोकांच्या मनात तुमच्याबद्दल मोठे प्रेमाचे स्थान आहे.' दरम्यान, २ फेब्रुवारी रोजी व्यापारी करारातील प्रगतीबाबत आणि २४ मार्च रोजी पश्चिम आशियातील स्थितीवर चर्चा केल्यानंतर, पंतप्रधान मोदी आणि राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्यात आता तिसऱ्यांदा दूरध्वनीवरून सविस्तर चर्चा झाली आहे.

**शांततेसाठी भारताचा पुढाकार....**

अमेरिकेचा इराणबरोबर संघर्ष सुरू झाल्यानंतर झालेल्या पहिल्या फोन कॉलमध्ये, पंतप्रधान मोदींनी पश्चिम आशियात लवकरात लवकर शांतता प्रस्थापित करण्याच्या गरजेवर भर दिला होता. विशेषतः जागतिक व्यापारासाठी महत्त्वाची असलेली 'हॉर्मुझची सामुद्रधुनी' (एँगू दं प्दीर्स्लै) सुरक्षित आणि खुली ठेवण्याबाबत त्यांनी चर्चा केली होती. या संवादाबाबत सोशल मीडियावर माहिती देताना पंतप्रधान म्हणाले होते की, 'पश्चिम आशियातील परिस्थितीवर राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्याशी उपयुक्त चर्चा झाली. तणाव कमी करून शांतता प्रस्थापित करण्यास भारताचा पाठिंबा आहे. हॉर्मुझची सामुद्रधुनी सुरक्षित राहणे संपूर्ण जगासाठी आवश्यक आहे.'

**महामानवाला अभिवादन करण्यासाठी ....**

हजारो भीमसैनिक डॉ.बाबासाहेबर आंबेडकर चौकात दाखल झाले. महिलांपासून तरुणांपर्यंत सर्व स्तरातील नागरिकांचा मोठा सहभाग दिसला. विविध सामाजिक संघटनाच्या वतीनेही महामानवाला अभिवादन करण्यात आले. सुरक्षेच्या दृष्टीने पोलिसांचा तगडा बंदोबस्त लावण्यात आला होता. डीसीपी गणेश शिंदे, एसीपी, कोतवालीचे ठाणेदार मनोहर कोटनाके यांच्या मार्गदर्शनात पोलीस कर्मचारी आणि एसआरपीएफची तुकडी तैनात होती. गर्दी नियंत्रणासाठी तसेच कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी विशेष काळजी घेण्यात येत होती.

**पुतळा सौंदर्यकरण समितीचा अभिवादन सोहळा....**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा सौंदर्यकरण समितीच्या वतीने सामूहिक अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात जीवनगौरव, जीवन संघर्ष आणि कर्तव्य पुरस्कार देऊन मान्यवरांना सन्मानित करण्यात आले. खासदार बळवंत वानखडे यांच्या अध्यक्षतेत झालेल्या कार्यक्रमामध्ये खासदार डॉ. अनिल बोंडे, आमदार सुलभा खोडके ,संजय खोडके, माजी मंत्री हर्षवर्धन देशमुख, डॉ. सुनील देशमुख, यशोमती ठाकूर, जिल्हाधिकारी आशिष येरेकर ,माजी महापौर विलास इंगोले, बबलू शेखावत, किशोर बोरकर, हरिभाऊ मोहोड, एड. दिलीप एडतकर, प्राचार्य गोपीचंद मेश्राम, एड. खडसे आदि उपस्थित होते. आंबेडकर जयंती निमित्त उत्साह, एकता आणि सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडले.

**परतवाडा प्रकरणातील आरोपीवर ......**

विरुद्ध कठोर कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली आहे. यावेळी मो. खालीद पैलवान, गुड्डू हमीद, असलम खान, मो. सोहेल, शे. शकील, नगरसेवक मो.मुजीब शेख रशीद, सै. मोसीन, रशीद भाई, शेख तनवीर, फरदीन हुसेन, शाहरुख, मोनीस अहमदसह इतर उपस्थित होते.

**अज्ञात वाहनाच्या धडकेत सायकल ....**

दाखल करण्यात आले, जिथे त्यांच्यावर उपचार सुरू आहे. गावातीलच गिरीश चौधरी व इतरांनी त्यांच्या घरी जाऊन अपघाताची माहिती दिली. यानंतर त्यांची पत्नी आणि मुलगा रुग्णालयात पोहोचले. पोलिसांनी पत्नी मीरा पारनेकर यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल केला आहे.

**भारत फायनान्स कंपनीच्या एजंटवरील ....**

दरम्यान मिळालेल्या माहितीच्या आधारे आरोपी रवि रामभाऊ वरठी (रा. ओंकारखेडा, नांदगाव खंडेश्वर) याला ताब्यात घेण्यात आले. सुरुवातीला त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली, मात्र कसून चौकशीत त्याने साथीदारांसह गुन्ह्याची कबुली दिली. त्यानंतर पोलिसांनी राज प्रशांत पेंदाम, विनय सुधाकर कोडवते, अनुप मनोहर सिडाम व प्रविण विजय गंगाधरे यांना अटक केली. तपासात उघड झाले की, आरोपी राज पेंदाम याचे भारत फायनान्स कंपनीत खाते असल्याने त्याला फिर्यादीची हालचाल व पैसे वाहून नेण्याची माहिती होती.

त्यानेच साथीदारांना माहिती देऊन कट रचला. तिघांनी फिर्यादीवर लक्ष ठेवले, तर इतरांनी पाठलाग करून हल्ला केला. पोलीसांनी आरोपींकडून ४०,१०० रुपये रोख, गुन्ह्यात वापरलेली हिरो स्प्लेंडर मोटारसायकल व ५ मोबाईल फोन असा एकूण १,६०,१०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. अटक आरोपींना पुढील तपासासाठी चांदूर रेल्वे पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले असून फरार आरोपीचा शोध सुरू आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किरण वानखडे यांच्या नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली.

जनमाध्यम
अकोला । वाशिम । बुलडाणा
■ बुधवार, १५ एप्रिल २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४
एक प्रतिष्ठित सवय
paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

# जिल्ह्यात ठिकठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात

### महापुरुषांना खरे अभिवादन म्हणजे त्यांच्या विचारांचे आचरण - जिल्हाधिकारी



**वाशिम :** महापुरुषांना खरे अभिवादन हे केवळ त्यांच्या पुतळ्यांना हार अर्पण करण्यात नसून, त्यांच्या विचारांचे आचरण आपल्या दैनंदिन जीवनात करण्यामध्ये आहे. त्यांच्या शिकवणुकीनुसार स्वतःमध्ये सकारात्मक बदल घडवून आणल्याशिवाय सामाजिक समता प्रस्थापित होऊ शकत नाही, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले. सामाजिक सप्ताहानिमित्त आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून परिविक्षाधीन अधिकारी आकाश वर्मा, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे उपायुक्त शरद चव्हाण, तसेच उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर उपस्थित होत्या. प्रमुख मार्गदर्शक म्हणून सामाजिक कार्यकर्ते रमेश नरवाडे यांच्यासह जिल्ह्यातील विविध पुरस्कारप्राप्त मान्यवरांची उपस्थिती होती.

प्रास्ताविकात सहाय्यक आयुक्त पीयूष चव्हाण यांनी सामाजिक समता सप्ताहांतर्गत राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. यामध्ये ई-टेस्टद्वारे प्रश्नमंजूषा, अ‍ॅट्रॉसिटी कायद्यांतर्गत पाच जणांना नियुक्ती आदेश, तसेच जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीमार्फत आठ जणांना प्रतिनिधिक स्वरूपात जात वैधता प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. प्रमुख मार्गदर्शक सामाजिक कार्यकर्ते रमेश नरवाडे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्थशास्त्रीय विचारांवर भाष्य करत 'वन मॅन, वन वोट' या तत्त्वातून सामाजिक व आर्थिक समतेचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच 'प्रॉब्लेम ऑफ रुपी' या ग्रंथाचा संदर्भ देत चलनव्यवस्थेतील शिस्तबद्धतेवर त्यांनी प्रकाश टाकला. उपायुक्त शरद चव्हाण यांनी राज्यघटनेतील कलम ४६ विषयी माहिती दिली. परिविक्षाधीन अधिकारी आकाश वर्मा यांनी 'शिका, संघटित व्हा, संघर्ष करा' या संदेशाचे महत्त्व स्पष्ट केले. उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर यांनी विद्यार्थ्यांनी शिक्षणाला प्राधान्य देत उच्च ध्येय ठेवण्याचे आवाहन केले, तसेच मुलींच्या शिक्षणाबाबत समाजातील मानसिकतेत सकारात्मक बदल घडविण्याची गरज व्यक्त केली. कार्यक्रमाचे संचालन वरिष्ठ लिपीक हरीष वानखेडे यांनी केले, तर आभार समाज कल्याण निरीक्षक राहुल शिरभाते यांनी मानले.या कार्यक्रमास समाज कल्याण विभाग, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, जिल्हा परिषद तसेच विविध शासकीय कार्यालयांतील अधिकारी-कर्मचारी, शाळा-महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### वाशिम शहरात महामानवांची जयंती उत्साहात साजरी



भारतरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त शहरात बोधिसत्व डॉक्टर आंबेडकर चौक येथे विविध मान्यवरांनी त्यांच्या पुतळ्याला हार अर्पण करून अभिवादन केले. स्थानिक डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे जिल्हाधिकारी योगेश कुंभजेकर, नगराध्यक्ष अनिल केंदळे, उपाध्यक्ष राजूभाऊ भांदुर्गे, शिक्षक आमदार किरण राव सरनाईक, नगराध्यक्ष अनिल केंदळे, उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर, आरडीसी विश्वनाथ घुगे, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष तेजराव वानखेडे , उपाध्यक्ष निलेश सोमानी वैभव उलेमाले, कार्याध्यक्ष दौलत हिवराळे, शिक्षक पतसंस्थेचे अध्यक्ष विजय मनवर, उबाठा जिल्हाप्रमुख सुरेश मापारी, गजानन भांदुर्गे, कॅप्टन प्रशांत सुर्वे, राहुल तुपसांडे भाजपा शहर अध्यक्ष मनीष मंत्री जेष्ठ समाजसेवक गोपाळराव आटोटे गुरुजी रामप्रभू सोनोने, माणिकराव सोनोने, उबाटा गटनेते गजानन दहात्रे पाटील,भाजपा जिल्हा सरचिटणीस संगीताताई इंगोले, महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष कविता खरात, सुभदा नायक, डॉक्टर सिद्धार्थ देवडे, बांधकाम सभापती राहुल तुपसांडे, आशिष इंगोले, उमेश मोहडे, कपिल सारडा उत्सव समिती सचिव शेषराव धांडे, कोषाध्यक्ष अरविंद उचित,, एडवोकेट सुरेश टेकाळे, बंटी सेठी, कंत्राटदार संतोष वानखेडे, समाजसेवक गिरधारीलाल सारडा, शिवशंकर भोयर, प्रदीप पट्टेबहादूर, शिक्षिका सो विमलताई सावळे, तहसीलदार निलेश पळसकर, कॅप्टन सईदास वानखेडे, रामा ठेंगडे, कंत्राटदार राजू वर्मा, आशिष वर्मा, नगरसेवक शाबीर मिर्झा,प्रकाश अग्रवाल, खोटे सर, नामदेवराव हजारे, बबनराव वाघमारे, ?ड. भारती सोमानी, डॉ. वैशाली देवडे, कवियत्री मधुरानी बनसोड, प्रा. बनसोड, मराठा सेवा संघाचे वाघ, समवेत हजारो च्या संख्येने मान्यवरांनी महामानवाला हार अर्पण करून अभिवादन केले, यावेळी विविध समाजसेवक संघटना पतसंस्था यांच्या वतीने उपस्थित त्यांना लाडू वाटप खिचडी वाटप संविधान वाटप पाणी वाटप थंड पेय वाटप तथा गरजवंत महिलांना साडी वाटप कार्यक्रम पार पडला. उपस्थित सर्व मान्यवरांनी महामानवाच्या जयघोष करीत डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचा विजय असा असा नारा लावला.

### अडोळी येथे १३५ वी भीम जयंती उत्साहात साजरी



तालुक्यातील अडोळी येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी दि.१४ एप्रिल रोजी सकाळी ८:३० वाजता पंचशील ध्वजारोहण करण्यात आले. प्रसंगी बौद्ध उपासक, उपासिका यांचे उपस्थिती बहुसंख्येने होती.नंतर तथागत गौतम बुद्ध, महात्मा ज्योतिबा फुले व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रतीमेला जयंती उत्सव समितीचे राजू तायडे, वैभव पाटील, राजू खंडारे आणि भारतीय सैनिक आनंद पडघान व त्यांच्या पत्नी यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या मिरवणूकीसाठी सजविलेल्या वाहानातील महात्मा ज्योतिबा फुले व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रतिमेला पुष्पहार अर्पण केले.यावेळी ग्रामपंचायत चे प्रशासकीय सदस्य भगवान इढोळे, नारायण इढोळे, खंडोबा कंट्रक्शनचे संचालक प्रमोद इढोळे, बहुजन रत्न पुरस्कार प्राप्त राजकुमार पडघान, के.डी.जाधव, देवदत्त पडघान यांनी देखील उपस्थित राहून महात्मा ज्योतिबा फुले व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केले.नंतर महात्मा ज्योतिबा फुले व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या तैलचित्र असलेल्या वाहनातून गावातील प्रमुख रस्त्यांवरून भव्य दिव्य अशी जलौषात मिरवणूक सकाळी ९ ते १२ वा .यावेळेत काढण्यात आली.मिरवणूकीमध्ये विशेष आकर्षण म्हणून मुलींचे लेझीम पथक,समता सैनिक दलाच्या लाठी काठी,सह नृत्य सादर करण्यात आले.विशेष म्हणजे अडोळी येथील इढोळे पाटील यांनी मिरवणूकीतील जनतेसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली होती.आणि ग्रामपंचायत वतीने ग्रामपंचायत अधिकारी अरविंद पडघन व प्रशासकीय सदस्य अन्नपूर्णा तायडे, भीमराव पडघान,रमेश पडघान, दौलतराव पडघान,सागर इढोळे यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केले.यासाठी पोलीस प्रशासनाने पोलीस अधीक्षक अनुज तारे यांचे नेतृत्वात वाशीम ग्रामीण पोलीस निरीक्षक श्रीदेवी पाटील, पोलीस ऑफीसर योगीता भारद्वाज,व पोलीस स.निरीक्षक शेटये व पोलीस दलातील पोलीस अधिकारी, कर्मचारी यांचा चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

नंतर डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची भव्यदिव्य मिरवणूकीचे गावातील प्रमुख रस्त्यांवरून बौद्ध विहार येथे त्रीशरण पंचशील घेवून सामुदायिक वंदना घेऊन सांगता करण्यात आली.यावेळी पोलीस ऑफिसर योगीता भारद्वाज,स.पोलीस निरीक्षक शेटये, डॉ बाबासाहेब आंबेडकर पदवीधर संघटनेचे अध्यक्ष राजकुमार पडघान, संतोष ठोके, उपस्थित होते.सांगता करण्यात अगोदर गावातील १५ वयोवृद्ध व्यक्तींचा शाल पुष्पगुच्छ देऊन जयंती उत्सव समितीचे वतीने सत्कार करण्यात आला.जयंती कार्यक्रम यशस्वीतेसाठी उत्सव समितीचे अध्यक्ष राजू तायडे, वैभव पाटील, राजू खंडारे,गोलू पडघान,आनंद खंडारे, प्रशांत पडघान,शुक्लोधन पडघान,रोहीत पडघान,जयदिप जाधव,हर्षानंद खंडारे, संतोष खंडूजी पडघान, देवानंद पडघान, डॉ.राहूल खंडारे,जीत पडघान,बुद्धानंद पडघान,बंडू पडघान,एन.के.कांबळे, कैलास पडघान विशाल खंडारे,नाना खंडारे व समता सैनिक दलातील महीला पदाधिकारी यांनी अथक परिश्रम घेतले.कार्यक्रमाला गावातील महीला पुरुष व परिसरातील जनतेनी मोठा सहभाग नोंदविला होता.

### अभिवादनातून व्यक्त कृतज्ञता; संविधान प्रती वाटपातून लोकशाही मूल्यांचा प्रसार



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त वाशिम शहरात अभिमान, आदर आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. मुख्य चौकातील डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्याच्या परिसरात सकाळपासूनच अभिवादनासाठी नागरिकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी उसळली होती. कार्यक्रमास नगराध्यक्ष अनिल केंदळे, जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर, तहसीलदार आकाश वर्मा, निलेश पळसकर, समाजकल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त पीयूष चव्हाण तसेच उत्सव समितीचे अध्यक्ष तेजराव वानखेडे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. यावेळी लोकप्रतिनिधी व मान्यवरांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. याशिवाय सामाजिक संघटनांचे पदाधिकारी,सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार, अधिकारी, कर्मचारी आणि नागरिकांनीही मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत जयंती सोहळा उत्साहात साजरा केला. या प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी डॉ. आंबेडकर यांच्या 'शिका, संघटित व्हा, संघर्ष करा' या मूलमंत्राचे स्मरण करून तो आत्मसात करण्याचे आवाहन केले. तसेच यावेळी उपस्थित नागरिकांना भारतीय संविधानाच्या प्रतींचे वाटप करण्यात आले. संविधानाची ओळख सर्वसामान्यांपर्यंत पोहोचावी, नागरिकांमध्ये त्यांच्या अधिकार व कर्तव्यांविषयी जागरूकता निर्माण व्हावी आणि लोकशाही मूल्ये अधिक दृढ व्हावीत, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. विशेषतः युवक आणि विद्यार्थ्यांनी संविधानाचा अभ्यास करून त्यातील तत्त्वांचा अंगीकार करावा, असेही आवाहन यावेळी करण्यात आले. या उपक्रमास नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत संविधानाबद्दलची आपली बांधिलकी व्यक्त केली. संपूर्ण परिसर 'जय भीम'च्या घोषणांनी दुमदुमून गेला होता. या जयंती सोहळ्याच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा जागर करत सामाजिक समतेचा संदेश अधिक दृढ करण्यात आला.

### राऊत महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी



मंगरुळपीर तालुक्यातील वनोजा येथिल ज्ञानगंगा शिक्षण संस्थेच्या वतीने संचालित श्रीमती साळुंकाबाई राऊत कला व वाणिज्य महाविद्याल वनोजा येथे आज दि. १४ एप्रिल रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी महाविद्यालयात डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. याप्रसंगी प्रा. डॉ. ममता पात्रीकर, प्रा. बापूराव डोंगरे, प्रा. तुषार राऊत, श्रीधर भिंगारे तसेच विद्यार्थी उपस्थित होते. या वेळी उपस्थितांनी डॉ. आंबेडकर यांच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित करत सामाजिक समता, शिक्षण आणि न्याय या मूल्यांचे पालन करण्याचे आवाहन केले.

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती ची भव्य मिरवणुक :



दि.१४ एप्रिल ला महामानव भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मालेगाव शहरात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली मालेगाव शहरात मागील आठ दिवसापासून भीम जयंती महोत्सवाला सुरुवात झाली असून शहरात देखावे महामानवाच्या प्रतिमा सजावट विद्युत रोषनाई मंडप पताका आधी सर्व शहरातील वातावरण भिममय झाले होते दि १४ एप्रिल रोजी शहरातील विविध भागातील महामानवाचे असलेले भव्य प्रतिमा ,पुतळे ,बुद्ध विहार स्तूप आदी ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जय जय कार करीत बौद्ध अनुयायांनी पांढरे शुभ्र कपडे परिधान करून त्रिशरण पंचशील बुद्ध वंदना धम्म वंदना घेत महामानवाला त्रिवार अभिवादन केले दुपारी दोन ते अडीच वाजताच्या दरम्यान तक्षशिला बौद्धविहारापासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती मिरवणुकीला सुरुवात झाली शहरातील व मालेगांव तालुक्यातील गावा गावामध्ये बौद्ध अनुयायांनी बौद्ध विहार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा स्तूप आदी ठिकाण झाली पांढरे शुभ्र पोषाख परिधान करून हजारो बौद्ध अनुयायी आबाल वृद्ध सह जयंती मिरवणुकीमध्ये सहभागी झाले होते यामध्ये पंचशील नवयुवक मंडळ, भीमशक्ती नवयुवक मंडळ, सम्राट नवयुवक मंडळ, आदि मंडळ आप आपली सुशोभित वाहने घेऊन सहभागी झाले होते ढोल-ताशांच्या व डिजेच्या निनादात व जय भीम च्या गजराने भव्य दिव्य सजावटी सह सर्व आसमंत दुमदुमून गेले होते सदर जयंती मिरवणूक अशोकनगर व तहसील कार्यालयासमोर केलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यातील भव्य तेल चित्रास सहभागी मान्यवरांनी पुष्पहार घालून मानवंदना दिली सदर मिरवणूक लहुजी पुतळा ,नगरपंचायत कार्यालय समोरून ,शिव चौक , गांधी चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे पंचशील युवक मंडळाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती मिरवणुकीत हजारो अनुयायांनी सहभागी झाले होते त्यानंतर सदर मिरवणूक जुने बसस्थानक , दुर्गा चौक, जैन मंदीर समोरून, माळी वेटाळ, खवले वेटाळ, मराठी शाळा, आदी मार्गाने मोठा जल्लोषात गांधी चौक येथे सदर मिरवणुकीची सांगता झाली दरम्यान सर्व जातीधर्मीय या भव्य दिव्य मिरवणुकीत सहभागी होऊन जल्लोष साजरा केला मिरवणुकीमध्ये अनेक वाहने भव्य दिखावे महात्मा ज्योतिबा फुले ,सावित्रीबाई फुले यांच्या भव्य प्रतिमा सुद्धा वाहनांमध्ये सजवण्यात आल्या होत्या. तसेच मिरवणूक मार्गावर ठिकठिकाणी असणाऱ्या महापुरुषाच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले तर जागोजागी मिरवणुकीचे स्वागत करण्यात आले मिरवणूक शहराच्या प्रमुख मार्गाने निघून सायंकाळी उशिरा या मिरवणुकीची सांगता मोठ्या उत्साहात करण्यात आली मिरवणूक दरम्यान पोलीस प्रशासनाने तगडा बंदोबस्त लावला होता.

**जागोजागी थंडगार पाणी व शरबत ची व्यवस्था करण्यात आली**

मोठ्या उत्साहात मिरवणूक शहराच्या प्रमुख मार्गाने निघाली असता या मिरवणुकीने शहरातील नागरिकांचे लक्ष वेधून घेतले होते या मिरवणुकीत महिला युवती ह्या पांढऱ्या साड्या तर पुरुष मंडळी पांढरे ड्रेस घालून मोठ्या संख्येने सहभागी झाले होते मिरवणूक मार्गावर ठिकठिकाणी थंडगार पाण्याची व सरबतची व्यवस्था केली होती.

### विद्याभारती शाळेत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी.



येथील विद्याभारती शाळेत ज्ञानाचे महासागर, विश्वरत्न भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. १४ एप्रिल हा दिवस भारतात तसेच संपूर्ण जगभर उत्साहाने साजरा केला जातो. 'नमन त्या पराक्रमाला, नमन त्या ज्ञानदेवतेला, नमन त्या महापुरुषाला' अशा शब्दांत बाबासाहेबांना अभिवादन करण्यात आले. ज्ञानसूर्य, महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे अध्यक्ष प्रा. सुरेशराव मिटकरी होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून संचालक सुमित मिटकरी, मुख्याध्यापक नितेश मिटकरी आणि पर्यवेक्षक विजय गोटे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पण करून करण्यात आली. यानंतर शाळेतील विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणातून व गीतांच्या माध्यमातून बाबासाहेबांना अभिवादन केले. अध्यक्षीय भाषणात प्रा. सुरेशराव मिटकरी यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनचरित्रातील प्रेरणादायी अनुभव सांगितले व उपस्थितांना जयंतीनिमित्त शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वृषाली नवलकार यांनी केले, तर आभार प्रदर्शन अमोल इंगळे यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी मोलाचे सहकार्य केले.

### तक्षशिला आयुर्वेद कॉलेजमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी



कारंजा : श्री. दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट, अमरावती द्वारा संचालित तक्षशिला आयुर्वेद कॉलेज, हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर, खेर्डा येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर तसेच दादासाहेब गवई यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रदीप पांडव यांनी आपल्या मनोगतात डॉ. आंबेडकर यांच्या कार्याचा गौरव करताना ते भारतीय संविधानाचे शिल्पकार व महान समाजसुधारक असल्याचे सांगितले. शिक्षण, समता आणि न्याय यांचा संदेश समाजात रुजविणे हीच त्यांना खरी आदरांजली असल्याचे त्यांनी नमूद केले. उपस्थितांनी त्यांच्या विचारांचे आचरण करण्याचा संकल्प यावेळी केला. यानिमित्ताने अमरावती येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक (इर्विन चौक) येथे नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन संस्थेच्या अध्यक्षा सौ. कीर्तीताई रा. अर्जुन यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाला संस्थेचे सचिव डॉ. कमलाकर पायस, डॉ. सचिन पंडित, प्रा. पी. एस. राव, प्राचार्य डॉ. प्रदीप पांडव इतर प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त वाशिम जिल्ह्यात अभूतपूर्व उत्साह

■ प्रतिनिधी | वाशिम ■

भारतीय संविधानाचे शिल्पकार, सामाजिक समतेचे अग्रदूत आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त वाशिम शहरासह संपूर्ण जिल्ह्यात अभूतपूर्व उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात पहाटेपासूनच अनुयायांची मोठी गर्दी उसळली होती. 'एकच साहेब बाबासाहेब', 'जय भीम बोला जय भीम' अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. सर्वधर्मीय समाजबांधवांनी एकत्र येत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले.

जयंतीच्या पूर्वसंध्येला १३ एप्रिल रोजी मध्यरात्री १२ वाजता फटाक्यांची आतषबाजी व केक कापून उत्सवाला जल्लोषात सुरुवात करण्यात आली. १४ एप्रिल रोजी सकाळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मैदानात तथागत गौतम बुद्धांच्या



मूर्तीला पुष्पांजली अर्पण करून कार्यक्रमांची सुरुवात झाली. आजी-माजी सैनिक संघटनेच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना सैनिकी सलामी देण्यात आली. शहरातील विविध बुद्ध विहारांमध्ये त्रिशरण व बुद्ध वंदना घेऊन अभिवादन करण्यात आले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती २०२६ च्या वतीने मुख्य कार्यक्रम डॉ. बाबासाहेब आंबेडकर मैदानात पार पडला. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. सतीन मेश्राम यांच्या हस्ते पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. जयंतीनिमित्त रक्तदान शिबिर, मोफत दंतवैद्यकीय चिकित्सा शिबिर यांसारखे सामाजिक उपक्रम आयोजित करण्यात आले. या उपक्रमांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. पुतळा परिसरात दिवसभर नागरिकांची गर्दी लक्षात घेता विविध पक्ष, संघटना व सामाजिक संस्थांच्या वतीने अन्नदान व पाणी वाटपाची व्यवस्था करण्यात आली. या कार्यक्रमास नगराध्यक्ष अनिल केंदळे, निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर, तहसीलदार आकाश वर्मा, निलेश पळसकर, समाजकल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त पीयूष चव्हाण तसेच उत्सव समितीचे अध्यक्ष तेजराव वानखेडे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

जयंतीनिमित्त नागरिकांना भारतीय संविधानाच्या प्रतींचे वाटप करण्यात आले. नागरिकांमध्ये अधिकार व कर्तव्यांविषयी जागरूकता निर्माण व्हावी आणि लोकशाही मूल्ये दृढ व्हावीत, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. जयंती उत्सव समितीच्या वतीने बुद्ध-भीम गीतांच्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. भीमगीतांच्या गजरात उपस्थित नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत कार्यक्रमाचा आनंद लुटला.

नालंदा नगर आणि यशवंत नगर भागातून ढोल-ताशा व लेझीमच्या तालावर मिरवणुका काढण्यात आल्या. निळ्या पताकांनी सजलेले शहर आणि भीमगीतांच्या गजरात रात्री उशिरापर्यंत उत्सव रंगला. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विजय असो' या घोषणांनी वाशिमचा आसमंत दणाणून गेला.

जिल्हा पोलिस अधीक्षक अनुज तारे यांच्या मार्गदर्शनाखाली वाशिम शहरात चोख पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. पोलीस निरीक्षक संजय चौधरी यांच्या नेतृत्वात प्रमुख चौकांमध्ये कडेकोट पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला. वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी विविध ठिकाणी बॅरिकेड्स उभारण्यात आले होते. दरम्यान, ४३ अंश तापमान आणि प्रचंड उष्णतेची लाट असतानाही अनुयायांचा उत्साह कमी झालेला दिसला नाही. उन्हाची पर्वा न करता नागरिकांनी मोठ्या संख्येने कार्यक्रम, मिरवणुका आणि अभिवादन सोहळ्यात सहभाग नोंदवला.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठीत सवय

# राज्यभरात महामानवाला अभिवादन; चैत्यभूमीवर लोटला भीमसागर

## मुख्यमंत्र्यांसह दोन्ही उपमुख्यमंत्र्यांकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना वंदन



**मुंबई/प्रतिनिधी** :डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महामानवाला आपण जेवढे अभिवादन करू तेवढे कमी आहे. महामानवाने संविधान लिहिले आणि देश बदलवला, सर्व भेद संपवले. तसेच सर्व भेद संपवण्याचे काम संविधानाने केले आहे. भारत प्रगती करत आहे कारण भारताला सर्वाधिक चांगले संविधान दिले आहे. जगात सर्वांत मोठ्या प्रमाणात जयंती कोणाची होत असेल तर ती बाबासाहेब आंबेडकर यांची होते.

भगवान बुद्ध यांनी अत् दीप भव: हा संदेश दिला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारताच्या अर्थकारणाला जी दिशा दिली ती सर्वांत महत्त्वाची आहे. भारतात एक सेंट्रल बँक असली पाहिजे, असे बाबासाहेब यांनी सांगितले होते. आपल्या चलनाचे सिल्व्हर कोट संपवून गोल्डन कोट सुरू केले पाहिजे, म्हणून रिझर्व्ह बँक स्थापन झाली. याची मूळ कल्पना ही बाबासाहेब यांची होती. असे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५व्या जयंती महोत्सव दिनानिमित्त दादरच्या चैत्यभूमी येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बोलताना सांगितले की, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे राज्यघटनेचे निर्माते होते, तसेच ते माणुसकीचेही निर्माते होते. त्यांनी प्रथम निवडणूक लढवली त्यात त्यांचे निवडणूक चिन्हही माणूस होते. चवदार तळ्याच्या एका चळवळीने देशात सामाजिक क्रांती केली, जगात अनेक ज्ञानी, विचारवंत झाले. मात्र बाबासाहेबांनी त्यांचे ज्ञान स्वत:साठी न वापरता शोषित, वंचित, दीन-दलितांच्या उद्धारासाठी वापरले आहे. संविधान हा आपल्या देशाचा पाया आहे. आज एक सर्वसामान्य व्यक्ती देशाच्या उच्च स्थानी विराजमान होतो. आमच्या सुनेत्राताई उपमुख्यमंत्री होतात.. ही संविधानाची देण आहे. आमच्या सरकारचा डीएनए हा बाबासाहेब असल्याचे म्हटले तर वावगे ठरणार नाही, अशी प्रतिक्रियाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी बोलताना दिली.

मातीचे सोने झाले, भीमा तुझ्यामुळे, जीवनात आनंद झाला भीमा तुझ्यामुळे, चवदार तळ्याचे ओंजळभर पाणी पिले आणि क्रांती झाली, बाबासाहेबांनी दिलेले संविधान हाच आपला आत्मा आहे. आम्ही इथे बसलो ते संविधानाची शपथ घेउन बसलो. अदिवासी महिला राष्ट्रपती होतात, आणि मी शेतकरी कुटुंबातला मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री झालो ते बाबासाहेब यांच्यामुळे. भीमाची लाडकी लेक ज्योती वाघमारे संसदेत पोहोचली, बाबासाहेबांचा विचार हाच आमच्या सरकारचा डीएनए आहे, असेही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

## पेट्रोल 18 तर डिझेल 35 रुपयांनी महागणार?



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-**कच्च्या तेलाच्या वाढत्या किंमतीमुळे पेट्रोल १८ आणि डिझेल ३५ रुपये प्रतिलीटर महाग होण्याची शक्यता आहे. कच्च्या तेलाचे दर वाढले तरीही देशात पेट्रोल डिझेलच्या किंमती स्थिर आहेत. त्यामुळे कंपन्यांना मोठे नुकसान होत आहे. त्यामुळे पश्चिम बंगालसह ५ राज्यांच्या निवडणुका संपताच कंपन्या पेट्रोल डिझेलचे दर वाढवण्याची शक्यता आहे.कच्चे तेल महागल्याने कंपन्यांना प्रतिलीटर पेट्रोलवर १८ आणि डिझेलवर ३५ रूपये नुकसान होत आहे. मागील महिन्यात तीन कंपन्यांना जवळपास २४०० कोटी नुकसान सहन करावे लागले. उत्पादन शुल्कात १० रुपये कपात केल्यानंतर हे नुकसान १६०० कोटींपर्यंत घसरले. प्रत्येक १० डालरच्या वाढीनंतर नुकसान ६ रुपये प्रतिलीटरने वाढत आहे.भारत आपल्या कच्च्या तेलाच्या गरजेपैकी अंदाजे ८८% आयात करतो. यापैकी ४५% मध्य पूर्वेकडून आणि ३५% रशियाकडून येते. कच्च्या तेलाच्या वाढत्या किमती केवळ तेल कंपन्यांसाठीच नव्हे तर देशाच्या चालू खात्यातील तुटीसाठी देखील धोकादायक ठरत आहेत. २०२६ च्या पहिल्या तिमाहीपर्यंत ही तूट २० अब्ज डालर्सपर्यंत वाढू शकते असा अंदाज आहे.

**९ वर्षांत उत्पादन शुल्क २२% वरून ८% पर्यंत घटले-**सरकारी महसुलात तेलावरील उत्पादन शुल्काचा वाटा सातत्याने कमी होत आहे. २०१७ च्या आर्थिक वर्षात ते २२% होते आणि आता ते केवळ ८% पर्यंत खाली आले आहे. सरकारने संपूर्ण उत्पादन शुल्क काढून टाकले तरी सध्याच्या किमतीनुसार तेल कंपन्यांचे नुकसान पूर्णपणे भरून निघणार नाही. ऑगस्ट २०२२ नंतर प्रथमच अमेरिकेत पेट्रोलची सरासरी किंमत प्रति गॅलन ४ डालरच्या वर गेली आहे. पाकिस्तान, नेपाळ आणि श्रीलंका यांसारख्या अनेक शेजारी देशांनीही पेट्रोल आणि डिझेलच्या किमती वाढवल्या आहेत.

**भारतात किमती कशा ठरतात?**

जून २०१० पर्यंत पेट्रोलची किंमत सरकार ठरवत असे आणि त्यात दर १५ दिवसांनी सुधारणा केली जात असे. २६ जून २०१० नंतर सरकारने पेट्रोलच्या किमती ठरवण्याचे काम तेल कंपन्यांवर सोपवले. त्याचप्रमाणे ऑक्टोबर २०१४ पर्यंत डिझेलची किंमतही सरकारच ठरवत असे. १९ ऑक्टोबर २०१४ पासून सरकारने हे कामही तेल कंपन्यांकडे सोपवले आहे. सध्या तेल कंपन्या आंतरराष्ट्रीय बाजारातील कच्च्या तेलाची किंमत, विनिमय दर, कर, वाहतूक खर्च आणि इतर घटकांचा विचार करून पेट्रोल आणि डिझेलची किंमत दररोज ठरवतात. देशात आसाम, केरळ, पुदुच्चेरी, तमिळनाडू आणि पश्चिम बंगाल या राज्यात निवडणुका आहेत. त्यामुळे या निवडणुका संपल्यानंतर पेट्रोल, डिझेलचे दर वाढण्याची शक्यता आहे.

## दिवाळखोर पाकला जुनी कर्ज फेडण्याचा आदेश

**इस्लामाबाद :** संयुक्त अरब अमिरातीने पाकिस्तानकडून ३.५ अब्ज डालर्स तात्काळ परत करण्याची मागणी केली आहे, यामुळे पाकिस्तानच्या परकीय चलन साठ्यावर दबाव आला आहे. या संकटाचा सामना करण्यासाठी, पाकिस्तान आर्थिक संकट टाळण्यास मदत व्हावी म्हणून कर्ज आणि गुंतवणूक या दोन्हींसाठी सौदी अरेबिया आणि चीनसोबत वाटाघाटी करत आहे.संयुक्त अरब अमिरातीने काही दिवसापूर्वी पाकिस्तानकडे आपल्या पैशांची मागणी केली आहे. पाकिस्तानला या महिन्यात सौदी अरेबियाला ३.५ अब्ज डालर्स परत करायचे आहेत. जर पाकिस्तानने हे पैसे परत केले, तर काही दिवसांतच त्याचा परकीय चलन साठा संपुष्टात येईल. हे टाळण्यासाठी, पाकिस्तान सौदी अरेबिया आणि चीनकडून पैशांची मागणी करत आहे.संयुक्त अरब अमिरात दोन्ही कर्जांच्या परतफेडीची मागणी करत आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, त्यांना या महिन्याच्या अखेरपर्यंत त्यांचे अंदाजे ३.५ अब्ज डालर्स हवे आहेत. पाकिस्तान या कर्जाची परतफेड करत आहे, परंतु यामुळे त्यांच्या परकीय चलन साठ्यावर दबाव येईल. सध्या, पाकिस्तानकडे अंदाजे १६ अब्ज डॉलर्सचा साठा आहे, हा केवळ तीन महिन्यांच्या आयातीसाठी पुरेसा आहे.

## छत्तीसगड हादरले! वेदांता पॉवर प्लांटमध्ये भीषण स्फोट; ४० मजूर जखमी

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** छत्तीसगडमधील शक्ती जिल्ह्यातून एक अत्यंत भीषण अपघाताची बातमी समोर येत आहे. सिंघीतराई येथील वेदांता पॉवर प्लांटमध्ये मंगळवारी दुपारी भीषण स्फोट झाला. प्लांटमधील बायलर अचानक फुटल्याने झालेल्या या दुर्घटनेत ४० हून अधिक मजूर गंभीर जखमी झाले आहेत. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या भीषण अपघातात ४ ते ५ मजुरांचा मृत्यू झाल्याची भीती व्यक्त केली जात आहे, मात्र प्रशासनाने अद्याप याला अधिकृत दुजोरा दिलेला नाही.

**स्फोटाने परिसर हादरला, मजुरांची पळापळ**

मंगळवारी दुपारी २ च्या सुमारास जेव्हा प्लांटमध्ये काम सुरू होते, तेव्हा अचानक बायलरचा मोठा स्फोट झाला. हा स्फोट इतका भीषण होता की, त्याचा आवाज कित्येक किलोमीटरपर्यंत ऐकू आला. स्फोटानंतर प्लांटमध्ये एकच खळबळ उडाली आणि मजुरांनी जीव वाचवण्यासाठी सैरावैरा धाव सुटली. घटनेच्या वेळी अनेक मजूर बॉयलरच्या परिसरात कर्तव्यावर होते, ज्यामुळे जखमींचा आकडा मोठा आहे.



**मलब्याखाली अनेकजण अडकल्याची भीती**

घटनेची माहिती मिळताच जिल्हा प्रशासनाचे अधिकारी आणि पोलीस ताफा घटनास्थळी रवाना झाला आहे. तातडीने मदत कार्य सुरू करण्यात आले असून रुग्णवाहिकांमार्फत जखमींना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. जखमींपैकी अनेकांची प्रकृती चिंताजनक असल्याने मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. अद्याप काही मजूर ढिगा-याखाली दबले असण्याची शक्यता असल्याने बचाव पथक युद्धपातळीवर काम करत आहे.

**सुरक्षेच्या मुद्द्यावर प्रश्नचिन्ह**

हा अपघात तांत्रिक बिघाडामुळे झाला की सुरक्षा मानकांकडे दुर्लक्ष केल्यामुळे, याबाबत सध्या चर्चा सुरू आहे. प्राथमिकदृष्ट्या ही मोठी तांत्रिक चूक असल्याचे बोलले जात आहे. या दुर्घटनेमुळे प्लांटमधील कामगारांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून स्थानिक नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे. जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक स्वतः परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत.

## खरात प्रकरणात पोलिस आयजींचे नाव समोर

### ■ अंजली दमानियांचा व्हिडीओतून गंभीर आरोप; ■ भोंदूबाबा प्रकरणात पोलिस यंत्रणेलाही फटका

**मुंबई/प्रतिनिधी-** नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणात आता नवीन आणि खळबळजनक माहिती समोर आली आहे. या प्रकरणात राज्याच्या पोलीस दलातील



उच्चपदस्थ आयपीएस (IPS) अधिकारी वादाच्या भोव-यात सापडले आहेत. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी नाशिकचे विशेष पोलीस महानिरीक्षक (IG) दत्ता कराळे यांच्यावर थेट निशाणा साधत गंभीर आरोप केले आहेत.अंजली दमानिया यांनी पोस्टमध्ये म्हटलं की, 'श्री दत्ता कराळे हे एक क्ष्क्र लेवलचे पोलीस अधिकारी असताना खारतांसारख्या बाबांच्या कार्यक्रमात का गेले? तेथे भाषण देखील दिले? हे जेव्हा सामान्य जनता ऐकते तेव्हा खारतांवर विश्वास का नाही बसणार? त्यांची देखील चौकशी departmental vigilance कडून झाली पाहिजे. त्यांचे देखील थोडे थोडके नाही तर तब्बल १८ क?ल आहेत. ह्याचे उत्तर पोलिस महासंचालक श्री सदानंद दाते सरांनी घेतले पाहिजे.' अशोक खरात याच्यावर भोंदुगिरी, जादूटोणा आणि लोकांच्या फसवणुकीचे गंभीर आरोप आहेत. याशिवाय अनेक महिलांवर त्याने फसवणूक करून किंवा धमकावून लैंगिक अत्याचार केल्याचेही आरोप आहेत. आतापर्यंत त्याच्याविरोधात डझनभरहून अधिक गुन्हे दाखल झाले आहेत. अशा वादग्रस्त व्यक्तीसोबत एका आयजी दर्जाच्या अधिका-याचे नाव जोडले गेल्याने नाशिक पोलीस दलात आणि राजकीय वर्तुळात मोठी चर्चा सुरू झाली आहे.'पोलीसच जर अशा भोंदूगिरीला पाठबळ देत असतील, तर सामान्य जनतेने कोणाकडे पाहायचे?' असा सूर आता उमटत आहे. अंजली दमानिया यांच्या या आरोपांनंतर अद्याप आयजी दत्ता कराळे किंवा पोलीस प्रशासनाकडून अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही.

## ट्रम्प यांना 'यस सर-यस सर' करतात मोदी

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** बंगाल विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराने संपूर्ण राज्यातील वातावरण ढवळून निघत आहे. प्रचारादरम्यान सर्वच राजकीय पक्ष एकमेकांवर आरोप प्रत्यारोप करताना दिसत आहेत. यातच, आज काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी बंगाल विधानसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर थेट निशाणा साधला. 'नरेंद्र मोदी माझ्याशी नजर मिळवून बोलू शकत नाहीत. मी त्यांच्या डोळ्यात पाहतो, पण ते खाली बघतात, असे राहुल गांधी यांनी म्हटले आहे. एवढेच नाही तर त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना 'देशद्रोही' असे संबोधले. ते पश्चिम बंगालमधील मालदा येथे एका प्रचारसभेत बोलत होते. यावेळी राहुल गांधी यांनी, 'अमेरिकेसोबत झालेला नवा व्यापार करार हा देशातील लघु आणि मध्यम उद्योगांचे मोठे नुकसान करणारा आहे. यामुले रोजगाराचे प्रचंड संकट निर्माण होईल. तसेच 'SIR' (State Identity Register) मधून मोठ्या प्रमाणावर लोकांची नावे हटवणे असंवैधानिक असून काँग्रेसचे सरकार आल्यास ही नावे पुन्हा जोडली जातील, असे आश्वासन दिले.



**'नरेंद्र मोदी माझ्याशी नजर मिळवून बोलू शकत नाहीत -**

राहुल गांधी म्हणाले, 'नरेंद्र मोदी माझ्याशी नजर मिळवून बोलू शकत नाहीत. मी त्यांच्या डोळ्यात पाहतो, पण ते खाली बघतात. ५६ इंचाच्या छातीचा दावा हा केवळ विनोद असून त्यांनी तर देशच विकला आहे.' दरम्यान त्यांनी भाजप आणि अदानी यांच्यातील संबंधांवरूनही सरकारवर हल्ला चढवला. 'सरकार सर्व कंत्राटे अदानींनाच देते, कारण अदानी सरकारला पैसा आणि पाठबळ देतात. माध्यमही चालवतात. खरे तर, अदानी यांच्या कंपनीचे नाव 'मोदानी' असायला हवे,' असे ते म्हणाले. तसेच, अमेरिकेला या व्यवहारांची कल्पना असून डोनाल्ड ट्रम्प यांनी मोदींचे करिअर संपवण्याची भाषा केली तरी पंतप्रधान शांत आहेत, असा दावाही त्यांनी केला.

**'ट्रम्प यांना यस सर-यस सर करतात** –लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी म्हणाले, 'नरेंद्र मोदींवर ट्रम्प यांचे पूर्ण नियंत्रण आहे. पंतप्रधान मोदींनी अमेरिकेसाठी कृषी क्षेत्र खुले केले आहे. त्यांनी अमेरिकेसोबत तेल खरेदीचा करार केला आहे. त्यांना सांगण्यात आले आहे की, इतर कोणत्याही देशाकडून तेल खरेदी करायचे असेल, तर आधी त्यांना विचारले जाईल.' एवढेच नाही तर, नरेंद्र मोदी ट्रम्प यांना केवळ यस सर, यस सर म्हणतात. तसेच, ट्रम्प यांच्यासोबत करार करण्यात आला आहे की, भारत अमेरिकेकडून दरवर्षी ९ लाख कोटी रुपयांचा माल खरेदी करेल. राहुल गांधी म्हणाले की, या व्यापार कराराचे स्वरूप स्पष्टपणे दाखवते की पंतप्रधान मोदी देशद्रोही आहेत, असेही राहुल गांधी यांनी म्हटले आहे.

## राज्यात ऊष्णतेची लाट

**पुणे /प्रतिनिधी-**सध्याच्या हवामान स्थितीनुसार विदर्भ आणि मराठवाड्यात उन्हाचा कडाका प्रचंड वाढला आहे. चंद्रपूर, ब्रह्मपुरी, अकोला आणि वर्धा यांसारख्या शहरांमध्ये तापमान ४२ ते ४४ अंशावर च्या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. हवामान विभागाने विदर्भातील नागरिकांना दुपारच्या वेळी बाहेर न पडण्याचे आवाहन केले आहे. लातूर, धाराशिव आणि नांदेड जिल्ह्यांतही कोरड्या हवामानामुळे उष्णतेची तीव्र लाट जाणवत आहे.तसेच विदर्भ आणि मराठवाड्यासाठी ही खरोखरच चिंतेची बाब आहे. एप्रिलच्या मध्यावरच जर पारा ४२ अंश ते ४४ अंश पार करत असेल, तर मे महिना अधिक कठीण जाण्याची शक्यता आहे.हवामान विभागान दिलेल्या इशा-यानुसार, या उष्णतेच्या लाटेचा सर्वाधिक फटका चंद्रपूर, अकोला, ब्रह्मपुरी, नागपूर आणि वर्धा या जिल्ह्यांना बसू शकतो. तसेच लातूर, जालना, धाराशिव आणि छत्रपती संभाजीनगरचा काही भाग देखील उष्ण राहू शकतो. अशा परिस्थितीत स्वत:ची काळजी घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे.



ठाणे, पालघर, रायगड जिल्ह्यात किमान तापमान २४ अंश सेल्सिअस असून कमाल तापमान ३६ अंश सेल्सिअस असण्याची शक्यता आहे. दिवसभर वातावरण दमट व उष्ण राहून दुपारी घामाच्या धारा लागणार आहेत् दुसरीकडे, पुण्यात पारा ४० अंशावर पोहोचला असून सोमवारी तापमान ४२ अंश सेल्सिअस नोंदलं जाण्याची शक्यता आहे. पुण्यातील लोहगाव आणि कोरेगाव पार्क परिसरात तापमान ४२ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे.

**अकोला जिल्ह्यात ४४ अंशावर-** विदर्भातील अकोला येथे तापमान ४३ अंशाच्या पुढे गेले होते. अकोला शनिवारी राज्यातील सर्वात उष्ण जिल्हा ठरला होता. सोमवारीही उन्हाचा कडाका जिल्ह्यात कायम होता. मंगळवारीही अशीच परिस्थिती कायम होती.दरम्यान, पश्चिम महाराष्ट्रातही तापमान वाढले असून उन्हाच्या झळा बसत आहेत. सोलापूर जिल्ह्यात पारा ४१.४ अंशावर पोहोचला होता. तसेच, सांगली आणि जेउरमध्या रविवारी तापमान ४० अंश सेल्सिअस इतके नोंदले गेले होते. महाराष्ट्रात येत्या काही दिवसांत उष्णतेची लाट येण्याचा इशारा हवामान विभागाने वर्तवला आहे.







## भारतरत्न डॉ. बाबासाहेबांचे आंबेडकरांचे विचार देशाच्या प्रगतीसाठी, उपेक्षितांच्या हक्कांसाठी प्रेरणादायी व अत्यंत दिशादर्शक- माजी खासदार रामदास तडस

**वर्धा/प्रतिनिधी :** आज भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ जयंती निमीत्य माजी खासदार रामदास तडस यांनी वर्धा व देवळी येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास माल्यार्पन करुन अभिवादन केले, तसेच विविध कार्यक्रमस्थळी भेटी दिल्या. भारत हा जगातील सर्वात मोठा लोकशाही प्रधाण आणि सामाजिक सांस्कृतिक रित्या वैविध्यपूर्ण देश म्हणूज ओळखला जातो. देशाची सास्कृतिक ओळख आणि वेगळेपण लक्षात घेउन भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला योग्य दिशा देण्याचे महत्वपूर्ण कार्य केले. भारतरत्न डॉ. बाबासाहेबांनी देशाला दिलेली संविधान ही सर्वात मोठी अनमोल भेट आहे. त्यामुळे आज भारत देश अनेक रुढी परंपरा, अनेक राज्य असुनसुध्दा एका सुत्रामध्ये बांधलेला आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार समता, स्वातंर्त्य आणि बंधुतेवर आधारित असून, ते समाजाला सामाजिक न्याय व परिवर्तनाची दिशा दाखवतात. 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा मंत्र, शिक्षणाचे महत्त्व, महिलांचे सक्षमीकरण, भारतीय राज्यघटना आणि सामाजिक समता यांसारखे त्यांचे विचार आजही देशाच्या प्रगतीसाठी व उपेक्षितांच्या हक्कांसाठी प्रेरणादायी व अत्यंत दिशादर्शक असल्याचे यावेळी माजी खासदार रामदास तडस म्हणाले.

## संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# संकटाचे ढग

गाजावाजा करून अमेरिका आणि इराण यांच्यातील युद्ध समाप्तीसंदर्भात सुरू झालेली चर्चेची पहिली फेरी निष्फळ ठरली. हे होणारच होते. कारण जो पाकिस्तान स्वतःच अफगाणिस्तानशी युद्धात गुंतला आहे आणि ज्या पाकने भारतावर असंख्य वेळा युद्ध लादून भारताला संकटात लोटले आहे, तो पाक युद्ध समाप्ती करण्यात कसा यशस्वी ठरणार, हा प्रश्नच होता. चर्चा कोसळल्याने पुन्हा एकदा होर्मुझ मार्ग बंद. त्यामुळे भारतासह आखाती देशांसाठी भविष्यात काय वाढून ठेवले आहे त्याचे हे संकेत. अमेरिका इराणला नमते घेण्यास भाग पाडण्यात अपयशी ठरले. इराण मागे हटायला तयार नाही. २१ तास मॅरॅथॉन चर्चेनंतर बोलणी अखेर थांबली. अमेरिका आणि इराणमधील चर्चा पुन्हा सुरू होण्याबाबत निर्माण झालेली आशा मावळली. इस्लामाबादमध्ये झालेली उच्चस्तरीय बैठक निष्फळ ठरली. इराणने आण्विक कार्यक्रम आणि होर्मुझ सामुद्रधुनीवरील नियंत्रणाबाबत घेतलेली ठाम भूमिका चर्चेतील सर्वात मोठा अडथळा ठरली. दोन्ही देशांमधील संवाद आता राजनैतिक भाषेकडून थेट आणि धारदार शब्दांकडे सरकला आहे, ज्यामुळे तणाव वाढला आहे. इराणने अमेरिकेच्या मागण्यांना अवास्तव म्हटले आहे आणि अमेरिकेने आधी दिलेल्या वचनांचे पालन केले नाही असा आरोप इराणने केला आहे. अमेरिकेचे उपराष्ट्राध्यक्ष जे. डी. व्हान्स आणि इराणच्या शिष्टमंडळात झालेली शांतता वार्ता अयशस्वी ठरली. व्हान्स यांनी सांगितले की, इराणने अमेरिकेच्या अटी मान्य न केल्यामुळे ही चर्चा फिस्कटली. इराणच्या अण्वस्त्र कार्यक्रमावर आणि होर्मुझ सामुद्रधुनीच्या प्रश्नावर तडजोड न झाल्यामुळे अमेरिका आणि इराण यांच्यातील तणाव अनेक दशकांपासूनचा आहे. या दोन देशांमधील चर्चेच्या फेऱ्या अनेकदा निष्फळ ठरतात, कारण त्यांच्या मागण्या आणि जागतिक दृष्टिकोन परस्परविरोधी आहेत. त्यामुळे चर्चेची पहिली फेरी निष्फळ ठरली, तर त्यात आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. तणाव कायम आहे. वार्ता अपयशी ठरल्यानंतर, अमेरिकेचे प्रतिनिधी वॉशिंग्टनला परतले. अमेरिका आणि इराण यांच्यात मध्यस्थ कोण तर पाकिस्तान जो स्वतःच एक दहशतवाद्यांना सर्वप्रकारचा पाठिंबा देणारा देश आहे. पाकला ही मध्यस्थाची भूमिका कुणी दिली नव्हती, तर पाकने ती स्वतःहून घेतली. या सर्व चर्चेत दोन बाबी स्पष्ट झाल्या, इराणने युरेनियम समृद्धीकरणाचे प्रमाण वाढवले असून, ते तांत्रिकदृष्ट्या अण्वस्त्र बनवण्याच्या क्षमतेच्या जवळ पोहोचले आहे आणि दुसरे म्हणजे या कार्यक्रमामुळे मध्यपूर्वेत तणाव वाढला, ज्यामुळे इस्त्रायल आणि अमेरिकेशी इराणचा संघर्ष अटळ बनला. थोडक्यात, हा मुद्दा केवळ इंधनाचा नसून भौगोलिक-राजकीय सुरक्षेचा बनला आहे. पाकिस्तान सध्या गंभीर आर्थिक संकटाचा सामना करत आहे. या पार्श्वभूमीवर, जेव्हा पाकिस्तान स्वतःच्या अंतर्गत समस्यांमध्ये अडकलेला असताना तो इतर देशांमधील संघर्षात मध्यस्थी करण्याचा प्रयत्न करतो. याचा अर्थ पाकिस्तान आंतरराष्ट्रीय राजकारणात स्वतःचे हितसंबंध, जागतिक दबाव किंवा भू-राजकीय स्थान मिळवण्याचा प्रयत्न करतो आहे. इराणकडे होर्मुझचे नियंत्रण आहे त्यावरून सारा संघर्ष आहे. आंतरराष्ट्रीय चर्चा आणि ऐतिहासिक सागरी घटनांमध्ये इराण होर्मुझचे नियंत्रण सोडण्यास तयार नाही आणि त्यामुळे अमेरिकेने इराणला धमकी दिली होती. याचा अर्थ हा आहे की अमेरिका आणि इराण हे दोघेही आता पुन्हा एकदा तीव्र संघर्षासाठी तयार झाले. इराणचा अणुकार्यक्रम सुरू राहील आणि अमेरिका-इस्त्रायल इराणवर नव्याने हल्ले करेल. अमेरिका इराणमध्ये थेट लष्करी सैन्य पाठवण्याच्या योजनेवर गांभीर्याने विचार करत असल्याची माहिती समोर आली आहे. इराणच्या भूमीवर ५०,००० सैनिक उतरवण्याची चर्चा आहे. अमेरिकेने इराणच्या सर्व बंदरांवर नाकेबंदी करण्याची घोषणा केली आहे. होर्मूझच्या सामुद्रधुनीतून इराणच्या दिशेने जाणाऱ्या किंवा इराणमधून येणाऱ्या जहाजांवर अमेरिकन नौदल कडक कारवाई करणार आहे. अमेरिका आणि इस्त्रायल इराणच्या अणुकार्यक्रमाला मोठा धोका मानतात आणि त्यांनी लष्करी बळाचा वापर करून इराणची अण्वस्त्र बनवण्याची क्षमता उद्ध्वस्त करण्याची प्रक्रिया तीव्र केली आहे. तज्ज्ञांच्या मते, इराणमध्ये अमेरिकेची थेट घुसखोरी झाल्यास हे युद्ध अधिक विनाशकारी होईल. इराण यापुढे आपले युरेनियम कार्यक्रम गोठवणार नाही. विशेष म्हणजे दोन आठवडे जी युद्धबंदी होती तिच्या आता चिंधड्या उडणार आहेत. युद्ध पुन्हा सुरू झाल्यामुळे ऊर्जा सुरक्षा धोक्यात येणार आहे. त्याचा भारतालाही फटका बसेल. शिवाय ऊर्जेच्या किमती वाढल्यामुळे आर्थिक परिणाम तर होणारच आहेत आणि ते गंभीर असतील. याचा अर्थ एकच आहे की जग पुन्हा अमेरिका आणि इराण यांच्यातील भीषण युद्धाकडे लोटले जाणार आहे. यात केंद्रस्थानी असलेला लेबनॉन हा युद्धबंदीत नसल्याने इस्त्रायलचे पंतप्रधान नेतान्याहू यांनी म्हटल्याप्रमाणे लेबनॉनवर हल्ले तीव्र केले जातील. म्हणजे पश्चिम आशिया आणखी काही महिने तरी युद्धाने धगधगत राहील. ट्रम्प यांनी म्हटले होते, की इराणची संस्कृती नष्ट करू. ती नष्ट होईल, की नाही ते माहीत नाही. पण त्यांची धमकी त्यांच्या अंगलट आली आहे. कारण इराण शरणागती पत्करण्यास तयार नाही. इराणचे नियंत्रण होर्मुझवर तसेच राहील आणि त्यांच्या परवानगीशिवाय जहाजे येऊ शकणार नाही. त्यामुळे आखाती देश आणि भारतासह सारे जग संकटात सापडेल. आखातात पाण्याचा प्रचंड तुटवडा जाणवेल आणि त्याचा तेथील जनजीवनावर परिणाम होणार आहे. भारत आज चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था आहे. तो किती काळ राहील हे सांगता येत नाही. याचा अर्थ आणखी काही काळ तरी भारतावर तेल आणि ऊर्जा संकटाचे ढग घोंघावत राहतील.

# नवे ऊर्जाधोरण 'गेमचेंजर' ठरणार !

**नवे राष्ट्रीय वीज धोरण भारताच्या ऊर्जाक्षेत्रात 'गेमचेंजर' ठरण्याची क्षमता आहे. भारत आता स्वच्छ, विकेंद्रित आणि तंत्रज्ञानसक्षम ऊर्जा व्यवस्थेकडे वाटचाल करत आहे. ही वाटचाल केवळ ऊर्जा क्षेत्रापुरती मर्यादित नसून भारताच्या सर्वांगीण विकासाचा पाया ठरणार आहे. आगामी काळात या धोरणाची अंमलबजावणी कितपत प्रभावीपणे होते, यावरच भारताचे 'ऊर्जा भविष्याचे' भवितव्य अवलंबून असेल.**



भारताच्या ऊर्जा क्षेत्राला नव्या दिशेने नेण्याच्या उद्देशाने ऊर्जा मंत्रालयाने जाहीर केलेले राष्ट्रीय वीज धोरण हा एक महत्त्वपूर्ण आणि दूरदृष्टी असलेला दस्तावेज ठरणार आहे. 'विकसित भारत २०४७' या ध्येयाच्या पार्श्वभूमीवर तयार करण्यात आलेले हे धोरण अंतिम झाल्यानंतर २००५ मध्ये अधिसूचित करण्यात आलेल्या विद्यमान राष्ट्रीय वीज धोरणाची जागा घेणार आहे.

गेल्या दोन दशकांमध्ये वीजक्षेत्रात झालेला आमूलाग्र बदल आणि उद्भवलेल्या नव्या आव्हानांचा विचार करून या नव्या धोरणाची आखणी करण्यात आली आहे. २००५ मध्ये राष्ट्रीय वीज धोरण लागू झाल्यानंतर भारताच्या वीजक्षेत्रात लक्षणीय परिवर्तन झाले आहे. एकेकाळी गंभीर मानली जाणारी वीजपुरवठ्याची समस्या मोठ्या प्रमाणावर सुटली असून, देशातील जवळपास सर्व गावे आणि इच्छुक घरांपर्यंत वीज पोहोचवण्यात यश आले आहे.

सार्वत्रिक विद्युतीकरणाचा हा टप्पा गाठल्यानंतर आता लक्ष गुणवत्ता, विश्वासार्हता आणि शाश्वततेकडे वळले आहे.

तथापि, या सकारात्मक बदलांच्या पार्श्वभूमीवर वितरण कंपन्यांची आर्थिक स्थिती मात्र चिंताजनकरीत्या खालावलेली दिसते, हे या मसुदा धोरणात स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे.

या धोरणानुसार २०४७ पर्यंत देशातील एकूण वीजनिर्मिती क्षमतेपैकी ८० टक्क्यांहून अधिक क्षमता जीवाश्म इंधनांवर अवलंबून नसलेल्या स्त्रोतांमधून येईल तसेच एकूण वीज उत्पादनापैकी सुमारे दोन-तृतीयांश वीज अशा स्वच्छ ऊर्जास्त्रोतांमधून निर्माण होईल, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. त्याचबरोबर देशातील एकूण ऊर्जा वापरामध्ये विजेचा वाटा सध्याच्या तुलनेत दुप्पट होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

**नियोजनाचा विकेंद्रित आराखडा**

या मसुदा धोरणात संसाधन पर्याप्ततेवर विशेष भर देण्यात आला आहे. भविष्यातील वाढत्या मागणीची पूर्तता विश्वासार्ह आणि परवडणाऱ्या दरात करण्यासाठी आवश्यक उत्पादन क्षमता आणि ऊर्जा उपलब्ध रहावी, यासाठी नियोजनाचा विकेंद्रित आराखडा सुचवण्यात आला आहे. या अंतर्गत वितरण कंपन्या आणि राज्यस्तरीय 'लोड डिस्पॅच' केंद्रे आपल्या पातळीवर संसाधन नियोजन करतील आणि त्यांना राज्य वीज नियामक आयोगांच्या नियमांचे मार्गदर्शन मिळेल. वीजवितरण क्षेत्रातील आर्थिक शाश्वततेचा प्रश्न हा या धोरणाचा गाभा मानला गेला आहे. अनेक राज्यांमध्ये वीज दर हे पुरवठ्याच्या खर्चापेक्षा कमी ठेवले जात असल्यामुळे महसुलात सातत्याने तूट निर्माण होत असून कर्जाचा बोजा वाढत आहे. या समस्येवर तोडगा म्हणून खर्चानुसार दरनिर्धारण, योग्य वेळी दरवाढीची अंमलबजावणी आणि तांत्रिक तसेच व्यापारी तोट्यांमध्ये कपात यावर भर देण्यात आला आहे. नियामकांकडून दरनिर्धारणात विलंब झाल्यास स्वयंचलित दरवाढीची तरतूद करण्याचाही प्रस्ताव आहे. यामुळे वितरण कंपन्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवण्याचा प्रयत्न आहे. याचबरोबर वितरण पायाभूत सुविधांचे आधुनिकीकरण, स्मार्ट तंत्रज्ञानाचा वापर, वीज चोरी रोखणे, ऊर्जा लेखापरीक्षण आणि इलेक्ट्रिक वाहनांसारख्या नव्या तंत्रज्ञानाशी जुळवून घेण्यासाठी आवश्यक सुधारणा यावरही भर देण्यात आला आहे. कृषिक्षेत्रातील वीजपुरवठा सौरऊर्जेवर आधारित करण्याचा २०३० पर्यंतचा उद्देशही नमूद करण्यात आला आहे. त्यामुळे राज्यांवरील अनुदानाचा बोजा कमी होण्यास मदत होईल.

**आण्विक ऊर्जानिर्मितीचे लक्ष्य**

नव्या धोरणात नूतनीकरणक्षम ऊर्जेला केंद्रस्थानी ठेवण्यात आले असून सौर आणि पवन ऊर्जेच्या वाढत्या वापरासोबत येणाऱ्या तांत्रिक आणि व्यवस्थापनाच्या आव्हानांवर उपाययोजना सुचवण्यात आल्या आहेत. ऊर्जा साठवण तंत्रज्ञानाचा वापर, बाजाराधारित यंत्रणा आणि पायाभूत सुविधांचे योग्य नियोजन याद्वारे वीजप्रणाली अधिक स्थिर आणि लवचिक करण्याचा प्रयत्न दिसून येतो. नूतनीकरणक्षम ऊर्जेच्या वाढत्या वापरामुळे निर्माण होणाऱ्या चढ-उतारांशी जुळवून घेण्यासाठी पारंपरिक वीज प्रकल्प अधिक लवचिक बनवण्याची गरज अधोरेखित करण्यात आली आहे तसेच अशा प्रकल्पांचा वापर केवळ वीजनिर्मितीसाठीच नव्हे, तर औद्योगिक प्रक्रियांसाठीही करण्याच्या शक्यता तपासण्याचा प्रस्ताव आहे. आण्विक ऊर्जेच्या क्षेत्रातही मोठ्या प्रमाणावर विस्ताराचे संकेत देण्यात आले आहेत. २०४७ पर्यंत आण्विक ऊर्जानिर्मितीचे १०० गिगावॉट क्षमतेचे लक्ष्य ठेवण्यात आले असून लहान आणि प्रगत अणुभट्ट्यांचा वापर वाढवण्यावर भर दिला आहे. औद्योगिक क्षेत्रालाही अणुऊर्जेचा वापर करण्याची परवानगी देण्याचा विचार या धोरणात मांडण्यात आला आहे. जलविद्युत क्षेत्राला यात धोरणात्मक महत्त्व देण्यात आले आहे. हवामानबदल आणि जलसुरक्षेच्या पार्श्वभूमीवर जलसाठा प्रकल्पांची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली आहे.अशा प्रकल्पांमुळे पूरनियंत्रण, सचन आणि स्थिर वीजपुरवठा या तिन्ही बाबींमध्ये फायदा होऊ शकतो.

**मजबूत यंत्रणा उभारण्याचे उद्दिष्ट**

वीज बाजारपेठेच्या दृष्टीने अधिक पारदर्शक, स्पर्धात्मक आणि समावेशक व्यवस्था निर्माण करण्यावर भर देण्यात आला आहे. लहान उत्पादकांना संधी देणे, करार प्रक्रियेचे सुलभीकरण आणि बाजारावर प्रभाव टाकणाऱ्या घटकांवर नियंत्रण ठेवण्यासाठी मजबूत यंत्रणा उभारण्याचे उद्दिष्ट या धोरणातून दिसून येते. प्रसारण यंत्रणेच्या बळकटीकरणासाठी दीर्घकालीन नियोजनाची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली असून 'सेंट्रल इलेक्ट्रिसिटी ऑथॉरिटी'ला यासाठी पाच आणि दहा वर्षांचे आराखडे तयार करण्याची जबाबदारी देण्यात आली आहे.

वाढत्या नूतनीकरणक्षम ऊर्जेच्या समावेशासाठी आणि मुक्त प्रवेश प्रणालीला चालना देण्यासाठी मजबूत प्रसारण नेटवर्क आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. ग्रीड व्यवस्थापनात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, ऊर्जा साठवण प्रणालींचा समावेश आणि संस्थात्मक सुधारणा यांद्वारे वीज प्रणाली अधिक कार्यक्षम करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. याचबरोबर सायबर सुरक्षेलाही विशेष महत्त्व देण्यात आले असून, वीज क्षेत्रातील सर्व माहिती देशातच साठवण्याची सक्ती आणि सायबर हल्ल्यांना तोंड देण्यासाठी सक्षम यंत्रणा उभारण्यावर भर हे उपाय योजण्यात आले आहेत. डेटा शेअरिंगला प्रोत्साहन देऊन नवोन्मेष आणि तंत्रज्ञानाधारित उपायांना चालना देण्याचा प्रयत्नही या धोरणात दिसून येतो.

कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डिजिटल साधनांचा वापर करून वीजक्षेत्र अधिक सक्षम आणि कार्यक्षम बनवण्याचा स्पष्ट प्रयत्न या मसुद्यातून जाणवतो. एकूणच राष्ट्रीय वीज धोरण भारताच्या ऊर्जाक्षेत्राला अधिक स्वच्छ, सक्षम, तांत्रिकदृष्ट्या प्रगत आणि बाजारकेंद्रित बनवण्याचा व्यापक आराखडा मांडते; मात्र या धोरणाचा खरा कस लागणार तो त्याच्या अंमलबजावणीत. राज्य सरकारे आणि वीज वितरण कंपन्या या धोरणातील तरतुदी प्रभावीपणे राबवू शकतील का आणि त्यातून सेवा गुणवत्तेत तसेच आर्थिक स्थितीत अपेक्षित सुधारणा घडवून आणू शकतील का, हेच आगामी काळात निर्णायक ठरणार आहे. गेल्या दोन दशकांमध्ये भारताने वीजक्षेत्रात मोठी झेप घेतली आहे.

एके काळी अंधारात असलेली गावे आता उजळली आहेत. उद्योगधंद्यांना सातत्यपूर्ण वीजपुरवठा मिळू लागला असून ऊर्जा ही विकासासाठी महत्त्वाची गरज बनली आहे. तथापि, या यशामागे काही गंभीर समस्या दडलेल्या आहेत. वितरण कंपन्यांचे वाढते कर्ज, अपुरे दरनिर्धारण, वीज चोरी आणि तांत्रिक तोटे या समस्यांनी संपूर्ण व्यवस्थेला आर्थिकदृष्ट्या कमकुवत केले आहे. त्यामुळेच नव्या धोरणात आर्थिक शिस्त, पारदर्शकता आणि कार्यक्षमतेवर विशेष भर देण्यात आला आहे. या धोरणातील सर्वात महत्त्वाचा बदल म्हणजे ऊर्जा स्त्रोतांबाबतचा दृष्टिकोन. पारंपरिकरीत्या भारताची वीजनिर्मिती मोठ्या प्रमाणावर कोळसा आणि इतर जीवाश्म इंधनांवर आधारित होती; परंतु हवामानबदलाच्या वाढत्या संकटाच्या पार्श्वभूमीवर आणि आंतरराष्ट्रीय बांधिलकी लक्षात घेता आता या अवलंबित्वात मोठी घट करण्याचा प्रयत्न सुरू आहे.

आगामी काळात सौर, पवन, जल आणि अणुऊर्जा यांसारख्या स्वच्छ स्त्रोतांचा वापर झपाट्याने वाढवण्याचा मानस या धोरणातून स्पष्ट होतो. जीवाश्म इंधनावर आधारित पारंपरिक वीज प्रकल्प पूर्णपणे बंद होणार नाहीत; पण त्यांची भूमिका बदलणार आहे. भविष्यात हे प्रकल्प 'बेसलोड' पुरवठादार न राहता 'बॅकअप' आणि 'ग्रीड स्थिरता' राखण्यासाठी वापरले जातील. यामुळे नूतनीकरणक्षम ऊर्जेतील चढउतार सांभाळणे शक्य होईल. याचबरोबर, या प्रकल्पांचा अधिक कार्यक्षम वापर करण्यासाठी लवचिक बनवण्यावर भर दिला जात आहे. त्यातूनच औद्योगिक प्रक्रियांसाठी उष्णतेचा वापर कवा शीतकरणासाठी वाफेचा उपयोग करण्यासारखे पर्याय पुढे येऊ शकतात.

**प्रा. सुखदेव बखळे**



# आखातातील बुद्धिबळ

बुद्धीबळ हा ६४ घरांचा खेळ. जिथे विजयासाठी योगायोग नाही, तर केवळ बुद्धीचातुर्य आणि तंत्रकौशल्याची गरज असते. आज अमेरिका, इस्त्रायल आणि इराण यांच्यात सुरू असलेला संघर्ष हा लष्करी युद्धापेक्षाही 'जागतिक बुद्धिबळाचा डाव' अधिक वाटू लागला आहे. या खेळात पहिल्या डावात वरचढ ठरणाऱ्या इराणला आता दुसऱ्या डावात अमेरिकेने आर्थिक आणि राजनैतिक कोंडीत पकडून जबरदस्त 'शह' दिला आहे.या युद्धाच्या सुरुवातीला अमेरिकेला असा कयास होता की, इराणसारखा खाडीतील छोटा देश महासत्तेच्या लष्करी दबावापुढे आठ दिवसांत शरणागती पत्करेल. मात्र, इराणने आपल्या 'मर्यादित' ताकदीचा वापर अत्यंत धोरणीपणे केला. आपली क्षेपणास्त्रे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे जागतिक तेलाच्या वाहतुकीची नाडी असलेल्या 'होर्मसची सामुद्रधुनी' बंद करण्याची धमकी देऊन इराणने अमेरिकेला वाटाघाटीच्या टेबलावर येण्यास भाग पाडले. ही इराणची पहिली यशस्वी चाल होती, ज्याने बलाढ्य अमेरिकेला आपले (वजीर, हत्ती आणि उंट) ज्याला लष्करी ताकद म्हटले जाते तात्पुरते मागे घेण्यास प्रवृत्त केले.

कोणत्याही खेळात प्रतिस्पर्ध्याला कमी लेखणे ही सर्वात मोठी चूक ठरते. इराणला वाटले की त्यांनी अमेरिकेसारख्या खेळाडूला 'पाणी पाजले' आहे. याच अति-आत्मविश्वासाच्या भरात इराणने पुढच्या चालींचा विचार केला नाही. अमेरिकेने या मधल्या काळात आपली रणनीती बदलली. इराण 'होर्मस' बंदरावर हक्क सांगून जागतिक व्यापाराला वेठीस धरत आहे आणि एकप्रकारे 'टोल वसुली' करून हुकूमशाही गाजवत आहे, असे चित्र अमेरिकेने आंतरराष्ट्रीय स्तरावर उभे केले. यामुळे इराणची सहानुभूती संपली आणि तो जगाच्या नजरेत 'खलनायक' ठरू लागला.अमेरिकेने आता थेट लष्करी कारवाईऐवजी 'आर्थिक नाकेबंदी'चा अमोघ पाश टाकला आहे. आखाती खाडीची घेराबंदी करून कोणत्याही देशाचे जहाज पुढे सरकणार नाही, अशी ताठर भूमिका घेतल्याने इराणची कोंडी झाली आहे. इराणची अर्थव्यवस्था पूर्णतः तेलावर अवलंबून आहे. जर तेल निर्यातच होणार नसेल, तर देश चालवायचा कसा? हा यक्षप्रश्न तिथल्या राज्यकर्त्यांसमोर उभा आहे.

अंतर्गत इंटरनेट सेवेवर निर्बंध असल्याने तिथल्या जनतेचे हाल जगासमोर येत नसले, तरी आर्थिक घसरण ही इराणसाठी 'स्लो पॉयझन' ठरणार आहे.

या डावातील सर्वात धक्कादायक चाल म्हणजे चीनची करण्यात आलेली कोंडी. इराणच्या तेलाचा सर्वात मोठा खरेदीदार चीन असल्याचे म्हटले जाते. पण अमेरिकेने आता जाहीर केले आहे की, जो देश इराणकडून तेल खरेदी करेल, त्यावर ५० टक्के अतिरिक्त शुल्क आकारले जाईल. यामुळे चीन समोर मोठे संकट उभे राहिले आहे. इराणकडून तेल घेणे आता चीनला आर्थिकदृष्ट्या परवडणारे नाही. पर्यायाने, इराणचा शेवटचा मोठा आधारही आता तुटण्याच्या मार्गावर आहे.

बुद्धीबळाच्या या दुसऱ्या डावात अमेरिकेने इराणला अशा वळणावर आणून ठेवले आहे, जिथे इराणचे 'चेकमेट' होणे जवळपास निश्चित दिसत आहे. इराणने पहिल्या डावात 'शौर्य' आणि 'जिद्द' दाखवली असली, तरी अमेरिकेने 'वेळ' आणि 'जागतिक अर्थकारण' या दोन मोहऱ्यांच्या जोरावर हा डाव आपल्या बाजूने फिरवला आहे. ज्या देशाची अर्थव्यवस्था कोलमडते, तो देश कितीही शस्त्रास्त्रे असली तरी फार काळ तग धरू शकत नाही, हेच या संघर्षाचे कटू सत्य आहे.

**अविनाश देशपांडे**

## जागतिक स्तरावर एकमेकांची जिरवाजिरवी नको

सध्या विविध कारणावरुन जगातील अनेक देशांत युद्धाचे सावट पसरले आहे. प्रत्येक देश आपली कमांड अथवा वर्चस्व वादातून लढाईच्या मैदानात उतरले आहेत त्याचेच प्रातिनिधिक उदाहरण द्यायचे झाल्यास अमेरिका, इस्त्राईल आणि इराण यांनी सामुद्रधुनी मार्गाचे कारण पुढे करत जागतिक तणाव निर्माण केला आहे. विविध मागण्या, प्रस्तावाच्या फेऱ्या, बैठका घेवून हि तणाव निवळतांना दिसेना जगातील सर्वचं देशानी कमीअधिक प्रमाणात विविध शोध लावले, युद्धजण्य साहित्याने आपण किती पुढे गेलो, प्रगती साधली याच्या आणाभाका मारतात मात्र हे सर्वकाही एकमेकांना शह देण्यासाठी आहे का? अनेकांची मस्ती जिरण्यासाठी याचा वापर करायचा का? यासारखे या युद्धामुळे अनेक प्रश्न निर्माण होता आहेत. या युद्धात अनेक निरागस लोक मयत झाले वित्तहानीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. याचा कुणालाच फायदा नाही मग याचा विचार का होईना हे देशांतील साम्राज उभे करायला अनेक वर्षे दिवस जातात.शांततेने मार्ग काढणे कधीही हिताचे आहे.

**राजू जाधव**

# सौर ऊर्जा : येणाऱ्या काळाची आत्यंतिक गरज

सौर ऊर्जा हा आजच्या काळातील अत्यंत महत्त्वाचा आणि पर्याव रणपूरक ऊर्जा स्त्रोत आहे. सूर्यप्रकाशाचा आणि सूर्यापासून मिळणाऱ्या उष्णतेचा वापर करून वीज निर्माण करणे शक्य असल्याने, ही ऊर्जा नवीकरणीय आणि अपार आहे. सौर ऊर्जा म्हणजे सूर्यकिरणांमधील उष्णता आणि प्रकाश यांचा वापर करून ऊर्जा मिळवणे. सौर पॅनल्स (फोटो वोलटिक सेल्स)द्वारे ही प्रकाश आणि उष्णतेच्या स्वरूपात मिळणारी ऊर्जा विजेमध्ये रूपांतरित केली जाते. भारतात, विशेषतः महाराष्ट्रात नाशिक, अमरावती, अकोला, नागपूर, चंद्रपूर ह्या व अशा अनेक भागांत सूर्यप्रकाश मुबलक असल्याने याचा इष्टतम उत्तम उपयोग ऊर्जा निर्मिती करण्यासाठी होऊ शकतो. तसेच देशातील ज्या ज्या प्रदेशात सूर्यप्रकाश मुबलक असेल त्या प्रत्येक ठिकाणी सौर ऊर्जा निर्माण करून वापरता येईल.


सोलर पॅनल (सौर फोटोव्होल्टिक सेल्स) निर्मिती ही सिलिकॉन-आधारित प्रक्रिया आहे, जी शुद्ध सिलिकॉन वेफर्सपासून सुरू होते आणि अखेरीस पॅनल जुळवणी पर्यन्त पोहोचते. ही प्रक्रिया पर्यावरणपूरक ऊर्जा निर्मितीसाठी उपयुक्त आहे, पण त्याचे फायदे आणि तोटे दोन्ही आहेत.सोलर पॅनल बनवण्यासाठी प्रथम सिलिकापासून शुद्ध सिलिकॉन काढून त्याला १५००° से. तापमानावर वितळवले जाते आणि क्रिस्टल ब्लॉक्स (इंगॉट्स) तयार केले जातात. हे ब्लॉक्स पातळ वेफर्समध्ये कापले जातात, त्यावर डोपिंग (फॉस्फरस आणि बोरॉनसारखे रसायने) करून एन-पी जंक्शन तयार केले जाते, आणि मेटल इलेक्ट्रोड्स जोडले जातात. नंतर अनेक सेल्स जोडून स्ट्रिंग्स बनवतात, ग्लास, EVA आणि बॅकशीटने लॅमिनेट करून त्यावत फ्रेम लावली जाते, आणि टेस्टिंगनंतर पॅकिंग होते.

सौरऊर्जेसंबंधी भारत सरकार अत्यंत सजग असून त्याकरिता सोलर प्रणाली बसविण्याकरिता सरकारने सबसिडी सुद्धा देऊ केली आहे. अनेक ठिकाणी जागरूक नागरिकांनी ही प्रणाली आपापल्या घरावर बसविली आहे व त्यापासून निर्माण होणाऱ्या विजेचा उपयोग देखील करुन घेत आहेत. ह्या ऊर्जा स्त्रोतामध्ये वाढ करवून घेण्याकरिता भारत सरकार अत्यंत प्रयत्नशील आहे. अनेक ठिकाणी मोठ मोठे तसेच जास्तीत जास्त विद्युत निर्मिती करण्याकरिता फार मोठे प्रकल्प राबविण्यात येत आहेत.भारतातील सर्वात मोठा सौर ऊर्जा प्रकल्प राजस्थानमधील जोधपूर जिल्ह्यातील भाडला सोलर पार्क हा आहे. हा प्रकल्प सुमारे १४,००० एकर (५६ चौरस किमी) क्षेत्रात पसरलेला असून त्याची वीज निर्मिती क्षमता २,२४५ मेगावॅट (MW) आहे, ज्यामुळे तो जगातील सर्वात मोठ्या सौर उद्यानांपैकी एक बनला आहे. ह्यातील मुख्य आवश्यकता म्हणजे मोठ्या प्रकल्पांसाठी खूप मोठ्या प्रमाणात जमीन लागते. त्यावरील दुसरा पर्याय म्हणजे पाण्यावर तरंगणारे सौर ऊर्जा प्रकल्प वाटली ना ऐकून गम्मत? असे कमी अधिक १० आणि जास्त, पाण्यावर तरंगणारे सौर ऊर्जा प्रकल्प भारतात आहेत. महाराष्ट्रात सोलापूर, उस्मानाबाद येथे मोठे सौर प्रकल्प आहेत, जे ग्रीडवर पूर्ण नियंत्रण देतात. असे अनेक सौर ऊर्जा प्रकल्प उभारून देशातील विजेची मागणी परिपूर्ण करण्याकरिता शासन जोरकस प्रयत्न करत आहे.

**प्रवीण पांडे**

# तुम्ही खाता त्या भाकरीवर बाबासाहेबांची सही हाय रं.

## संविधान चौकात भीम अनुयायींची गर्दी! डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी



**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ—भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त यवतमाळ शहरात अभूतपूर्व उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. शहरातील संविधान चौक येथे मध्यरात्रीपासूनच भीम अनुयायांची मोठ्या प्रमाणात गर्दी उसळली होती. "उद्धरली कोटी कुळे भीमा तुझ्या जन्मामुळे" या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.

कार्यक्रमाची सुरुवात बुद्ध वंदनेने करण्यात आली. त्यानंतर विविध सामाजिक संघटना व आंबेडकरी मित्र परिवाराच्या वतीने डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. हजारो अनुयायांनी पुतळ्याला हार अर्पण करून कृतज्ञता व्यक्त केली. पहाटेपासून ते दिवसभर नागरिक, सामाजिक कार्यकर्ते व राजकीय नेते मोठ्या संख्येने उपस्थित राहून अभिवादन करत होते. डॉ. आंबेडकर यांनी समाजातील वंचित, शोषित व उपेक्षित घटकांसाठी केलेल्या कार्याची यावेळी आठवण करून देण्यात आली. त्यांनी निर्माण केलेल्या संविधानामुळे देशात समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय या मूल्यांवर आधारित लोकशाही बळकट झाल्याचे मान्यवरांनी नमूद केले. त्यांच्या विचारांवर चालत समानतेवर आधारित समाज घडविण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले. यावेळी सामाजिक संघटनांच्या वतीने विविध उपक्रम राबविण्यात आले. विद्यार्थ्यांना "शिका, संघटित व्हा" या संदेशातून पेन व वहीचे वाटप करण्यात आले.

तसेच लॉर्ड बुद्ध कार्यालयासमोर रक्तदान शिबिराचे आयोजन करून भीम सैनिकांनी रक्तदानातून अभिवादन केले. संविधान चौक परिसरात दिवसभर सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल पाहायला मिळाली. गीत गायन, नृत्य, लेझीम नृत्य आदी कार्यक्रमातून बाबासाहेबांना मानवंदना देण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात निरज वाघमारे यांच्या भीम गर्जना ढोल पथकाने केली. तसेच पुस्तकप्रेमी डॉ. आंबेडकर यांच्या स्मरणार्थ विविध ग्रंथांचे स्टॉल मोठ्या प्रमाणात लावण्यात आले होते. युवकांनी या स्टॉलवरून पुस्तकांची खरेदी करत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

उपस्थितांसाठी सामाजिक संघटनांच्या वतीने भोजन, अल्पोपहार व मठ्ठा वितरणाची व्यवस्था करण्यात आली होती. एकूणच, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त यवतमाळ शहरात उत्साह, एकात्मता व सामाजिक जागृतीचे चित्र पाहायला मिळाले.

# हुडी बु. येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती साजरी

## संघर्षातून सफलतेकडे गेलेल्या भूमिपुत्रांचा केला गौरव

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पुसद - शुध्द विचारातुन सशक्त समाजाची निर्मिती होत असते आणि शुध्द विचार चांगल्या आचरणातून येत असतात आज समाजात चांगले आचरण आणि विचारांचा प्रभाव निर्माण करणे हे बाबासाहेबांच्या उद्देशाचा प्रचार व प्रसार आम्ही जयंतीनिमित्त केला पाहिजे.असे उदगार मा.भगवान हनवते (बुध्दिस्ट इंटरनॅशनल नेटवर्क, जिल्हाप्रभारी) यांनी समता बुध्द विहार हुडी बु.आयोजित भारतरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135व्या जयंती कार्यक्रमाच्या अध्यक्षीय मार्गदर्शनात मांडले.

समता बुध्द विहार समिती व भीम योध्दा ग्रूप हुडी बु.यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त "संघर्षातुन सफलतेकडे जाणाऱ्या विचारांचा सन्मान अशा अनोख्या विचारांची जयंती साजरी करून हुडी गावाच्या मातीशी नाळ जुळलेल्या सेवा निवृत्त व कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांचा भव्य सत्कार व सन्मान कार्यक्रम घेतला. कार्यक्रमाचे उद्घाटक मा.प्रकाश कांबळे (शिक्षक जि.प.शाळा हुडी बु)यांनी आपल्या मार्गदर्शनात समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या संविधानीक मुख्य तत्वावर आधारित समाजाची निर्मिती होणे आज काळाची गरज आहे असे मत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक बंडुभाऊ गंगावणे (बुध्दिस्ट इंटरनॅशनल नेटवर्क जिल्हाध्यक्ष) यांनी केले, कार्यक्रमाचे स्वागतअध्यक्ष संतोष कांबळे (मा. सरपंच)हे होते तर कार्यक्रमाला उपस्थित दिनेश हरणे (पो. पाटील) भारत कांबळे तंटामुक्ती अध्यक्ष, महानंदा भालेराव सरपंच हुडी,वानरे सर, जि.प.शाळा हुडी, शंकर कऱ्हे, अध्यक्ष गि.म.आश्रम शाळा हुडी, प्रमुख पाहुणे म्हणून या कार्यक्रमाला उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन समता बुध्द विहार आणि भीम योध्दा ग्रूप हुडी बु.यांनी केले तर आभार प्रदर्शन रोहित कांबळे यांनी केले. कार्यक्रमाला गावातील सर्व गावकरी समाज बांधव व महिला यांनी मोठ्या उत्साहात भाग घेतला होता.



# विजेने केला घात ! पाणी भरताना महिलेचा दुर्दैवी मृत्यू

## शास्त्रीनगर वणीत हृदयद्रावक घटना; परिसरात शोककळा

**जनमाध्यम प्रतिनिधी**

वणी - वणी शहरातील शास्त्रीनगर परिसरात आज एक दुर्दैवी घटना घडली असून विजेच्या धक्क्याने एका महिलेचा जागीच मृत्यू झाला.या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.



मृतक महिलेचे नाव सौ. छाया नंदकिशोर घुले (वय ३५, रा. शास्त्रीनगर वणी) असे आहे. मिळालेल्या माहितीनुसार,त्या आज आपल्या घरी मोटारद्वारे पाणी भरत असताना अचानक विजेचा जोरदार धक्का बसला. या अपघातात त्यांचा जागीच मृत्यू झाला. घटनेनंतर तात्काळ त्यांना ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र,डॉक्टरांनी तपासणीअंती त्यांना मृत घोषित केले.या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला.

त्यानंतर मृतदेहाचे शवविच्छेदन करण्यात आले असून मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला आहे.या आकस्मिक घटनेमुळे शास्त्रीनगर परिसरात शोककळा पसरली आहे.

## • वेचक

### खरेदी विक्री संघाच्यावतीने नाफेड ज्वारी नोंदणी करण्याचे आवाहन

राळेगाव - यवतमाळ जिल्हा मार्केटिंग अधिकारी यांच्या वतीने राळेगाव खरेदी विक्री संघाच्या माध्यमातून नाफेडची ज्वारी खरेदी करण्याचे शासनाने ठरविले असून त्या अनुषंगाने दिनांक 13/4/2026 पासून 30/4/2026 पर्यंत ज्वारी नोंदणी करण्याचे ठरविले असून ज्वारी नोंदणी करताना खालील गोष्टी लक्षात घेऊन नोंदणीसाठी खरेदी विक्री संघाच्या कार्यालयात यावे. अर्जदाराचा नोंदणी अर्ज, अद्यावत 7/12 सन 2025-26 ऑनलाईन ज्वारी ई -पिक पेरा असलेला असावा. आधार कार्ड झेरॉक्स ,बॅक पासबुक झेरॉक्स, शेतकऱ्यांनी नोंदणीसाठी स्वतः हजर राहून लायू फोटो द्यावा लागेल न दिल्यास नोंदणी होणार नाही . सोबतच शासनाने ठरवून दिलेल्या निकषानुसार फक्त एफ.ए. क्यू दर्जाची ज्वारी खरेदी करण्यात येईल. तरी ज्वारी नोंदणी करण्यासाठी व्यवस्थापक संजय जुमडे मो.न.9689064356 व लेखापाल गणेश हिवरकर मो.न.8806298525/9579984161 यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन खरेदी विक्री संघाचे संचालक श्रावणसिंग वडते सर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.



### राळेगावात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात ; सामाजिक ऐक्याचा दिला संदेश

राळेगाव - संपूर्ण देशभर भारतरत्न, क्रांतिसूर्य, महामानव डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात आणि अभिमानाने साजरी होत असताना यवतमाळ जिल्ह्यातील राळेगाव तालुकाही या उत्सवात मागे राहिला नाही. तालुक्यातील प्रत्येक गावात, वस्तीमध्ये आणि शैक्षणिक संस्थांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक उपक्रमांनी जल्लोषात साजरी करण्यात आली. रायगाव शहरात देखील जयंतीनिमित्त विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सकाळच्या सत्रात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर शहरातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीत तरुणाई, महिला, विद्यार्थी आणि विविध सामाजिक संघटनांचा उत्स्फूर्त सहभाग पाहायला मिळाला. ढोल-ताशांच्या गजरात, घोषणाबाजीत आणि निळ्या झेंड्यांच्या लहरत्या वातावरणात संपूर्ण शहर बाबासाहेबांच्या विचारांनी भारावून गेले होते. या कार्यक्रमादरम्यान अनेक मान्यवरांनी आपल्या मनोगतातून डॉ. आंबेडकर यांच्या कार्याचा गौरव केला. त्यांच्या सामाजिक न्याय, समानता, शिक्षण आणि मानवतेच्या विचारांचा आजच्या पिढीने अंगीकार करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. "शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा" हा संदेश आजही तितकाच प्रेरणादायी असल्याचे वक्त्यांनी अधोरेखित केले. यावेळी विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, चित्रकला स्पर्धा यांसारखे उपक्रम घेण्यात आले. तसेच सामाजिक जनजागृतीसाठी विविध विषयांवर व्याख्याने आयोजित करण्यात आली. काही ठिकाणी स्वच्छता अभियान आणि समाजोपयोगी उपक्रम राबवून जयंतीला सामाजिक बांधिलकीची जोड देण्यात आली. महिलांचा सहभागही विशेष उल्लेखनीय होता. त्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम, भीमगीतांच्या सादरीकरणातून वातावरण भारावून टाकले. तरुणांनीही मोठ्या प्रमाणावर पुढाकार घेत आयोजन यशस्वी केले. राळेगाव सह संपूर्ण राळेगाव तालुक्यात साजऱ्या झालेल्या या जयंती सोहळ्याने सामाजिक एकात्मता, बंधुता आणि प्रगतीचा संदेश दिला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची प्रेरणा घेऊन समाज अधिक सक्षम आणि सजग करण्याचा संकल्प नागरिकांनी व्यक्त केला. एकूणच, राळेगावातील हा जयंती उत्सव केवळ औपचारिक न राहता तो सामाजिक जागरूकता, ऐक्य आणि परिवर्तनाचा संदेश देणारा ठरला.

# माणसाने माणसाचा आदर करणे हाच ईस्लामचा मूळ संदेश : प्रा. सोहेल आमीर

**जनमाध्यम प्रतिनिधी**

उमरखेड - "मने मिळवण्यासाठी एकमेकांच्या जवळ येणे गरजेचे आहे. आज जगात जे विभाजन होत आहे, त्याचे मुख्य कारण म्हणजे मनुष्य स्वतःला मोठे समजत आहे. वास्तविकता ही आहे की, सर्व मानव एकाच निर्मात्याची लेकरे आहेत. एकमेकांचा आदर करणे हाच इस्लामचा मूळ संदेश असून, हाच विचार आपल्याला जगात पुढे घेऊन जाईल," असे प्रतिपादन प्रसिद्ध वक्ते प्रा. सोहेल आमीर यांनी केले.

जमाअत-ए-इस्लामी हिंद, शाखा उमरखेडच्या वतीने दिनांक १२ एप्रिल रोजी स्थानिक अनंतराव देवसरकर सभागृहात एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, त्याप्रसंगी ते मुख्य मार्गदर्शक म्हणून बोलत होते. रोजाच्या आध्यात्मिक पैलूंवर प्रकाश टाकताना प्रा. आमीर म्हणाले की, "रोजा म्हणजे 'थांबणे'. ईश्वराच्या आदेशासाठी माणूस आपल्या हक्काच्या अन्नापासून आणि पेयापासून दूर राहतो. जर आपण ११ महिने हराम कमाई आणि व्यसनांपासून दूर राहिलो, तरच खऱ्या अर्थाने रोजाचे उद्दिष्ट साध्य होईल. पत्नीवर वाईट दृष्टी टाकू न शकणारा माणूस इतरांच्या माता-भगिनींकडे वाईट नजरेने कसा पाहू शकतो? हेच रोज़ा शिकवतो.




सामाजिक बांधिलकी आणि शांतता - समाजात शांतता प्रस्थापित करण्यासाठी 'निर्मात्याची ओळख' (ईशभय) असणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. जर प्रत्येकाला आपण ईश्वराच्या देखरेखीखाली आहोत याची जाणीव झाली, तर गुन्हेगारी आणि द्वेष आपोआप संपेल. "जर तुम्हाला काही जाळण्याची इच्छा असेल, तर गरिबांची चूल पेटवा," असे भावनिक आवाहन करत त्यांनी गरिबांच्या गरजा पूर्ण करणे आणि मुलांना नैतिक शिक्षण देणे हीच खरी समाज विकासाची ऊर्जा असल्याचे स्पष्ट केले. या कार्यक्रमातून 'प्रेम आणि बंधुत्व' असलेला भारत घडवण्याची प्रार्थना करण्यात आली. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून भन्ते किर्ती बोधी ,अकील मिर्झा जिल्हा संघटन यवतमाळ ,शेख नईम पुसद ,हनुमंतराव गायकवाड ,विजय बेतेवाड , शंकर पांचाळ ,शिवाजीराव वानखेडे , विजय रेघाटे,डॉ .आशिष खांबाळकर ,डॉ .दळवी, प्रा धनराज तायडे सह शहरातील नागरिक आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मोघे महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती उत्साहात साजरी

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पांढरकवडा : येथील शिवरामजी मोघे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अजय सोळंके होते. प्रमुख अतिथी म्हणून प्रा. डॉ. अरुण दसोडे, प्रा. डॉ. विनोद चव्हाण व प्रा. पुरुषोत्तम उदार उपस्थित होते. यावेळी मान्यवरांनी डॉ. आंबेडकर यांच्या विचारांवर प्रकाश टाकत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. अजय सोळंके यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सांगितले की, "डॉ. आंबेडकर यांनी शिक्षणाला दिलेले महत्त्व प्रत्येक विद्यार्थ्याने आत्मसात केले पाहिजे. त्यांच्या विचारांमुळे समाजाला समानतेची दिशा मिळाली असून विद्यार्थ्यांनी ज्ञानाच्या बळावर स्वतःचा व देशाचा विकास साधावा." प्रा. डॉ. उल्हास राठोड यांनी सांगितले की, "डॉ. आंबेडकर यांचे जीवन संघर्ष, परिश्रम आणि आत्मविश्वास यांचे उत्तम उदाहरण आहे." प्रा. डॉ. अरुण दसोडे यांनी भारतीय संविधान निर्मितीत त्यांच्या अतुलनीय योगदानाचा उल्लेख करत लोकशाही मूल्य जपण्याचे आवाहन केले. तसेच प्रा. डॉ. राहुल दखणे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. आंबेडकर यांच्या विचारांचा अवलंब करून सामाजिक विषमता दूर करण्याची गरज व्यक्त केली. कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कर्मचारी वर्ग उपस्थित होता. राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभागाच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. डॉ. अमर वंजारी यांनी विशेष परिश्रम घेतले.



# वरुड (ज) संस्कार केंद्रात महात्मा फुले जयंती उत्साहात शिक्षण, संस्कार व ग्रामविकासाचा दिला संकल्प

**जनमाध्यम प्रतिनिधी**

राळेगाव - बाल संस्कार केंद्र, वरुड (ज) येथे क्रांतिसूर्य समाजसुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. रासेयो, कला व वाणिज्य महाविद्यालय राळेगावद्वारे संचालित या संस्कार केंद्रात विविध शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांनी कार्यक्रमाला विशेष रंगत आणली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंकिता मेश्राम यांनी केले, तर अध्यक्षस्थान सोनालीताई सोनारकर (अंगणवाडी सेविका) यांनी भूषविले. प्रमुख वक्त्या म्हणून ग्रामपंचायत सदस्या व समाजकार्यकर्त्या ज्योत्स्नाताई उईके उपस्थित होत्या. संस्कार केंद्रातील विद्यार्थी पुष्कर आडे, पूर्वी राऊत, प्रेम आडे आणि ओम वाघाडे यांनी मनोगत व्यक्त करत शिक्षण, संस्कार आणि सामाजिक जबाबदारीचे महत्त्व अधोरेखित केले. प्रमुख वक्त्या ज्योत्स्नाताई उईके यांनी मार्गदर्शन करताना लहान मुलांनी अभ्यास करून सुशिक्षित नागरिक बनावे, व्यसनांपासून दूर राहावे आणि समाजकार्यातून गावाच्या विकासात योगदान द्यावे, असे आवाहन केले. विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आधारित गीत सादर करून कार्यक्रमाला सांस्कृतिक रंग दिला. अध्यक्षीय भाषणात सोनालीताई सोनारकर यांनी संस्कार केंद्रामुळे मुलांचा आत्मविश्वास वाढतो, योग्य संस्कार घडतात आणि व्यक्तिमत्व विकासाला चालना मिळते, असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन आकांशा आडे यांनी केले. संपूर्ण कार्यक्रमाची रूपरेषा प्रा. पंकजभाऊ आत्राम यांनी आखली होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अनिकेत मेश्राम, विकास सुरपम, जगदीश नेहारे, रोहन आडे, हर्षल नेहारे, ओम पवार व दक्ष आडे यांनी सहकार्य केले.



# नगर परिषद सभागृहात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

**जनमाध्यम प्रतिनिधी**

वणी - येथील नगर परिषदेच्या सभागृहात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करून जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमाला नगर परिषदेचे उपाध्यक्ष राकेश बुग्गेवार, मुख्याधिकारी डॉ.सचिन गाडे, सर्व समित्यांचे सभापती,विभाग प्रमुख तसेच कर्मचारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रारंभी उपस्थितांनी डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यानंतर उपाध्यक्ष राकेश बुग्गेवार,मुख्याधिकारी डॉ. सचिन गाडे,नगरसेवक अजय धोबे,नगरसेवक रवी बेलुरकर, तेजस्विनी गव्हाणे तसेच प्रशासन अधिकारी गजानन कासावार यांनी आपल्या मनोगतातून डॉ.आंबेडकर यांच्या जीवनातील विविध पैलूंवर प्रकाश टाकला. त्यांनी भारतीय संविधान निर्मितीत दिलेल्या मोलाच्या योगदानाचा गौरव करत त्यांच्या संघर्षमय जीवनातून प्रेरणा घेऊन प्रत्येकाने आपल्या जीवनात प्रगतीचा मार्ग स्वीकारावा,असे आवाहन यावेळी करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उत्तम हापसे यांनी केले,तर आभार प्रदर्शन उपमुख्याधिकारी जयंत सोनटक्के यांनी मानले.



# बाबासाहेबांच्या जयंतीदिनी महिलांची नृत्यातून अभिवादन

**जनमाध्यम प्रतिनिधी**

घाटंजी - बोधिसत्व, भारतीय घटनेचे शिल्पकार, विश्वरत्न तसेच आपल्या देशातील तमाम नागरिकाचे उद्धारकर्ते डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती आपल्या देशातच नव्हे तर जगा, तील 192 देशात साजरी केल्या जाते. त्याच महामानवाची 136 वी जयंती घाटंजी येथे मोठ्या उत्साहात साजरी झाली.

खरं तर गीत व नृत्याच्या माध्यमातून ते मानवंदना दिली आहे. पण त्या त्यामधून त्यांनी जगाला तथागत भगवान गौतम बुद्धांनी दिलेली शिकवण बाबासाहेबाचं बालपण, शिक्षण व त्यांनी केलेले क्रांतिकार्य यांचा आढावा घेतलेला आहे. एवढेच नाही तर हा देश ज्या घटनेवर चालतो त्या घटनेची प्रास्ताविकेपासूनच त्यांनी सुरुवात केलेली आहे. त्याहूनही विशेषता म्हणजे प्रास्ताविका झाल्यानंतर राष्ट्रगीतासही



त्यात महत्व देण्यात आले आहे. घाटंजीत सर्वप्रथम होणाऱ्या या कार्यक्रमाच्या संयोजिका मनीषा देवतळे, सरिता नगराळे कोरिओग्राफर दीक्षा ढोके, साक्षी मनोहर, प्रज्ञा लढे, मंदा करमणकर, संजीवनी मुनेश्वर पुष्पा शेंडे, प्रेरणा वावरे सह इतर भगिनी सहभागी झाल्या होत्या. या कार्यक्रमाला त्रिरत्न बुद्ध विहार समिती गाडगेबाबा नगर व जयंती उत्सव समिती घाटंजी यांचे सहकार्य लाभले आहे. कार्यक्रमाचे संचालन बंटी भाऊ अटारा तर आभार मनीषा देवतळे यांनी केले.

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना शिवसेनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी केले अभिवादन

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त आज दि.१४ एप्रिल मंगळवार रोजी यवतमाळ शहरातील संविधान चौक येथे त्यांच्या स्मारकासमोर शिवसेनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी एकत्र येत पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी शिवसेनेचे पश्चिम विदर्भ सह-संपर्कप्रमुख परागभाऊ पिंगळे यांच्यासह सौं. चैताली निलेश बेलोकार गट नेता तथा न. प. सदस्य सौं. पूजा मंगल गायकी न. प. सदस्य सुरेश भाऊ चिंचोलकर प्रवीण निमोदिया राजूभाऊ चांदेकर घनश्याम नगराळे प्रद्युमन जावळेकर आकाश परतेकी न. प. सदस्य रुपेश सरडे प्रदीप कामळे पवन खडसे शिवसेनेच्या सर्व आघाडीचे प्रमुख पदाधिकारी, शिवसैनिक उपस्थित होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या समता, स्वातंत्र्य व न्यायाच्या मूल्यांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला.



# केळापूर तालुका काँग्रेसच्यावतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन



**जनमाध्यम प्रतिनिधी**

पांढरकवडा : शहर केळापूर तालुका काँग्रेसच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कृतज्ञता व्यक्त केली.

या कार्यक्रमास माजी तालुका अध्यक्ष अमर पाटील चालबर्डीकर, तालुका अध्यक्ष ॲड. अनिल किनाके, जिल्हा अध्यक्ष (आदिवासी काँग्रेस, यवतमाळ) मनोज भोयर, राज्य उपाध्यक्ष (राजीव गांधी पंचायत राज) राजीव गांधी, शहर अध्यक्ष अनिस पोसवाल, युवक काँग्रेस अध्यक्ष संतोष राऊत, काझी साहेब, सौ. सुमित्रा टेकाम, ठाकरे सर, ॲड. शेंडे साहेब, हाफिज पोसवाल, इकराम अली, करीम मामू, खालीक पटेल, शेषराव जिद्देवार, दिलीप गावंडे, उगले सर, पप्पू रेकेवार, बंडू वाघाडे, स्वामी भाऊ, भिमसिंग राठोड, शहर अध्यक्ष प्रिती मेश्राम, डॉ. प्रेरणा उगले मॅडम, विठ्ठल आडे यांच्यासह अनेक काँग्रेस कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी उपस्थितांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या विचारांचे स्मरण केले.

# भारत-अमेरिका कराराच्या विरोधात किसान मजूर कामगारांचे आंदोलन

## किसान सभेचा पुढाकार

**कुऱ्हा/वार्ताहर**

व्यापाराच्या क्षेत्रामध्ये अमेरिकेसारख्या विकसित देशासोबत भारतासारख्या शेतकरी आत्महत्याग्रस्त देशाची स्पर्धा लावणे म्हणजे कमजोराचा पराभव व शक्तीशालीचा विजय हेच मैदानी सत्य आहे .एकूणच देशाला पराभूत स्थितीकडे नेण्यारा, गुलामगिरीकडे नेण्यारा हा करार असून तो देश विरोधी असून महाराष्ट्र राज्य किसान सभा ,महाराष्ट्र राज्य लालबावटा शेतमजूर युनियन, आयटक यांचे संयुक्त सहभागाने जिल्हाधिकारी कार्यालयावर आंदोलन करण्यात आले.



याप्रसंगी प्रा. साहेबराव विधळे (प्रकल्पग्रस्तांच्या चळवळीचे नेते) प्रा. विजय रोडगे( मार्क्सवादी विचारवंत) अशोक सोनारकर( किसान सभेचे राज्य सरचिटणीस) कॉ. सुनील मेटकर (भाकप जिल्हा सचिव) कॉ. संजय मंडवधरे (राज्य सचिव शेतमजूर युनियन) यांनी केलेल्या मार्गदर्शना मधून कराराच्या विविध बाजू स्पष्ट झाल्या.शेती व शेतकरी प्रचंड संकटात असताना त्याला इलाज करणे ऐवजी त्याच्या संकटात अधिक वाढ करणारा सदर करार आहे. म्हणून भारत-अमेरिका व्यापार करार रद्द करावा .याकरता प्रामुख्याने या आंदोलन होते.

देशातील शेतीवर काम करणाऱ्या शेतमजुराला बारमाही काम मिळण्याकरिता मोठ्या जनआंदोलनातून मनरेगा कायदा पुढे आला. तो संपवून त्याचे जागी जी ग्रामजी योजना पुढे आणली.यात महात्मा गांधींचा द्वेष व शेतमजुराला ३६५ दिवसाचा रोजगार नाकारणे .ह्या प्रमुख बाबी आहेत. म्हणून मनरेगा पूर्वस्थितीमध्ये कायम करा.तसेच स्वातंत्र्यपूर्व कालखंडापासून देशामध्ये कामगारांची चळवळ सुरू आहे. आपल्या आर्थिक सुरक्षा , सामाजिक सुरक्षा करीता मोठा लढा लढलेत.ज्यामधून कामगार कायद्याचे निर्माण झाले. त्या सर्व कायद्यांना एका बासणात बांधून केवळ कामगार विरोधी चार श्रमसंहिता सरकारने पुढे केल्या. त्या मागे घ्या. या आंदोलनाच्या मागण्या होत्या. जिल्हाधिकारी यांच्यामार्फत प्रधानमंत्री व राष्ट्रपती महोदयांना पाठवलेल्या निवेदनामध्ये उपरोक्त मागण्यांचा समावेश आहे.

सदर आंदोलनात कम्युनिस्ट शाहीर धम्माजी खडसे यांचा क्रांतिकारी गीताचा कार्यक्रम झाला. याप्रसंगी डॉ. ओमप्रकाश कुटेमाटे( जिल्हा सचिव किसान सभा) सुनील घटाळे(जिल्हा कार्याध्यक्ष शेतमजूर युनियन) यांची मार्गदर्शक भाषणे झाली.आंदोलनामध्ये, विनोद जोशी ,जे एम कोठारी, निळकंठ ढोके, शरद मंगळे, लताताई सोनारकर, उमेश बनसोड, जयेंद्र भोगे, प्रतिभामेश्राम ,ज्ञानेश्वर मेश्राम, मनोहर वाढनकर ,संतोष राऊत, चंद्रकांत बानू बाकोडे, त्र्यंबक संभावित, चंद्रकांत वडसकर, अशोक काळे, राजाभाऊ बाभुळकर जितेंद्र कोरडे, विनोद तरेकर, विजया गावंडे, माधुरी काकडे, अर्चना गोंधळी ,किसनराव चौधरी, मालाताई वानखडे, इस्त्राईल शहा ,विजय चव्हाण, लिलेश्वर आगळे, बाबाराव इंगळे, धनंजय मस्के, अ. हाजी अ. हमीद , मनोज अडकणे, संदीप उके, नंदू नेतनराव, अशोकराव राऊत यांचे सह ग्रामीण भागातील विविध तालुक्यातील आंदोलनकर्त्यांचा समावेश होता.

# मनपा क्षेत्रात १ लाखांवरील ८७६ मालमत्ता थकबाकीदारांची यादी जाहीर

**अमरावती/का.प्र.**

शहरातील वाढत्या मालमत्ता कर थकबाकीच्या पार्श्वभूमीवर अमरावती महानगरपालिकेने कठोर पाऊल उचलत एक लाख रुपयांपेक्षा जास्त थकबाकी असलेल्या मालमत्तांची यादी जाहीर केली आहे. झोन क्र. १ ते ५ मधील तब्बल ८७६ मालमत्तांचा या यादीत समावेश आहे.

महानगरपालिका आयुक्त वर्षा लड्डा यांनी याबाबत माहिती देताना सांगितले की, शहराच्या विकासकामांसाठी मालमत्ता कर हा प्रमुख महसुलाचा स्रोत आहे. मात्र अनेक नागरिकांनी दीर्घकाळापासून कर न भरल्यामुळे महानगरपालिकेच्या उत्पन्नावर परिणाम होत आहे. ही परिस्थिती लक्षात घेऊन थकबाकीदारांवर कारवाई करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या अंतर्गत एक लाख रुपयांपेक्षा जास्त थकबाकी असलेल्या ८७६ मालमत्तांची यादी तयार करून ती महानगरपालिकेच्या अधिकृत वेबसाईटवर प्रकाशित करण्यात आली आहे. नागरिकांना आपले नाव या यादीत आहे का, हे तपासण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. संबंधितांनी तातडीने थकबाकी भरून महानगरपालिकेला सहकार्य करावे, असे आवाहन आयुक्तांनी केले आहे.

महानगरपालिकेने स्पष्ट इशारा दिला आहे की, वारंवार सूचना देऊनही कर न भरल्यास संबंधित मालमत्तांवर जप्ती, सीलिंग किंवा इतर कायदेशीर कारवाई केली जाऊ शकते. त्यामुळे थकबाकीदारांनी विलंब न करता आपली देयके भरावीत, असे अमरावती महानगरपालिकेने सांगितले आहे.

शहरातील पायाभूत सुविधा, रस्ते, स्वच्छता आदी सेवांसाठी निधी उपलब्ध राहण्यासाठी कर वसुली वेळेत होणे गरजेचे आहे. थकबाकीदारांनी पुढाकार घेऊन आपली जबाबदारी पार पाडावी, असे आवाहन अमरावती महानगरपालिका आयुक्त वर्षा लड्डा यांनी केले आहे.

# पावसाळ्यापूर्वी शाळांमध्ये दुरुस्ती पूर्ण करा

## विद्यार्थ्यांच्या सुरक्षेला प्राधान्य-आयुक्त लड्डा

**अमरावती/का.प्र.**

महानगरपालिका शिक्षण विभागाची आढावा बैठक नुकतीच आयुक्त वर्षा लड्डा यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीत महानगरपालिका शाळांची संख्या, विद्यार्थ्यांची उपस्थिती, राबविण्यात येणारे उपक्रम तसेच शाळांमधील भौतिक व आधुनिक सुविधांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

बैठकीस अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त नरेंद्र वानखडे, शिक्षण अधिकारी डॉ. प्रकाश मेश्राम, जनसंपर्क अधिकारी भूषण पुसदकर, उपअभियंता लक्ष्मण पावडे, शाळा निरीक्षक योगेश पखाले, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी पंकज सपकाळ आदी अधिकारी उपस्थित होते.



यावेळी आयुक्त वर्षा लड्डा यांनी पावसाळ्यापूर्वी सर्व शाळांमध्ये आवश्यक किरकोळ दुरुस्ती तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश दिले. यामुळे विद्यार्थ्यांना अध्ययन-अध्यापन करताना कोणतीही अडचण किंवा अपघाताचा धोका निर्माण होणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच महानगरपालिका अंतर्गत चालवल्या जाणाऱ्या शाळांची एकूण संख्या, परिक्षेत्रातील सर्व व्यवस्थापनांच्या शाळांची माहिती, विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणाऱ्या सुविधा, दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणारे उपक्रम आणि डिजिटल सुविधांचा विस्तार यावरही सविस्तर चर्चा करण्यात आली.

शाळांमध्ये उपलब्ध असलेल्या सुविधांमध्ये डिजिटल बोर्ड, वॉटर कुलर, ण्णऊन्न कॅमेरे, संगणक कक्ष, ग्रंथालय, प्रयोगशाळा, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, साऊंड सिस्टिम, क्रीडा साहित्य तसेच नवीन इमारत बांधकाम, शौचालय व सुरक्षा भिंतींचे बांधकाम आणि दुरुस्ती यांचा समावेश आहे. या सर्व सुविधांची स्थिती आणि आवश्यक सुधारणा याबाबत आयुक्तांनी अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली.विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसह दर्जेदार शिक्षणासाठी आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यावर महानगरपालिकेचा भर असल्याचेही यावेळी अधोरेखित करण्यात आले.

# नाफेड केंद्रावरील बारदाना संपणे सरकारचा नाकर्तेपणा

## तीन दिवसात खरेदी सुरू करा अन्यथा तहसीलवर धडकणार

**नांदगाव खंडेश्वर/वार्ताहर**

बारदाना संपला आहे कारण पुढे करून नाफेड मार्फत होत असलेली तूर व चना खरेदी १५ दिवसापासून बंद ठेवणे हा शासकीय यंत्रणेचा नाकर्तेपणा असून



शेतकऱ्यांसोबत विश्वासघात आहे असा आरोप करीत बारदाना उपलब्ध करून तीन दिवसात नाफेडची खरेदी सुरू करा अन्यथा शेतकऱ्यासह तहसील कार्यालयावर धडक देऊन ठिय्या आंदोलन करू असा इशारा शिवसेना ठाकरे गटाचे प्रकाश मारोटकर यांनी तहसीलदार यांना निवेदनाद्वारे दिला आहे. या निवेदनाची प्रत जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना सुद्धा देण्यात आली.

२९ मार्चपासून नांदगाव केंद्रावरील नाफेडची तूर व चना खरेदी बारदाना अभावी बंद आहे. एक ते दीड महिन्याच्या कालावधीतच खरेदीमध्येच बारदाना संपतो हे प्रशासकीय यंत्रणेचे ढिसाळ नियोजन असून शासनाचे अपयश म्हणावे लागेल. खरेदी केंद्र बंद असल्याचा फायदा व्यापारी घेत आहे शेतकऱ्याला आपला माल मातीमोल भावाने विकण्याची वेळ आली आहे. निसर्गाच्या लहरीपणाने शेतकरी आधीच होरपळला असून बारदाण्याअभावी खरेदी बंद असणे हा व्यापाऱ्यांसोबत साठेलोटे असल्याचा प्रकार तर नाही ना?शासन व प्रशासकीय यंत्रणा मूग गिळून का बसली असा आरोप निवेदना मधून करण्यात आला असून तीन दिवसात बारदाना उपलब्ध करून तूर व चना खरेदी सुरू करा अन्यथा शेतकऱ्यासह तहसील कार्यालयातच ठिय्या आंदोलन करू असा इशारा प्रकाश मारोटकर यांनी प्रशासनाला देण्यात आला निवेदन देतेवेळी शिवसेना विधानसभा समन्वयक प्रकाश मारोटकर बाळासाहेब राणे, न प सभापती वासुदेव लोखंडे, निलेश इखार, लीलाधर चौधरी, नंदू राणे, शुभम रावेकर, अक्षय हिवराळे, पवन शिरभाते यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

## महाराष्ट्र होमिओ डॉक्टर्स असोसिएशनतर्फे

# डॉ.हॅनीमन जयंती व डॉ. श्रीरामजी धर्माळे स्मृती गुणगौरव पुरस्कार

**अमरावती/का.प्र.**

हॉटेल ग्रेस इन राजापेठ अमरावती येथे सायंकाळी ६ वा महाराष्ट्र होमिओ डॉक्टर्स असोसिएशन कडून आयोजित होमिओपॅथी चे जनक डॉ. सॅम्युअल हॅनीमन यांची २७१ वी जयंती आणि डॉ. श्रीरामजी धर्माळे स्मृती गुणगौरव पुरस्कार व सत्कार समारंभ उत्साहात साजरा करण्यात आला.उदघाटक आणि प्रमुख अतिथी म्हणून उपमहापौर सचिन भेंडे यांची उपस्थिती लाभली.



मंचावर MHDA अध्यक्षा डॉ. स्वाती लबडे-पडोळे,सचिव डॉ. नंदकिशोर भुतडा, IPP डॉ. अशोक उमप, PP फोरम अध्यक्ष डॉ. शशांक दुबे, लेडी विंग चेअरपर्सन डॉ. शितल आचार्य , प्रकल्प प्रमुख आणि उपाध्यक्ष डॉ. मनोज चौधरी,व्याख्याते डॉ. रंजन बेलसरे, उपस्थित होते.प्रकल्प प्रमुख डॉ. मनोज चौधरी यांनी प्रकल्प अहवाल सादर केला आणि डॉ. संदीप बुटे व डॉ. वैशाली टेंभे यांनी त्यांना सहकार्य केले.अध्यक्षीय भाषणात डॉ. स्वाती पडोळे यांनी संघटनेबद्दल माहिती दिली.यावेळी उपमहापौरांचा शाल,श्रीफळ आणि स्मृतिचिन्ह देऊन संघटनेतर्फे सत्कार करण्यात आला.

डॉ. श्रीरामजी धर्माळे स्मृती गुणगौरव पुरस्कार वैद्यकीय आणि सामाजिक सेवा समर्पित सत्कार जेष्ठ होमिओपॅथी डॉ. इंदरलाल गेमनानी यांचा शाल,श्रीफळ आणि स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. होमिओपॅथी मध्ये गुणवत्ता प्राप्त तखतमल कॉलेज चे विध्यार्थी अंजली जणबंधू व मोहंमद अदनान यांना पुरस्कार वितरित करण्यात आले.संघटनेचे संचालक डॉ. संदीप बुटे यांनी व्याख्याते डॉ. रंजन बेलसरे यांचा परिचय सभागृहाला करून दिला.संघटनेकडून शाल, श्रीफळ स्मृतिचिन्ह देऊन डॉ. रंजन बेलसरे यांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाचे प्रमुख आयोजक डॉ. आशिष धर्माळे, डॉ. अनुप विधळे, डॉ. नेहा विधळे-धर्माळे, डॉ. शुभम निचळ, डॉ. नीलांबरी निचळ यांचे विशेष सहकार्य लाभल्यामुळे संघटनेकडून धर्माळे कुटुंबियांचा विशेष सत्कार करण्यात आला.आभार प्रदर्शन सचिव डॉ. नंदकिशोर भुतडा संचालन पूर्वाध्यक्ष डॉ. विवेक पिहूलकर आणि डॉ. शितल चौधरी यांनी केले.कार्यक्रमाला संघटनेचे सर्व सन्माननीय पूर्वाध्यक्ष, संपूर्ण कार्यकारिणी तालुका प्रतिनिधी महिला डॉक्टर्स मोठ्या संख्येत उपस्थित होते.कार्यक्रमांची माहिती संघटनेच्या प्रसिद्धी प्रमुख डॉ. वैशाली टेंभे व सहप्रसिद्धी प्रमुख डॉ. प्रज्ञा घाटोळ यांनी दिली.

# जिल्ह्यात स्थापन होणार१०१ हनुमान चालिसा पठण केंद्र

## आंतरराष्ट्रीय विहिंपचे प्रमुख प्रवीण तोगडीया यांची माहिती

**अमरावती/का.प्र.**

जिल्ह्यात १०१ तसेच देशभरात एक लाख हनुमान चालिसा पठण केंद्र स्थापन करून त्या माध्यमातून हिंदूंना सक्षम, समृद्ध,निरोगी व रोजगारक्षम करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभारणार असल्याची माहिती आंतरराष्ट्रीय विहिंपचे प्रमुख प्रवीण तोगडीया यांनी दिली.

प्रवीण तोगडीया सोमवारी अमरावती दौऱ्यावर आले असता, त्यांनी पत्रकारपरिषदेत माहिती दिली. प्रत्येक गावातील



मंदिरात रोज सायंकाळी हनुमान चालिसा पठण सुरू करण्यात येईल. या धार्मिक कार्यक्रमासोबतच हिंदू बांधवांची आरोग्य तपासणी, उपासमार होणाऱ्या हिंदूंसाठी अन्नधान्याची सोय, लहान मुलांच्या गुणवत्तेला चालणा देण्यासह बेरोजगार हिंदूंना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठीही दीर्घकालीन कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. तसेच हिंदूंच्या संरक्षणासाठी मदत कक्षही स्थापन करण्यात येणार आहे, अशी माहिती प्रवीण तोगडीया यांनी दिली. यावेळी सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक लप्पी जाजोदीया, आकाश ठाकूर व इतरही कार्यकर्ते उपस्थित होते.

देशात बहुमत टिकवून ठेवायचे असेल, तर प्रत्येक हिंदूंनी किमान तीन अपत्य जन्माला घालणे आवश्यक आहे. अर्थात सरकारने तातडीने लोकसंख्या नियंत्रण कायदा लागू केला, तर तो कायदा सर्वांनाच लागू होईल. त्यानंतर मात्र हिंदूंना तीन अपत्य ठेवण्याची गरज भासणार नाही, अशीही भूमिका प्रवीण तोगडीया यांनी यावेळी मांडली.

## संक्षिप्त

### गोकुल बांबल सन्मानित



**तिवसा-**उत्कृष्ट आरोग्य सेवा, सामाजिक कार्य आणि कला क्षेत्रातील योगदानाबद्दल तिवसा येथील गोकुल लिलाबाई वामनराव बांबल यांना 'अंबाई जिजाऊ महाराष्ट्र राज्य मातृ पुरस्कार २०२५-२६' प्रदान करून गौरविण्यात आले आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याबद्दल सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.आरोग्य सेवेसोबतच गोकुल बांबल हे सामाजिक क्षेत्रातही सक्रिय असून विविध सामाजिक उपक्रम, जनजागृती मोहिम आणि समाजहिताचे कार्यक्रम यामध्ये ते सातत्याने सहभाग घेत असतात.आरोग्य सेवा, सामाजिक कार्य आणि सांस्कृतिक क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय योगदानाची दखल घेत अंबाई जिजाऊ महाराष्ट्र राज्य मातृ पुरस्कार २०२५-२६ देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. त्यांच्या या यशाबद्दल तिवसा व धामणगाव रेल्वे व धामणगाव परिसरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे

### भक्तीसंगिताच्या कार्यक्रमाने श्रोते मंत्रमुग्ध



**अमरावती-**स्थानिक आझाद हिंद मंडळ बुधवारा अमरावतीच्या वतीने श्री हनुमान जन्मोत्सव निम्मित आयोजित भक्ती संगीताच्या कार्यक्रमात विदर्भातील प्रसिद्ध गायक आशुतोष देशपांडे व मधुसदन वटक यांनी सादर केलेल्या गीत रामायणातील गीते तसेच अनेक लोकप्रिय भावगीत भक्तीगीतानी तर निवेदक प्रा.मोहन काटे यांचे वैशिष्ट्य पूर्ण निवेदन तसेच प्रसिद्ध तबला वादक मुकुंद सराफ यांची युवा सहकारी सारंग केतकर यांची लाभलेली साथ यामुळे उपस्थित रसिक श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.तत्पूर्वी सर्व कलावंताचे स्वागत मंडळाचे सदस्य राजाभाऊ माजलगावकर, किशोर कलोती, अजित वडवेकर, डॉ. प्रा. आकाश मोरे, वेदांत डांगे यांनी केले. कलावंताचा परिचय डॉ. किशोर फुले यांनी करून दिला. सर्व कलावंताचा यथोचित सत्कार ज्ञानेश्वर हिवसे यांनी केला. सर्व कलावंतांना थोर स्वातंत्र्य सेनानी देशभक्त नानासाहेब बामणगांवकर यांचे जीवनावर आधारित पुस्तक भेट म्हणून देण्यात आले.कार्यक्रमाला आझाद हिंद महिला मंडळाच्या सदस्यांची मोठया प्रमाणात उपस्थिती होती.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संजय मुचळंबे,प्रवीण चौधरी,रेवण पुसतकर, कृष्णा हिवसे,राजू पाचघरे, अजय पुसतकर,राहुल कथलकर,वैकुंठ नांदुरकर आर्यन ढोले, रोहणकर,मयूर जलतारे यांचे सह अनेक कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

### छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबीर



**अचलपूर-**छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबीर नुकताच काकडा येथे पार पडले.प्रास्ताविकेमधून अचलपूरचे तहसिलदार सुदर्शन शहारे यांनी शिबिराचा उद्देश व माहिती देतांना बळीराजा पांदन,रस्ता योजना तुकळेबंदी कायदा,मामलतदार कायदा, मातोश्री पांदण योजना,१ जानेवरी २०११ रोजी किंवा त्यापुर्वी असलेले शासकीय जमीनीवरील निवासी प्रयोजनार्थ अतिक्रमणे नियमकूल करणे आदी योजनांची माहिती दिली.अध्यक्षीय भाषणात नागरिकांच्या समस्या या महाराजस्व समाधान शिबिरामध्ये सोडविल्या जाव्यात, असे निर्देश सर्व विभाग प्रमुखांना आमदार गजानन लवटे यांनी दिले.शिबिराच्या माध्यमातून नागरिकांच्या समस्या,तक्रारी व प्रलंबित प्रश्न यांचे तात्काळ निराकरण करण्याचा प्रयत्न केला जात आहे.प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन काकडा सरपंच संगीता अपाले यांनी केले.यावेळी भूमि अभिलेख उपअधिक्षक गजानन डोईफोडे, तालुका कृषी अधिकारी अक्षय क्षीरसागर, दुय्यम निबंधक रामदास पाटील मंचावर उपास्थित होते.दरम्यान, ग्रामस्थांना प्रशासनामार्फत विविध दाखले, प्रमाणपत्र वाटप करण्यात आले.संचालन महसूल सहायक रोशन ग. महानकर यांनी तर निरिक्षण अधिकारी राहुल केदारे यांनी आभार मानले.छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिरात विविध दाखले, ७/१२ फेरफार, नमुना ९ वाटप, १५५ आदेश, भोगवटदारवर्ग २ मधूनवर्ग १ आदेशवाटप, संजय गांधी, श्रावणबाळ योजना आदेश वाटप, पुरवठा विभाग राशन कार्ड वाटप इत्यादी मिळूण एकूण ४०३ ग्रामस्यांना तात्काळ सेवा पुरविण्यात आल्या.

### विकी खत्री यांची निर्दोष मुक्तता

**अमरावती-** सर्कल रिपोर्टर ०७/०४/२०२६: आय.डी. व्ही. चे कलाम ३७६ (१) (एन), ४१७,५०६ भा. दं. वि.सहकलम ३ (१) (W) (i) (ii) एस.सी. ॲन्ड एस.टी. ॲक्ट नुसार विकी खत्री यांची विद्यमान जिल्हा व सत्र न्यायाधीश, क्र. ६, अमरावती यांनी निर्दोष मुक्तता केली.

घटनेची हकीकत अशी आहे की, फ्रेजरपुरा, अमरावती पोलीस स्टेशनच्या हद्दीत आरोपी नामे विकी खत्री याने लग्नाचे आमीष दाखवून पिडीतीचे वारंवार लैंगीक शोषण केले व जिवे मारण्याची धमकी देवून जातीवाचक शिवीगाळ केली. याबाबत पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा येथे गुन्हा नोंदवीला व तपासी अधिकारी यांनी तपास पूर्ण करून दोषारोपपत्र न्यायालयात पाठविले व न्यायालयाने सरकारी अधिवक्ता यांनी एकुण ०३ साक्षीदाराची साक्ष नोंदवीली व आरोपीचे अधिवक्ता श्री. एन. आर. मेटानकर, अमरावती यांनी सदर साक्षीदाराचा उलटपास व युक्तीवाद ग्राह्य धरुन विद्यमान जिल्हा व सत्र न्यायालयाने आरोपीची सदर खटल्यातून निर्दोष मुक्तता केली आहे.

# जलशासनातील त्रिसूत्री

**पाणी हे जीवनाचे मूलभूत अधिष्ठान आहे आणि त्याचे व्यवस्थापन ही केवळ सरकारची जबाबदारी नाही. खासगी क्षेत्र आणि नागरी समाज यांच्या सक्रिय सहभागाशिवाय जलसंकटावर मात करणे शक्य नाही. सरकारचे नियमन, खासगी क्षेत्राचा नवोन्मेष आणि नागरी समाजाची जागरूकता या त्रिसूत्रीच्या एकत्रित प्रयत्नातूनच भारतात प्रभावी आणि शाश्वत जलशासनाची निर्मिती होऊ शकते.**



भारतासमोर उभे असलेले जलसंकट केवळ पाण्याच्या उपलब्धतेचे नाही, तर त्याच्या व्यवस्थापनाचे आहे. वाढती लोकसंख्या, हवामान बदल, शहरीकरण आणि औद्योगिकीकरण यामुळे जलस्रोतांवर प्रचंड ताण निर्माण झाला आहे. अशा स्थितीत प्रभावी जलशासन (Water Governance) घडवण्या साठी एकाच घटकावर अवलंबून राहणे पुरेसे नाही. सरकार, खासगी क्षेत्र आणि नागरी समाज या तिन्ही घटकांची समन्वित भूमिका आवश्यक आहे. जलव्यवस्थापनाच्या अभ्यासात यालाच 'गव्हर्नन्स ट्रँगल' असे म्हटले जाते. या त्रिसूत्रीचा मूलभूत विचार असा आहे, सरकार नियम व धोरणे ठरवते, खासगी क्षेत्र नवोन्मेष व कार्यक्षम अंमलबजावणी करते, तर नागरी समाज पारदर्शकता, समता आणि जनसहभाग सुनिश्चित करतो. या तिन्ही घटकांमध्ये समतोल साधला गेला, तरच जलशासन प्रभावी आणि शाश्वत होऊ शकते.

जलशासनात सरकारची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. पाणी हे सार्वजनिक संसाधन असल्यामुळे त्याचे नियमन, वितरण आणि संरक्षण करण्याची जबाबदारी सरकारवर येते. धोरणे आखणे, कायदे तयार करणे, पायाभूत सुविधा उभारणे आणि त्यांची अंमलबजावणी करणे ही सरकारची प्रमुख कार्ये आहेत. जलजीवन मिशन, नदीजोड प्रकल्प, जलसंधारण योजना अशा विविध उपक्रमांद्वारे सरकार पाणीपुरवठा सुधारण्याचा प्रयत्न करत आहे; परंतु केवळ योजना आखून उपयोग नाही. त्यांची प्रभावी अंमलबजावणी आणि पारदर्शकता देखील तितकीच महत्त्वाची आहे. खासगी क्षेत्राची भूमिका जलशासनात दिवसेंदिवस वाढत आहे. तंत्रज्ञान, गुंतवणूक आणि व्यवस्थापन कौशल्य या बाबतीत खासगी क्षेत्र मोठे योगदान देऊ शकते. जलशुद्धीकरण तंत्रज्ञान, सांडपाणी पुनर्वापर, स्मार्ट मीटरिंग, घ्दऊ आधारित जलमापन प्रणाली यांसारख्या नवकल्पना खासगी क्षेत्रातूनच पुढे येतात. सार्वजनिक-खासगी भागीदारी (PPP) मॉडेलद्वारे जलपायाभूत सुविधा अधिक कार्यक्षमतेने उभारता येतात.

तथापि, खासगी क्षेत्राचा सहभाग वाढताना नफेखोरीपेक्षा सार्वजनिक हित जपणे आवश्यक आहे.

नागरी समाजाची भूमिका या त्रिकोणात तितकीच महत्त्वाची आहे. स्वयंसेवी संस्था, स्थानिक समुदाय, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक हे जलशासनाचे खरे भागीदार आहेत. पाणी वापराचे भान निर्माण करणे, जलसंवर्धन उपक्रम राबवणे, धोरणांवर प्रश्न उपस्थित करणे आणि सरकार व खासगी क्षेत्राच्या कामावर देखरेख ठेवणे ही नागरी समाजाची जबाबदारी आहे. अनेक ठिकाणी ग्रामपंचायती आणि स्थानिक समुदायांनी जलसंधारणाच्या यशस्वी मॉडेल्स उभे केले आहेत, जे देशासाठी प्रेरणादायी ठरतात. या तिन्ही घटकांमध्ये समन्वय साधला गेला, तर जलशासन अधिक परिणामकारक होऊ शकते. उदाहरणार्थ, सरकार योग्य धोरणे व नियम तयार करते, खासगी क्षेत्र तंत्रज्ञान व गुंतवणूक पुरवते आणि नागरी समाज त्या प्रक्रियेत पारदर्शकता व समता सुनिश्चित करतो.


या त्रिसूत्रीच्या माध्यमातून पाणी व्यवस्थापन अधिक शाश्वत, न्याय्य आणि लोकाभिमुख बनू शकते.

आजच्या काळात जलसंकटाचा सामना करण्यासाठी केवळ तांत्रिक उपाय पुरेसे नाहीत. त्यासाठी सामाजिक आणि संस्थात्मक बदल आवश्यक आहेत. पाण्याच्या वापरात जबाबदारीची भावना निर्माण करणे, संसाधनांचे न्याय्य वितरण सुनिश्चित करणे आणि पर्यावरणीय समतोल राखणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. शाश्वत विकासाच्या दृष्टीने पाहिले, तर ही त्रिसूत्री अत्यंत महत्त्वाची ठरते. स्वच्छ पाणी व स्वच्छता, असमानता कमी करणे, पर्यावरण संरक्षण आणि सक्षम संस्था निर्माण करणे या सर्व क्षेत्रांमध्ये या तिन्ही घटकांची भूमिका केंद्रस्थानी आहे. त्यामुळे जलशासनाला केवळ प्रशासनिक प्रक्रिया म्हणून न पाहता ते एक सामाजिक करार (social contract) म्हणून स्वीकारणे गरजेचे आहे. शेवटी असे म्हणता येईल की, पाणी हे जीवनाचे मूलभूत अधिष्ठान आहे आणि त्याचे व्यवस्थापन ही केवळ सरकारची जबाबदारी नाही. खासगी क्षेत्र आणि नागरी समाज यांच्या सक्रिय सहभागाशिवाय जल संकटावर मात करणे शक्य नाही.

सरकारचे नियमन, खासगी क्षेत्राचा नवोन्मेष आणि नागरी समाजाची जागरूकता या त्रिसूत्रीच्या एकत्रित प्रयत्नातूनच भारतात प्रभावी आणि शाश्वत जलशासनाची निर्मिती होऊ शकते.

**डॉ. मंगेश कश्यप**

# श्री स्वामी समर्थ महाराज पुण्यतिथी



श्री स्वामी समर्थ महाराज पुण्यतिथी (चैत्र वद्य त्रयोदशी) हा अक्कलकोट निवासी दत्तभक्तांसाठी अत्यंत पवित्र दिवस आहे. या दिवशी महाराजांनी अक्कलकोट येथील वटवृक्ष समाधी मठात अवतारकार्य संपवून समाधी घेतली.या दिवशी नामजप, गुरुचरित्र पारायण आणि प्रहर सेवा करून स्वामींची कृपा मिळवण्यासाठी विशेष पूजा आणि सेवा केली जाते.

हा दिवस भक्तांसाठी अत्यंत महत्त्वाचा असतो. या दिवशी अक्कलकोट नगरीत लाखो भक्त स्वामींच्या दर्शनासाठी आणि 'वटवृक्ष समाधी मठ' स्थानी नतमस्तक होण्यासाठी येतात.

**पुण्यतिथी दिवशी काय करावे?**

**अखंड नामजप:** पुण्यतिथीच्या दिवशी स्वामींच्या नामाचा अखंड जप करावा.

**प्रहर सेवा:** स्वामी समर्थ केंद्रांमध्ये या दिवशी 'अतिउच्च कोटीची प्रहर सेवा' केली जाते, जी प्रत्येकाने करावी असे सांगितले जाते.

**गुरुचरित्र पारायण:** भक्तांनी या काळात शक्य असल्यास गुरुचरित्राचे पारायण करावे.

**स्वामी विचार:** 'भीऊ नकोस, मी तुझ्या पाठीशी आहे' हा स्वामींचा सर्वात मोठा मंत्र समजून, भक्तांनी निर्भय होऊन स्वामींवर विश्वास ठेवावा.

**स्वामी समर्थांचा संदेश:**

'स्वीकार' हाच जीवनाचा पहिला मंत्र आहे, असे स्वामी म्हणत. माणसाची ओळख विचारांतून होते, कपड्यांतून नाही. भरोसा आणि आशीर्वाद कधीही दिसत नाहीत, परंतु ते अशक्य गोष्टीलाही शक्य करतात.

स्वामी समर्थांनी आपल्या आयुष्यात हजारो भक्तांना मार्ग दाखवला आणि त्यांना संकटातून मुक्त केले. या पुण्यतिथी निमित्त आपणही स्वामींच्या चरणी नतमस्तक होऊन, त्यांनी दिलेल्या शिकवणीचा अवलंब करूया.

# मेळघाटातील 'भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजने'ने फुंकरले

## आदिवासी महिलांच्या जीवनात नवे चैतन्य



अमरावती जिल्ह्यातील मेळघाट हा निसर्ग सौंदर्याने नटलेला असला तरी, येथील दुर्गम भौगोलिक रचना आणि सामाजिक आव्हानांमुळे कुपोषण आणि माता-बाल आरोग्याचा प्रश्न नेहमीच संवेदनशील राहिला आहे. या पार्श्वभूमीवर, मेळघाटातील आदिवासी माता आणि बालकांना आरोग्याचे कवच प्रदान करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या महिला व बाल विकास विभागामार्फत 'भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना' राबविण्यात येत आहे. कुपोषणमुक्त मेळघाट हे स्वप्न साकारण्याच्या दिशेने ही योजना आरोग्यपूर्ण पिढीचा पाया रचत आहे.

भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजनेंतर्गत गरोदर स्त्रियांना व स्तनदा मातांना एक वेळचा चौरस आहार देण्याची योजना दि. १ डिसेंबर २०१५ पासून राज्यात सुरू करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत मेळघाटमध्ये दोन टप्प्यात कार्य करण्यात येते. पहिल्या टप्प्यात, आदिवासी क्षेत्रातील सर्व ग भवती महिलांना त्यांच्या गर्भावस्थेच्या शेवटच्या सहा महिन्यांत आणि प्रसूतीनंतरच्या पहिल्या सहा महिन्यांपर्यंत (स्तनदा माता) चौरस आहार दिला जातो. यामध्ये केवळ पोट भरणे हा उद्देश नसून, आहारात प्रथिनांची आणि जीवनसत्त्वांची मात्रा वाढविण्यावर भर दिला जातो. अंगणवाडी केंद्रांच्या माध्यमातून दिल्या जाणाऱ्या या जेवणात वरण, भात, भाजी, पोळी यासोबतच अंडी आणि पौष्टिक लाडूंचा समावेश असतो. मार्च २०२६ मध्ये, मेळघाटातील धारणी आणि चिखलदरा तालुक्यातील ५ हजार ८१६ मातांनी या अमृत आहाराचा लाभ घेतला असून, त्यावर ६० लाख रुपयांहून अधिक खर्च करण्यात आला आहे. यामुळे महिलांमधील रक्ताल्पतेचे (ॲनिमिया) प्रमाण कमी होण्यास मोठी मदत झाली आहे.

योजनेचा दुसरा आणि तितकाच महत्त्वाचा टप्पा म्हणजे ६ महिने ते ६ वर्षे वयोगटातील बालकांना आठवड्यातून चार दिवस केळी, अंडी असा पूरक आहार दिला जातो. बालपणातील कुपोषण हे शारीरिक आणि बौद्धिक वाढीतील सर्वात मोठा अडथळा असते. हा अडथळा दूर करण्यासाठी बालकांना आठवड्यातून चार दिवस अंडी किंवा तत्सम प्रथिनयुक्त आहार दिला जातो. मार्च महिन्यात मेळघाटातील एकूण २८ हजार ९८५ बालकांपर्यंत हा लाभ पोहोचला आहे. बालकांच्या या पोषण आहारासाठी सुमारे ३६.३२ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली होती. मेळघाटातील ४६२ अंगणवाडी केंद्रांचे जाळे आणि तिथे कार्यरत असणाऱ्या स्थानिक आहार समित्या यामुळे ही योजना प्रत्यक्ष लाभार्थ्यांच्या घरापर्यंत पोहोचत आहे.या योजनेमुळे मेळघाटात मातांना सकस आहार मिळतो, तेव्हा जन्माला येणाऱ्या बाळाचे वजन सुदृढ असते, ज्यामुळे बालमृत्यूचे प्रमाण कमी होत आहे.

तसेच, या योजनेच्या निमित्ताने महिलांचा अंगणवाडीशी संपर्क वाढल्यामुळे त्यांना लसीकरण, वैयक्तिक स्वच्छता आणि कौटुंबिक नियोजनासारख्या महत्त्वाच्या विषयांचे मार्गदर्शन सहज उपलब्ध होत आहे. स्थानिक महिलांचा आहार समित्यांमध्ये असलेला सहभाग त्यांच्यात निर्णयक्षमता आणि नेतृत्वाचे गुण विकसित करत आहे.

भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना ही मेळघाटातील आदिवासी बांधवांच्या जीवनात चैतन्य फुंकणारी योजना ठरली आहे. जिल्हा प्रशासन आणि महिला व बालकल्याण विभाग यांच्या समन्वयाने राबविल्या जाणाऱ्या या उपक्रमामुळे दुर्गम भागातील माता आणि बालके आज खऱ्या अर्थाने सुरक्षित आणि सशक्त होत आहेत. कुपोषणाच्या अंधारातून आरोग्याच्या प्रकाशाकडे मेळघाटाची ही वाटचाल भविष्यात एक आदर्श आरोग्य मॉडेल म्हणून निश्चित समोर येईल.

**अपर्णा यावलकर**
माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, अमरावती

# मानवनिर्मित आपत्ती निसर्गापेक्षा धोकादायक

अलीकडेच जागतिक नागरिक संरक्षण दिन साजरा केला गेला. हा दिवस साजरा करण्यामागचा उद्देश हाच होता की नैसर्गिक आपत्ती आणि मनुष्यनिर्मित संकटांपासून समाजाचे संरक्षण व्हावे म्हणजेच येणाऱ्या कोणत्याही आपत्तीच्या वेळी सजग आणि सतर्क राहणे हे जितके गरजेचे आहे, तितकेच आपत्ती येणार नाही किंवा आलेल्या आपत्तीपासून तातडीने सर्वांचे संरक्षण करता यावे याकरिता जनजागृती निर्माण करण्याचे निमित्त म्हणून या दिवसाचे विशेष महत्व सांगितले जाते. आतापर्यंत नैसर्गिक आपत्तीमध्ये भूकंप, वादळ, अतिवृष्टी यासारख्या संकटांचा समावेश होत होता. परंतु गेल्या पंचवीस वर्षांपासून हवामानामध्ये प्रचंड बदल होत गेला. विज्ञान तंत्रज्ञानाने इतकी प्रचंड प्रगती केली आहे की, पर्यावरणात सतत होणारे बदल हे नव्या नैसगिक आपत्तीला जन्म देणारे ठरले तर विज्ञान तंत्रज्ञानाच्या वेगवेगळ्या शोधांनी सुख-सोयीबरोबर मानवनिर्मित आपत्ती निर्माण केली आहे. गेल्या पंचवीस वर्षात जगभरात वेगवेगळ्या ठिकाणी निर्माण झालेल्या आपत्ती किंवा संकटांचा विचार केला तर नैसगिक आपत्तीपेक्षाही मानवनिर्मित आपत्तीपासून माणसाला सर्वाधिक धोका असल्याचे दिसून येते. नैसर्गिक कारणांमुळे अनेक ठिकाणी भूकंप होतात. अगदी तुफान बर्फवृष्टी किंवा अतिवृष्टी, चक्रीवादळ किंवा मोठमोठे वणवे पसरण्याच्या धोक्यापासून ज्वालामुखीसारखे प्रकारही घडत असतात.

जगभरात वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या प्रकारचे हवामान किंवा ऋतुमान असते. तिथल्या भौगोलिक परिस्थितीनुसार नैसर्गिक आपत्तीचे प्रकारही वेगवेगळे असतात. परंतु भारतासारख्या एकाअर्थी संतुलित हवामान असलेल्या देशातसुद्धा पर्यावरणा तून काही नवीन संकटे निर्माण झाली दिसून येतात. ज्यामध्ये तापमानाचे वाढलेले प्रमाण आणि अवकाळी पावसाचा गेल्या काही वर्षातला भडीमार बरेच मोठे नुकसान करणारा ठरला आहे. भारतात भूकंपाचे प्रमाण कमी असले तरी वर्षाकाठी होणारी दोन-तीन चक्रीवादळे सोडली तर पावसाळ्यात मात्र अतिवृष्टी आणि महापुरातून बऱ्यापैकी तडाखा बसत आहे. या सगळ्या नैसर्गिक आपत्तीला तोंड देण्याकरिता सरकारतर्फे आपत्ती व्यवस्थापन विभाग सुरु झाला. साधारणपणे तीस वर्षांपूर्वी गुजरात राज्याच्या भुज भागात झालेल्या सर्वात मोठा भूकंप आपत्ती व्यवस्थापनाची आवश्यकता सिद्ध करणारा ठरला होता. त्यापूर्वी महाराष्ट्र राज्यात मराठवाड्यात झालेला भूकंप अनेकांचे बळी देणारा ठरला होता. परंतु या दोन्ही आपत्तीच्यावेळी स्वतंत्र आपत्ती व्यवस्थापन हा प्रकारचं अस्तित्वात नसल्याने त्याची मोठी किंमत मोजावी लागली होती.

अर्थात भूकंपासारखी आपत्ती ही खूप अचानकपणे येते. हवामानाच्या अंदाजाप्रमाणे अतिवृष्टी किंवा चक्रीवादळाची पूर्वसूचना काही प्रमाणात मिळते आणि सावधगिरीची उपाययोजना करता येते. तसे मात्र भूकंपाच्याबाबतीत अजून होऊ शकलेली नाही. परंतु जर आपत्ती व्यवस्थापन असेल तर पुरेशा प्रमाणात सावधगिरीचे उपाय करता येतात. आणि विशेषतः लोकांचे जीव वाचवता येतात. अलीकडच्या काळात हवामानातला बदल आणि पर्यावरणाच्या संरक्षणाचे उभे राहिलेले संकट तितकेच गंभीर स्वरूपाचे ठरले आहे. यातली वस्तुस्थिती अशी आहे की, वाढते तापमान हा पूर्णपणे नैसर्गिक आपत्तीचा भाग म्हणता येणार नाही. ज्याला जगभरातले औद्योगिकीकरण वेगवेगळ्या विकासाच्या योजना, बेसुमार जंगलतोड, भयानक स्वरूपाची वाहनसंख्येतली वाढ, प्रदूषण निर्माण करणारी कारखानदारी अशा एक ना अनेक कारणांमुळे पर्यावरणाचे मोठे संकट अधिक गंभीर झालेले आहे. म्हणजेच ते जितके निसर्गनिर्मित आहे.

तितकेच मानवनिर्मित ठरते. लोकांच्या संरक्षणाचा विचार करायचा असेल तर नैसर्गिक आपत्तीपेक्षाही मानवनिर्मित आपत्तिन्चा सामना हा अधिक महत्वाचा ठरतो. विशेषतः तंत्रज्ञानाच्या प्रगतीतून मानवाच्या अस्तित्वापुढे केव्हा कसे गंभीर संकट निर्माण होईल हे सांगता येत नाही. अगदी जगभर थैमान घालणारी कोरोनाची महामारी ही अशीच मानवनिर्मित व्हायरसची महामारी असल्याचे सांगितले गेले होते. एवढेच नव्हे तर जगात कुठे ना कुठे सुरु असलेली छोटीमोठी युद्ध त्यासाठी वापरले जाणारे रासायनिक पदार्थ कंवा सामग्री यातून प्रदूषित होणारे पर्यावरण आणि त्याचा मानवी जीवनावर होणारा वेगवेगळ्या रोग आणि आजारांचा प्रभाव दुर्लक्षित करता येणार नाही.

मोबाईलच्या अतिवापरामुळे मेंदू निकामी होण्यापासून ते त्यापासून उदभवणाऱ्या वेगवेगळ्या रोगांचाही मोठा प्रादुर्भाव होतो आहे. शिवाय आजच्या या इंटरनेटचा युगात अनावश्यक माहितीचा भडीमार होत असल्याने मनुष्याच्या मनावर होत असलेले दुष्परिणाम मानवनिर्मित आपत्तीचेच निदेर्शक ठरतात. येऊ घातलेली कृत्रिम बुद्धिमत्तेची लाट कसा परिणाम दाखवतात हे येणाऱ्या काळात माहित होऊ शकेल. परंतु सध्याच्या माहिती तंत्रज्ञानाचे ज्या पद्धतीने काही दुष्परिणाम समोर आले आहेत ते पाहता कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे एआय हा प्रकार देखील मनुष्याच्या कार्यक्षमतेवर परिणाम करणारा ठरू शकतो, अनेक गोष्टी तयारी स्वरूपात आणि त्याची काही क्षणात उपलब्ध होतील अशा हुबेहूब मनुष्याच्याच प्रतिकृती हे तंत्रज्ञान साकार करेल ज्यातून खरे काय आणि खोटे काय हे ओळखणेसुद्धा कठीण होणार आहे. जगाची गतिमानता वाढेल, पण मनुष्याच्या कार्यक्षमतेला तितकाच मोठा धक्का बसेल हे वास्तव नाकारता येणार नाही. विशेषतः भारतासाठी मोठी लोकसंख्या असलेल्या देशाचे कृत्रिम बुद्धिमत्तेचे आगामी युग खूप काळजीपूर्वक लक्षत घेण्याची गरज आहे.

**प्रा. मधुकर चुटे**
नागपूर
मो.९४२०५६६४०४

# ऐच्छिक रक्तदाते निर्माण होणे गरजेचे!

रक्तदान ही ऐच्छिक निरोगी आणि व्यापक मानवतावादी चळवळ आहे.जी देशाच्या सार्वजनिक आरोग्यास अबाधित राखण्यास मदत करते.निरोगी सदृढ नागरिक देशाचे बलस्थान असून अनमोल संपत्ती आहे.आणि ती टिकवण्याची सामूहिक जबाबदारी आपल्या सर्वांवर असते.म्हणून रक्तदान करणे ही एक केवळ शरीराशी संबंधित क्रिया नसून, ऐच्छिक सामाजिक चळवळीचा हिस्सा सुद्धा आहे. रक्तदानाचा संबंध थेट एखाद्याच्या प्राणदानाशी होतो.आज हवामान बदलांच्या संकटामुळे मानवाला अनेक आजारांना सामोरे जावे लागत आहे.पोषण आहाराचा अभाव त्यापैकीच एक.परिणामी कुपोषणा सारखे आजार आज बळावत आहे.गंभीर आजारांचे श्रुंखलेत थॅलेसेमिया, रक्त कर्करोग, अप्लॅस्टिक ॲनिमिया, रक्तस्त्राव रक्त विकार असलेले रुग्ण,गर्भवती महिला, अपघातग्रस्त अथवा युद्धजन्य परिस्थितीत रक्ताची अतितीव्र गरज भासत असते.याशिवाय दीर्घ आजाराने त्रस्त असलेल्यांना रोगप्रतिकार शक्ती निर्माण करण्याच्या हेतूने सतत रक्ताची गरज सुद्धा भासते. ही गरज मानवी रक्तदानातून भागविली जाते.यात ऐच्छिक रक्तदान करण्याचा आद्य व मोठा वाटा आहे.

अठरा ते साठ वयोगटातील सदृढ निरोगी व्यक्ती रक्तदानास पात्र ठरते.देशांतर्गत ज्या रक्तपेढी आहेत त्या सर्व ऐच्छिक रक्तदाता आणि केलेल्या रक्तादात्यांच्या सहकार्यातून कार्य करतात. त्यातूनच गरजू रुग्णांची रक्ताची गरज भागविली जाते.कारण मानवी रक्त हे कुठल्याही प्रयोगशाळेत तयार होत नाही,तर ती एक एका मानवाच्या शरीरात निर्माण होणारी नैसर्गिक क्रिया आहे.महाविद्यालयीन तरुण-तरुणी, युवा नागरिक,आज मोठ्या संख्येने ऐच्छिक व स्वयंस्फुर्तिने रक्तदान करतात.ज्यात राजकीय पक्षांच्या नेत्यांचे वाढदिवस,गणेशोत्सव मंडळ,शाळा महाविद्यालयीन कॅम्पस, स्वयंसेवी संस्था,प्रतिष्ठाने, शिवाय इतर सेवाभावी संस्था सुद्धा प्रतिवर्षी औचित्य साधून नजिकच्या शासकीय अथवा खाजगी नोंदणीकृत रक्तपेढींना आमंत्रित करून सामूहिक रक्तदान शिबिरे आयोजित करतात.या शिबिरांच्या माध्यमातून महत्तम रक्ताच्या गरजेची पूर्तता होत असते,हे निश्चितच गौरवास्पद व रक्तदात्यांप्रती कृतज्ञता व्यक्त करणारी बाब आहे.



रक्तदात्यांच्या मार्फत संकलित झालेले रक्त नियमबद्ध चाकोरीत ठेवण्यासाठी;देशात राष्ट्रीय रक्त संक्रमण परिषद व राज्यात राज्य रक्त संक्रमण परिषदेच्या नियंत्रणाखाली रक्तपेढ्या कार्य करतात.गरजूंना रक्तपुरवठा सुलभतेने उपलब्ध होईल,याची खबरदारी घेऊन महाराष्ट्र राज्य रक्त संक्रमण परिषदेने 'इ-रक्तकोश' नावाचे आधुनिक पोर्टल तयार केले आहे.या पोर्टलवर प्रत्येक रक्तपेढीला दररोज रक्तदात्यांची माहिती अपडेट करणे बंधनकारक असते.कोणत्या रक्तगटाचे रक्त किती उपलब्ध आहे. शिवाय वितरण किती झाले, याची माहिती पोर्टलवर अपलोड केल्यानंतर रक्तपेढीच्या फलकावर लावणे गरजेचे केले आहे. त्यामुळे रक्ताचा काळाबाजार थांबून गरजूंना रक्त वेळेत उपलब्ध होण्यास मदत मिळेल.स्वेच्छेने रक्तदान करणाऱ्या रक्तदात्यांच्या सन्मानार्थ उचललेले ठळक पाऊल म्हणजे, आता रक्तदात्यांची नोंदणी आभा आयडी कार्ड व आधार कार्डशी जोडल्या जाणार आहे. त्यामुळे रक्तदात्यांना मोफत उपचार सुविधा भविष्यात लाभ घेता येईल.या सुसूत्रीकरणातून रक्तदात्यांचा सन्मान राखून निरपेक्ष पद्धतीने गरजूंना रक्तपुरवठा होण्यास एक प्रकारची मदत च मिळेल यात शंका नाही.

राष्ट्रीय रक्त संक्रमण परिषद व राज्य रक्त संक्रमण परिषदेच्या परिपत्रकानुसार, रक्तदान शिबिरांमध्ये रक्तदात्यांना भेटवस्तू देण्यास मज्जाव आहे. रक्तदान विनामोबदला आणि स्वेच्छेने करण्यात येईल, तसेच परिषदेच्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे प्रतिकात्मक भेटी शिवाय इतर कोणतीही भेटवस्तू दिली जाणार नाही असे रक्तपेढींना आयोजकाकडून हमीपत्र घ्यावे लागते. मात्र या नियमाची काटेकोर अंमलबजावणी आयोजक करताना दिसत नाही. अलीकडेच रिलायन्स इंडस्ट्रीजचे प्रमुख मुकेश अंबानी यांचे सुपुत्र अनंत अंबानी यांच्या वाढदिवशी मुंबईत भव्य रक्तदान शिबिर आयोजित केले होते. त्या शिबिरात रक्तदात्यांना नामांकित कंपनीचे घड्याळ भेट देण्यात आल्याचे वृत्त प्रसारित झाले होते.बड्या उद्योजकांडून नियमास बगल देणे बेकायदा आहे. या घटनेसोबतच आज राज्यात इतर सामूहिक ठिकाणी रक्तदान शिबिरात रक्तदात्यांना विविध प्रलोभने देण्याचे प्रकार राजरोसपणे घडत आहे. रक्तदात्यांना पेन ड्राईव्ह, पावर बॅंक,ब्लूटूथ,मोबाईल सेल्फी स्टॅन्ड, पाणी बॉटल,वीमा संरक्षण सारखे प्रलोभने दाखवून रक्तदान शिबिरे आयोजित केले जातात. स्वयंस्फूर्तीने रक्तदान करणे हा रक्तदात्यांच्या दातृत्वाचा प्रश्न आहे.कुठल्याही आमिषांना बळी न पडता आज रक्तदात्यांनी रक्तदानासाठी सामोरे आले पाहिजे. व त्याची गरज ओळखून नवीन रक्तदाते निर्माण व्हावेत,करिता सामाजिक जनजागृती होणे गरजेचे ठरते. कुठल्याही अमिषांना बळी पडून रक्तदान करणे म्हणजे दातृत्ववृत्तीला कलंक ठरत असतो. भविष्यात रक्तदात्यांना विविध मोह दाखवून रक्तदान शिबिरे भरवणाऱ्या आयोजकांकडे याकडे लक्ष पुरवणे गरजेचे ठरते. कुठल्याही प्रलोभनाविना आज स्वयंप्रेरणे रक्तदात्यांनी पुढे येणे गरजेचे आहे, तरच रक्तदान शिबिरे ही सामाजिक उपक्रमाचा उदात्त हेतू म्हणून अबाधित राहील.यात लोकसहभागही तेवढाच महत्त्वाचा ठरतो.

**शशिकांत म.तोटे**
दारव्हा,जि.यवतमाळ
मो:९१३०८३५४५८

# सभापती अग्रवालांनी काढले शहर विक्रीला

## स्थायी सभेत गोंधळ, भारुका यांचा सत्ताधा–यांवर घणाघाती हल्ला

■ प्रतिनिधी | अकोला ■

*महानगरपालिकेच्या स्थायी समितीच्या सोमवारी पार पडलेल्या सभेत सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये जोरदार शाब्दिक चकमक उडाली. सभापती विजय अग्रवाल आणि शिवसेनेचे गटनेते सागर भारुका यांच्यातील वाद इतका चिघळला की, तो थेट अश्लील शिवीगाळीपर्यंत पोहोचल्याने मनपा वर्तुळात मोठी खळबळ उडाली. या घटनेमुळे सत्ताधाऱ्यांच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.*



सभेच्या सुरुवातीला प्रलंबित कामांबाबत आणि मागील सभेच्या इतिवृत्तातील त्रुटींवरून सागर भारुका यांनी प्रशासनाला धारेवर धरले. लोकहिताच्या कामांमध्ये होत असलेल्या दिरंगाईबद्दल त्यांनी अधिकाऱ्यांना खडे बोल सुनावले. यावेळी सभापती विजय अग्रवाल यांनी अधिकाऱ्यांची बाजू घेत हस्तक्षेप केल्याने वातावरण तापले. यावरून दोघांमध्ये तीव्र शाब्दिक चकमक सुरू झाली. काही क्षणांतच वादाचा स्तर घसरत गेला आणि सभापतींनी पदाची गरिमा बाजूला ठेवत भारुका यांच्याशी एकेरी भाषेत बोलत अश्लील शिवीगाळ केल्याचा आरोप करण्यात आला. एवढ्यावरच न थांबता सभापतींनी भारुका यांना सभागृहातून निलंबित करण्याचे आदेशही दिले.

या प्रकारामुळे एकेकाळी शिस्तप्रिय आणि सुसंस्कृत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सत्ताधारी भाजपची प्रतिमा धुळीस मिळाल्याची टीका राजकीय वर्तुळात होत आहे. विशेष म्हणजे, महापौर शारदा खेडकर यांच्या उपस्थितीत हा प्रकार घडल्याने प्रकरणाचे गांभीर्य अधिकच वाढले आहे. सभागृहात महिला सदस्य असतानाही अशा प्रकारची अर्वाच्च भाषा वापरली गेल्याने संताप व्यक्त होत आहे.

वादानंतर पत्रकारांशी बोलताना सागर भारुका यांनी सभापतींवर थेट गंभीर आरोपांचा भडिमार केला. 'सभापती अग्रवाल यांनी शहरच विक्रीला काढले आहे. निर्णय प्रक्रियेत मनमानी सुरू असून जनतेच्या हिताचा पूर्णतः बळी दिला जात आहे,' असा घणाघाती आरोप त्यांनी केला. तसेच, 'निलंबनाची भीती नाही. अकोलेकरांच्या प्रश्नांसाठी आवाज उठवत राहणार,' असा इशाराही त्यांनी दिला. अग्रवाल यांच्या कार्यपद्धतीवर टीका करताना भारुका यांनी अरेरावी, एकाधिकारशाही आणि प्रशासनाशी संगनमताचे आरोप लावत सत्ताधाऱ्यांना थेट आव्हान दिले आहे. या संपूर्ण प्रकारानंतर मनपा राजकारण चांगलेच तापले असून, पुढील काही दिवसांत या वादाचे पडसाद उमटण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

**सर्वसाधारण सभेत आमदारकीचे स्वप्न, स्थायीच्या सभेत शिवीगाळ**

सकाळी मनपाच्या सर्वसाधारण सभेत कचरा घंटागाडीच्या विषयावर चर्चा सुरू असताना सागर भारुका यांनी स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देत, 'आपली सर्व स्वप्ने पूर्ण झाली असून आता फक्त आमदारकीचे स्वप्न पूर्ण व्हायचे आहे; त्यासाठी एक शिपाई म्हणून आपणही योगदान देऊ,' असे म्हटले होते. मात्र काही तासांतच स्थायी समितीच्या सभेत कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मुदतवाढीच्या मुद्द्यावरून वादाची ठिणगी पडली आणि वातावरण अश्लील शिवीगाळीपर्यंत पोहोचले.

**लोकशाहीचे मंदिर की शिव्यांचा आखाडा**

लोकशाहीचे मंदिर मानल्या जाणाऱ्या सभागृहात अशा प्रकारची भाषा आणि वर्तन सातत्याने वाढत असल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. या प्रकारामुळे नगरसेवकांच्या प्रतिमेला मोठा धक्का बसत असून, 'हे लोकशाहीचे मंदिर आहे की शिव्यांचा आखाडा?' असा सवाल विरोधकांसह शहरातील नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

**काही काळातच कामकाज सुरू**

वादानंतर काही काळातच सभा पुन्हा सुरू करण्यात आली आणि नियमित कामकाज पार पडले. यावेळी मनपा शाळांमध्ये डिजिटल बोर्ड खरेदीस मंजुरी देण्यात आली. तसेच लोकसेवा हक्क अधिनियमानुसार मनपाच्या ६५ सेवा ऑनलाइन करण्यासाठी त्रयस्थ यंत्रणेशी करार करण्यासही हिरवा कंदील देण्यात आला.

> **"मी गप्प बसणार नाही!"**
>
> 'मी बाळासाहेबांचा शिवसैनिक आहे. वैयक्तिक कामासाठी नव्हे, तर जनतेच्या हितासाठी प्रश्न विचारत होतो. प्रशासनाच्या चुकीच्या धोरणांना पाठीशी घातले जात असेल, तर मी गप्प बसणार नाही. सभापती कितीही मनमानी करत असले तरी मी शेवटपर्यंत जनतेसाठी लढत राहीन आणि प्रश्न विचारत राहीन.'
>
> **सागर भारुका,** नगरसेवक

## गंगानगरात चोरट्यांचा धुमाकूळ; दोन घरफोड्या

### दुचाकीसह लाखोंचा ऐवज लंपास



■ प्रतिनिधी | अकोला ■

शहरातील गंगानगर परिसरात चोरट्यांनी पुन्हा एकदा डोके वर काढत दोन बंद घरांमध्ये घरफोडी करून दागिन्यांसह लाखोंचा ऐवज लंपास केल्याची घटना समोर आली आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांमध्ये खळबळ उडाली आहे.

जुने शहर पोलीस स्टेशन हद्दीतील अली पब्लिक इंग्लिश स्कूल परिसर आणि गंगानगरातील शाह पीठगिरणी जवळील दोन घरांना चोरट्यांनी लक्ष्य केले. १३ एप्रिलच्या मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी संधी साधत शेख निसार यांच्या बंद घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. घरातील कपाटात ठेवलेले सुमारे तीन तोळे सोन्याचे दागिने व चांदीचे साहित्य चोरून नेले. याच दरम्यान, घरासमोर उभी असलेली दुचाकीही चोरट्यांनी लंपास केली. तसेच गंगानगरातील शाह पीठगिरणी जवळील शहजाद यांच्या बंद घरातही घरफोडी करून दागिन्यांवर हात साफ करण्यात आला. दोन्ही कुटुंबातील सदस्य काही कामानिमित्त शहराबाहेर गेल्याचा फायदा घेत चोरट्यांनी ही कारवाई केल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. १४ एप्रिल रोजी सकाळी ही घटना उघडकीस येताच परिसरात एकच खळबळ उडाली.

घटनास्थळी पोलिसांनी पंचनामा केला असून अज्ञात चोरट्यांचा शोध घेण्यासाठी तपास सुरू आहे. दरम्यान, वाढत्या घरफोड्यांच्या घटनांमुळे नागरिकांनी पोलिस गस्त वाढवण्याची मागणी केली आहे.

## तेल्हाऱ्यात भीमजयंती 'विचारांचा उत्सव' म्हणून साजरी

### विद्यार्थ्यांकडून संविधान मूल्यांचा जागर; राष्ट्रीय भावनेला उजाळा



■ प्रतिनिधी | तेल्हारा ■

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त शहरातील पंडित दीनदयाळ उपाध्याय सार्वजनिक वाचनालयात विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागातून कार्यक्रम उत्साहात पार पडला. हा सोहळा केवळ जयंतीपुरता मर्यादित न राहता 'विचारांचा उत्सव' ठरल्याचे चित्र पाहायला मिळाले.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी त्यांच्या जीवनकार्यावर प्रभावी भाषणे सादर केली. सामाजिक समानता, शिक्षणाचे महत्त्व आणि संविधान निर्मितीतील योगदान यावर विद्यार्थ्यांनी मांडलेले विचार उपस्थितांना प्रेरणादायी ठरले. विद्यार्थ्यांच्या ओजस्वी वक्तृत्वातून संविधानिक मूल्यांचा जागर होत असल्याचे जाणवले.

यावेळी सादर करण्यात आलेल्या प्रेरणादायी कविता आणि भाषणांनी वातावरण भारावून गेले. शिक्षक तसेच वाचनालयाच्या पदाधिकाऱ्यांनी मार्गदर्शन करत शिक्षणाच्या माध्यमातून समाजात सकारात्मक परिवर्तन घडवण्याचा संदेश दिला. ग्रंथपाल श्रीकृष्ण पोहरकार यांनी विद्यार्थ्यांना संविधानाची जपणूक करण्याबरोबरच सामाजिक बांधिलकी जोपासण्याचे आवाहन केले. भीमजयंतीचा हा कार्यक्रम राष्ट्रीय भावनेला उजाळा देणारा ठरला. विद्यार्थ्यांच्या उत्साही सहभागामुळे कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

## अथर्व मल्टीपर्पज फाऊंडेशनची पाणपोई

■ प्रतिनिधी | अकोला ■

शहरातील कडाक्याच्या उन्हात कामानिमित्त भटकंती करणारे तहानलेले वाटसरू, विद्यार्थी कामगार मजुर यांचे करीता पिण्याचे थंड पाण्याची सोय म्हणून मागील पाच वर्षापासुन जवाहर नगर चौकात अथर्व मल्टीपर्पज फाऊंडेशनद्वारे अथर्व स्मृती पाणपोईची सोय केली जात आहे. याचा लाभ दरवर्षी हजारो लोकांनी घेतला आहे. यावर्षी ही दि. १३-०४-२०२६ सोमवार रोजी वयोवृद्ध जेष्ठ महीला सौ. लिलाबाई खडसे यांचे हस्ते पूजन करुन पाणपोईचे लोकार्पण करण्यात आले.

## संविधान हा देशाच्या सुदृढ लोकशाहीचा पाया - जिल्हाधिकारी

■ प्रतिनिधी | अकोला ■

भारतीय संविधान हे देशाच्या एकता व अखंडतेचा पाया असून सक्षम व सुदृढ लोकशाही निर्माण करण्याचे कार्य भारतीय संविधानाने केले आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी आज येथे केले.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वतीने ८ ते १४ एप्रिल दरम्यान आयोजित भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सामाजिक समता सप्ताह कार्यक्रमात त्या बोलत होत्या. समाजकल्याण सहाय्यक आयुक्त मारुती वाठ, जिल्हा जात पडताळणी उपआयुक्त अमोल यावलीकर, व्याख्यात्या राजेश्वरी सोळंके यांच्यासह सामाजिक न्याय विभाग पुरस्कार प्राप्त पुरस्कारार्थी आदी उपस्थित होते.



श्रीमती मीना म्हणाल्या की, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य अद्वितीय आहे. त्यांनी देशाला संपूर्ण जगाला आदर्शवत अशी राज्यघटना दिली. त्यांचे लेखनकार्य व विचार संपूर्ण भारतीयांसाठी प्रेरणादायी आहेत. त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून प्रत्येकाने वाटचाल केली पाहिजे.

यावेळी इतर मान्यवरांचीही भाषणे झाली. अनु. जाती अत्याचार प्रतिबंध अधिनियमानुसार खून किंवा मृत्यू झालेल्या दिवंगत व्यक्तीच्या वारसाला नोकरी देण्याची तरतूद आहे. त्यानुसार पात्र व्यक्तींना नियुक्तीपत्र जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते देण्यात आले. विविध पुरस्कारांचे वितरणही यावेळी झाले. कार्यक्रमाला अधिकारी, कर्मचारी, मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डॉ. साजिद शेख यांची विदर्भ महासचिवपदी नियुक्ती



■ प्रतिनिधी | पातूर ■

शिक्षण व समाजसेवा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे डॉ.साजिद शेख यांची मुस्लिम वेलफेअर असोसिएशनच्या विदर्भ महासचिवपदी नियुक्ती करण्यात आली आहे.गेल्या १५-२० वर्षांपासून त्यांनी विविध शैक्षणिक संस्थांमधून हजारो विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली आहे. ग्रामीण व दुर्बल घटकांसाठी त्यांचे कार्य विशेष उल्लेखनीय आहे.त्यांच्या कार्याची दखल घेऊन राष्ट्रीय अध्यक्ष सलीम सारंग यांनी त्यांची नियुक्ती केली.

**जाहीर सुचना**

दि.१४.४.२०२६

सर्वत्र लोकांना कळविण्यात येते कि, श्री संग्राम चन्द्रशेखर गाडगीळ, यांचे मालकीचे व ताब्यातील मौजे अकोला, ता. जि अकोला येथील नझुल शिट क्र ७०, नझुल प्लॉट क्र ५/४०, लेआऊट प्लॉट क्र ७४, क्षेत्रफळ ४४५.९० चौ मी. बाबतचे दि १५.७.१९९९, (नमूना ड वर चुकीने २३.७.१९९९ लिहिले) दस्त क्र. ३४७५ हे मुळ खरेदीखत हरवले/अनावधानाने गहाळ झाले आहे, व शोधुन सापडलेले नाही. त्याबाबत रीतसर कार्यवाही केली आहे.

तरी सदरच्या वर उल्लेखीत मालमत्ते बाबत वा हरवलेल्या दस्ताबाबत कोणाचा कोणत्याहि प्रकारचा हक्क, संबंध, गहाण, अगर बोजा असल्यास, किंवा काही हीतसंबंध असल्यास, खालील पत्त्यावर कागद पत्रा सहित, आज पासुन सात (७) दिवसांचे आत भेटावे. अन्यथा कोणाचा कोणत्याहि प्रकारचा उजर चालणार नाहि. याची कृपया नोंद घ्यावि.

आपला
**शिशिर अरविंद देशपांडे**
अधिवक्ता, दिवाणी न्यायालयासमोर,
स्टेशन रोड, अकोला मो. ९८२३०९१३७७

## मुख्यमंत्री सहाय्यता निधीची नवीन ऑनलाईन प्रणाली होणार सुरू

■ प्रतिनिधी | अकोला ■

राज्यातील गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील रुग्णांना उपचारासाठी आर्थिक सहाय्य अधिक वेगात मिळणार आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाची अद्यावत ऑनलाईन प्रणाली सुरू होणार आहे. या प्रणालीमुळे अर्ज मंजुरीची प्रक्रिया कार्यालयीन ८ तासांत पूर्ण होणार आहे. विशेष म्हणजे आता रुग्णाऐवजी थेट कक्षाशी संलग्न असणाऱ्या रुग्णालयामार्फत अर्ज सादर होणार आहेत. त्यामुळे रुग्णाला कोणत्याही प्रकारचा अर्ज भरावा लागणार नाही. त्यामुळे उपचार प्रक्रियेला गती मिळणार आहे. या प्रणालीचे येत्या काही दिवसातच मुख्यमंत्री यांच्या हस्ते उदघाटन करण्यात येणार आहे.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी



■ प्रतिनिधी | अकोट ■

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त अकोट तालुक्यातील रूईखेड येथील श्री बागाजी विद्यालय व श्रीराम कनिष्ठ महाविद्यालयात विविध कार्यक्रमांचे उत्साहात आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात माजी प्राचार्या छाया पन्नासे यांच्या हस्ते डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व हारअर्पण करून करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी डॉ. आंबेडकर यांच्या कार्यावर प्रकाश टाकत त्यांच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक योगदानाचा गौरवपूर्ण आढावा घेतला. भारतीय समाजव्यवस्थेच्या उभारणीत त्यांच्या कार्याची महत्त्वपूर्ण भूमिका अधोरेखित करण्यात आली.

जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांसाठी परिसंवाद, विविध स्पर्धा तसेच नाविन्यपूर्ण उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना डॉ. आंबेडकर यांच्या विचारांची सखोल ओळख झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विशाल मांडवे यांनी केले, तर आभार प्रदर्शन अनिल ओखारे यांनी मानले. कार्यक्रमाला मुख्याध्यापक निनाद मानकर यांच्यासह किरण मानकर, अनिता मानकर, संतोष काळे, वनिता सरोदे, मंजुषा साठे, प्रा. रुपेश गायगोले, प्रा. रुपेश खंडारे तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## लोहारी खुर्द येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात

■ प्रतिनिधी | अकोट ■

लोहारी खुर्द येथील जिल्हा परिषद शाळेत भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दिनेश वानखडे होते. प्रमुख अतिथी म्हणून उपाध्यक्षा सौ. सुमेधा डोबाळे, सदस्या सौ. अस्मिता डोबाळे तसेच मुख्याध्यापक नितीन धोरण, शिक्षिका सोनाली उज्जैनकर व रुपाली ढवळे उपस्थित होत्या.



कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी बाबासाहेबांच्या जीवनावर आधारित गीते, विचार व मनोगते सादर करत वातावरण भारावून टाकले.

मुख्याध्यापक नितीन धोरण यांनी मार्गदर्शन करताना, 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा बाबासाहेबांचा संदेश आजही तितकाच प्रेरणादायी असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकी ज्ञान न घेता अभ्यासू वृत्ती जोपासावी, असे आवाहन त्यांनी केले. अध्यक्षीय भाषणात दिनेश वानखडे यांनी बाबासाहेबांच्या शिक्षणासाठी केलेल्या संघर्षाची माहिती देत विद्यार्थ्यांना प्रेरित केले. शिक्षिका रुपाली ढवळे यांनी संविधानाने दिलेल्या अधिकारांबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. सलोनी वानखडे व कु. गौरी म्हैसने यांनी केले, तर आभारप्रदर्शन सर्वेश म्हैसने यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक नितीन धोरण, सोनाली उज्जैनकर, रुपाली ढवळे व शाळेचे कर्मचारी भुजिंगराव इंगळे यांनी परिश्रम घेतले.

## वृत्तपत्र विक्रेता कल्याणकारी मंडळ तातडीने कार्यान्वित करा

### ▶ संघटनेचे मुख्यमंत्र्यांना निवेदन
### ▶ १४ महिन्यांपासून अंमलबजावणी रखडली

■ प्रतिनिधी | अकोट ■

राज्य शासनाने जाहीर केलेले वृत्तपत्र विक्रेता कल्याणकारी महामंडळ १४ महिने उलटूनही प्रत्यक्षात कार्यान्वित झाले नसल्याने विक्रेत्यांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. हे मंडळ तातडीने सुरू करावे, अशी मागणी अकोट तालुका वृत्तपत्र विक्रेता संघटनेच्या वतीने तहसीलदार डॉ. सुनिल चव्हाण यांच्या मार्फत मुख्यमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.



महाराष्ट्र शासनाने वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी स्वतंत्र कल्याणकारी महामंडळ स्थापन करण्याचा निर्णय घेतल्यानंतर राज्यातील हजारो कष्टकरी विक्रेत्यांमध्ये आशा निर्माण झाली होती. ११ मार्च रोजी विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात श्रीकांत भारतीय यांनी हा प्रश्न उपस्थित केला होता. त्यावेळी माहिती व जनसंपर्क मंत्री आशिष शेलार यांनी पुढील अधिवेशनापूर्वी महामंडळ स्थापन करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र अद्यापही अंमलबजावणी न झाल्याने नाराजी व्यक्त होत आहे. महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटना गेल्या १५ वर्षांपासून या मागणीसाठी सातत्याने पाठपुरावा करत आहे. वृत्तपत्र विक्रेते हे लोकशाही व्यवस्थेत माहितीचा प्रवाह जनतेपर्यंत पोहोचवणारे महत्त्वाचे दुवे आहेत. पहाटेच्या वेळी, प्रतिकूल परिस्थितीत काम करत असतानाही ते समाजसेवा बजावत असतात. तरीही असंघटित कामगार म्हणून त्यांना सामाजिक सुरक्षा, विमा, निवृत्ती वेतन आदी योजनांचा लाभ मिळत नाही. शासनाने घेतलेला महामंडळ स्थापनेचा निर्णय स्वागतार्ह असला तरी तो तातडीने कार्यान्वित करणे गरजेचे आहे. या माध्यमातून कष्टकरी विक्रेत्यांना न्याय मिळेल, अशी अपेक्षा संघटनेने व्यक्त केली आहे.

या निवेदनावेळी महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे अध्यक्ष सुनील पाटणकर, कार्याध्यक्ष बालाजी पवार, कोषाध्यक्ष राजेंद्र टिकार, सरचिटणीस विकास सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली अकोट तालुका संघटनेचे अध्यक्ष गणेश लोणकर, कार्याध्यक्ष प्रकाश आमले, सचिव संजय जोशी, उपाध्यक्ष सतीश देशमुख, कोषाध्यक्ष संजय कुलकर्णी यांच्यासह गिरीश कथले, जयंता कथले, गोपाल हिंगणकर, गजानन वडतकार, भरत बंगाले, प्रफुल कथले, कैलास बुढळकर, निलेश अवचार, रितेश नाथे, शंभू चव्हाण, प्रशांत ठोसर, गोपाल देशमुख, जितेश गंगातीरे, नितीन खांडेकर आदींसह बहुसंख्य वृत्तपत्र विक्रेते उपस्थित होते.

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १३१**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय



## संक्षिप्त

### राज्यपाल जिष्णूदेव शर्मा आज जिल्ह्यात



**वर्धा-** महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णू देव शर्मा १६ एप्रिल रोजी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहे. त्यांचा दौरा कार्यक्रम खालील प्रमाणे आहे. दि.१६ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता सेवाग्राम आश्रम हेलीपॅड येथे आगमन व राखीव. दुपारी ११.२५ वाजता महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय येथे आगमन व विश्वविद्यालयाच्या दिक्षांत समारोह कार्यक्रमास उपस्थित राहतील. दुपारी १२.४० वाजता सेवाग्राम हेलीपॅडकडे व तेथून हेलीकॉप्टरने नागपूरकडे प्रस्थान करतील.

### पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांचा दौरा



**वर्धा-** राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे दि.१५ एप्रिल रोजी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहे. त्यांचा दौरा कार्यक्रम खालीलप्रमाणे आहे. दि.१५ एप्रिल रोजी दुपारी १२.४५ वाजता सेलू तालुक्यातील केळझर येथे आगमन व पशुवैद्यकीय दवाखाना भूमिपूजन, आपले सरकार सेवा केंद्र आणि पशुवैद्यकीय चिकित्सालय सेलडोह इमारत लोकार्पण कार्यक्रमास उपस्थित राहतील. दुपारी ४.०५ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित पशुपालक आणि शेतकऱ्यांच्या समस्याबाबत आयोजित बैठकीस उपस्थिती. सायंकाळी ६ वाजता सालोड हिरापूर येथे विविध विकास कामांचे भूमीपूजन, महिला शेतकरी व पशुसखी सन्मान सोहळ्यास उपस्थित राहतील.

### क्षुल्लक वादातून मारहाण; एक जखमी, गुन्हा दाखल




**वर्धा -** उमरी (पोफळे) येथे क्षुल्लक कारणावरून झालेल्या वादाचे रूपांतर मारहाणीमध्ये झाले. संतापाच्या भरात काठीने मारहाण करण्यात आल्याने एक जण जखमी झाला आहे. हरीदास पांडुरंग अडवे (रा. उमरी) असे जखमीचे नाव असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. या घटनेमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. किरकोळ कारणावरून वाद वाढून हिंसाचार घडत असल्याच्या घटना वाढत असल्याची चर्चा नागरिकांत आहे. या प्रकरणी जखमी अडवे यांच्या तक्रारीवरून संतोष कुमरे (रा. उमरी) याच्याविरुद्ध गिरड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी पुढील तपास सुरू केला असून घटनेमागील कारणांचा सखोल शोध घेतला जात आहे.

### एकुर्ली शिवारात चोरी; कोंबड्या-शेळयांचा मुद्देमाल लंपास




**वर्धा-**एकुर्ली शिवारात अज्ञात चोरट्यांनी शेतातील बंड्यातून मोठ्या प्रमाणात जनावरांची चोरी केल्याची घटना समोर आली आहे. चोरट्यांनी तब्बल ५० कोंबड्या व १५ शेळ्या असा सुमारे ६३ हजारांचा मुद्देमाल लंपास केला. या घटनेमुळे शेतकरी वर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सतत वाढणाऱ्या चोरीच्या घटनांमुळे ग्रामीण भागातील सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनत आहे. साहिल बंडू गिरडकर (रा. एकुर्ली) यांनी याबाबत अल्लीपूर पोलिस ठाण्यात तक्रार नोंदविली आहे. पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला असून चोरट्यांचा माग काढण्यासाठी विशेष पथक कार्यरत असल्याची माहिती मिळाली.

### २७ ग्रामपंचायतींसाठी ३५ नामांकन अर्ज



**वर्धा-** जिल्ह्यातील २७ ग्रामपंचायतींसाठी होत असलेल्या पोटनिवडणुकीत सरपंच व सदस्य पदांसाठी एकूण ३५ नामांकन अर्ज दाखल झाल्याने निवडणूक प्रक्रियेला वेग आला आहे. यामध्ये सरपंच पदासाठी ८ तर सदस्य पदासाठी २७ अर्जांचा समावेश आहे. नामांकन अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया नुकतीच पूर्ण झाली असून आता छाननीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. या निवडणुकीत एकूण ३ सरपंच व ३८ सदस्य पदांसाठी मतदान होणार आहे. वर्धा जिल्ह्यातील विविध तहसीलमधील ग्रामपंचायतींचा यात समावेश असून काही ठिकाणी सदस्य पदांसाठी बिनविरोध निवडीची शक्यता व्यक्त होत आहे. दरम्यान, प्राप्त अर्जांची छाननी १५ एप्रिल रोजी करण्यात येणार आहे.२७ ग्रामपंचायतींच्या ३७ प्रभागांमध्ये होणाऱ्या या निवडणुकीसाठी २७ एप्रिल रोजी मतदान होणार असून २८ एप्रिल रोजी मतमोजणी होईल. सुमारे ११ हजार ४४५ मतदार सरपंच व सदस्यांची निवड करणार आहेत. निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पडावी यासाठी प्रशासनाकडून आवश्यक तयारी सुरू आहे.

### मुख्यमंत्री सहाय्यता निधीची नवीन ऑनलाईन प्रणाली होणार सुरू

# आता रुग्णाऐवजी थेट कक्षाशी संलग्न असणाऱ्या रुग्णालयामार्फत अर्ज सादर करता येणार

**मुंबई/जनमाध्यम**

राज्यातील गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील रुग्णांना उपचारासाठी आर्थिक सहाय्य अधिक वेगात मिळणार आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाची अद्यावत ऑनलाईन प्रणाली सुरू होणार आहे. या प्रणालीमुळे अर्ज मंजुरीची प्रक्रिया कार्यालयीन ८ तासांत पूर्ण होणार आहे. विशेष म्हणजे आता रुग्णाऐवजी थेट कक्षाशी संलग्न असणाऱ्या रुग्णालयामार्फत अर्ज सादर होणार आहेत. त्यामुळे रुग्णाला कोणत्याही प्रकारचा अर्ज भरावा लागणार नाही. त्यामुळे उपचार प्रक्रियेला गती मिळणार आहे. या प्रणालीचे येत्या काही दिवसातच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उदघाटन करण्यात येणार आहे अशी माहिती मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्षा कडून देण्यात आली आहे.

गेल्या काही वर्षभरापासून मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षामध्ये नावीन्य पूर्ण रुग्णस्नेही बदल करण्याचे काम सुरु आहे. त्याचाच एक भाग मुख्यमंत्री सहाय्यता निधीची नवी ऑनलाईन प्रणाली असणार आहे. रुग्णाने रुग्णालयात सर्व रीतसर कागदपत्रे दिल्यानंतर रुग्णालय प्रशासन त्याचा अर्ज मुख्यमंत्री सहायता निधी कार्यालयाकडे मंजुरीसाठी पाठविणार आहे. त्या ठिकाणी नियमानुसार सर्व कागदपत्रे असल्यास अर्ज मंजुरीची प्रक्रिया कार्यालयीन ८ तासांत पूर्ण होणार आहे. यामुळे रुग्ण आणि त्याच्या नातेवाईकाला मोठा दिलासा मिळणार आहे. तसेच, गेल्या आर्थिक वर्षात १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत राज्यातील तब्बल ४० हजार ७७६ रुग्णांना ३३३ कोटी ६ लाख ८१ हजार ५०० रुपयांची वैद्यकीय मदत देण्यात आली आहे.

मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्षाचे कक्षप्रमुख रामेश्वर नाईक म्हणाले की, रुग्णांना वेळेत उपचार मिळावेत, यासाठी ही ऑनलाईन प्रणाली विकसित करण्यात येत आहे. यामुळे आता अर्ज मंजुरीची प्रक्रिया जलद होऊन रुग्णांना मोठा दिलासा मिळणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या नवीन प्रणालीचे अधिकृत उद्घाटन लवकरच होणार असून, त्यानंतर राज्यभरात ती प्रभावीपणे राबवण्यात येणार आहे. अधिक माहितीसाठी गरजू रूग्णांनी १८०० १२३ २२११ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा.

# ड्रोन व तत्सम हवाई साधने प्रक्षेपणास प्रतिबंध

**वर्धा/जनमाध्यम**

महामहिम राष्ट्रपती यांचा दि.१६ एप्रिल रोजी वर्धा येथे संभावित दौरा आहे. दौऱ्यादरम्यान कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये याकरीता १५ व १६ एप्रिल रोजी ड्रोन अथवा तत्सम हवाई साधने, पॅराग्लायडर, पॅरामोटर्स, हॅडग्लायडर्स इत्यादी साधने वापरण्यास प्रतिबंध घालण्यात आला आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी याबाबत आदेश निर्गमित केला आहे.

महामहिम राष्ट्रपती यांचा सेवाग्राम येथील कस्तुरबा सोसायटीचे हेलीपॅड, बापूकुटी आश्रम सेवाग्राम व महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय येथे नियोजित दौरा आहे. त्याअनुषंगाने कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी या अवकाशीय उपकरणांच्या प्रक्षेपणास बंदी घालण्यात आली आहे.

जिल्हाधिकाऱ्यांनी आदेशात नमुद केल्यानुसार १५ एप्रिल रोजी ००.०१ वाजतापासून ते १६ एप्रिलच्या रात्री २४.०० वाजतापर्यंत ड्रोन अथवा तत्सम हवाई साधने, पॅराग्लायडर, पॅरामोटर्स, हॅडग्लायडर्स इत्यादी साधने प्रक्षेपण वापरण्यास प्रतिबंध राहणार आहे. या मनाई आदेशाचे उल्लघंन करणाऱ्यांवर भारतीय नागरिक सुरक्षा संहिता -२०२३ च्या कलम १६३ प्रमाणे कारवाई करण्यात येईल, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# ४० अंशांच्या कडक उन्हात 'जय भीम'चा जल्लोष



**वर्धा/जनमाध्यम**

प्रखर उन्हाच्या झळा अंगावर घेत, ४० अंशांच्या वर गेलेल्या तापमानातही भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी वर्धेकरांचा उत्साह मात्र तसूभरही कमी झालेला दिसला नाही. सिव्हिल लाईन परिसरातील बाबासाहेबांच्या पूर्णाकृती पुतळ्यापुढे महिला, पुरुष, युवक-युवती तसेच लहान मुलांचीही लांबलचक रांग लागलेली पाहायला मिळाली.

कडक उन्हामुळे अंगाची लाही लाही होत असतानाही नागरिक तासन्तास संयमाने रांगेत उभे राहून महामानवांना अभिवादन करत होते. 'जय भीम'च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता. निळ्या झेंड्यांनी सजलेला परिसर आणि जयघोषांनी भारलेले वातावरण यामुळे संपूर्ण परिसरात उत्सवाचा रंग चढला होता.महिलांसह ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांचाही मोठ्या प्रमाणावर सहभाग विशेष लक्षवेधी ठरला. उष्णतेची तीव्रता जाणवत असतानाही नागरिकांनी शिस्तबद्ध पद्धतीने रांगा लावत अभिवादन केले. अनेकांनी डोक्यावर रुमाल, पाण्याच्या बाटल्या घेऊन उन्हाचा सामना करत बाबासाहेबांप्रती कृतज्ञता व्यक्त केली.दरम्यान, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या वतीने विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

तसेच सामाजिक एकता, समता आणि बंधुतेचा संदेश देणारे उपक्रमही राबविण्यात आले.वर्ध्यातील हा जयंती उत्सव केवळ औपचारिक कार्यक्रम न ठरता, कडाक्याच्या उन्हातही बाबासाहेबांप्रती असलेल्या अटळ श्रद्धेचा आणि सामाजिक बांधिलकीचा जाज्वल्य प्रत्यय देणारा ठरला.

## अभिवादनासाठी नागरिकांच्या रांगा

### सेवाग्राम मेडिकल चौकात आंबेडकर जयंती उत्साहात

**सेवाग्राम-**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त सेवाग्राम येथील मेडिकल चौकात प्रज्योत ग्रुपच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करून जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. सामाजिक एकात्मतेचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमाची सुरुवात बाबासाहेबांच्या प्रतिमेला वंदन करून करण्यात आली. सेवाग्राम पोलिस ठाण्याचे ठाणेदार नागेशकुमार चतरकर, ज्येष्ठ पत्रकार अजिज शेख, डॉ. शिल्पा सक्सेना, आशा खोब्रागडे तसेच सामाजिक कार्यकर्ते धनराज बलविर यांच्या हस्ते केक कापून जयंती साजरी करण्यात आली. उपस्थित मान्यवरांनी बाबासाहेबांच्या विचारांचे स्मरण करून समाजात समता, बंधुता आणि शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले.यानंतर नागरिकांसाठी लंगरचे आयोजन करण्यात आले होते. मोठ्या संख्येने नागरिकांनी या उपक्रमाचा लाभ घेतला. कार्यक्रमादरम्यान 'जय भीम'च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता.या प्रसंगी प्रज्योत ग्रुपचे अध्यक्ष कवडूजी ठेंगरे, प्रितम ताकसांडे, प्रति देहार, बाबासाहेब दिवेकर, मंगेश मून, प्रफुल बुरबुरे, अमर भालशंकर, सचिन भालशंकर, निखिल बलविर, आकाश भोंगाडे, प्रज्वल कामडे, श्रीकांत वासनिक, सुशिल बलविर, विनोद मून, प्रेमदास चारवे, पंकज भोयर, सुनिल डोंगरे यांच्यासह अनेक कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### यशवंत विद्यालयात जयंती उत्साहात



**वायगाव(नि.)-**येथील यशवंत विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य चंद्रकांत ठाकरे होते.

यावेळी ज्येष्ठ शिक्षिका भारती कार्लेकर, क्रीडा शिक्षक प्रवीण सातोकार, प्राध्यापिका वनिता देशमुख तसेच प्रा. शैलेंद्र निकोसे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व अभिवादन करून करण्यात आली.अध्यक्षीय भाषणात प्राचार्य ठाकरे यांनी डॉ. आंबेडकर यांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, महामानवांनी देशासाठी दिलेले योगदान अत्यंत मोलाचे असून त्यांचे विचार आजही समाजाला दिशा देणारे आहेत. यावेळी मी प्रथम भारतीय आणि अंततः भारतीयच आहे, हा त्यांचा विचार उपस्थितांना प्रेरणादायी ठरला.

कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी तसेच मान्यवरांनी डॉ. आंबेडकर यांच्या जीवनचरित्रावर प्रकाश टाकत त्यांच्या कार्याची महती विषद केली. जयंतीनिमित्त विद्यालयात वकृत्व स्पर्धा व निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण करण्यात आले.कार्यक्रमाचे संचालन प्रा. लूकेश जरीले यांनी केले, प्रास्ताविक सुनील ढाले यांनी मांडले तर आभार प्रदर्शन प्रा. शिरीष फाळके यांनी केले. शेवटी विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करून कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

### पुलगावात आंबेडकर जयंतीचा जल्लोष

# हजारोंचा सहभाग, शहर निळया रंगात न्हाऊन निघाले

**पुलगाव/जनमाध्यम**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त पुलगाव शहरात उत्साह, अभिमान आणि एकतेचा अद्भुत संगम अनुभवायला मिळाला. हजारोंच्या संख्येने भीमसैनिक, महिला-पुरुष, युवक-युवती रस्त्यावर उतरले होते. 'जय भीम'च्या गजराने शहर दुमदुमून गेले होते, तर सर्वत्र निळ्या झेंड्यांची व सजावटीची रेलचेल दिसून येत होती. जयंती उत्सवाची सुरुवात १३ एप्रिल रोजी रात्री ९ वाजता पुलगाव नगरपालिका प्रांगणातील डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून झाली. मेणबत्ती प्रज्वलित करून अभिवादन करण्यात आले. परिसर आकर्षक फुलांच्या सजावटीने उजळून निघाला होता.



त्यानंतर भीमगीतांच्या सुरेल कार्यक्रमाने वातावरण भारावून गेले. मध्यरात्री १२ वाजता १३५ किलोचा केक कापून जयंती साजरी करण्यात आली.१४ एप्रिल रोजी सकाळी ७ वाजल्यापासून नागरिकांनी पुतळयाला अभिवादन करण्यासाठी मोठी गर्दी केली. नगराध्यक्ष कविता सुनील ब्राह्मणकार, उपाध्यक्ष दीपक आहुजा, विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, नगरसेवक, पत्रकार संघाचे सदस्य तसेच सामाजिक संस्थांच्या प्रतिनिधींनी बाबासाहेबांना अभिवादन केले.सकाळी ११ वाजता पँथर चौकातून भव्य पायी व दुचाकी रॅलीला प्रारंभ झाला. शहरातील प्रमुख मार्गांवरून ही रॅली काढण्यात आली. डीजेच्या तालावर युवक-युवती उत्साहात नृत्य करत 'जय भीम'चा जयघोष करत होते. रॅलीदरम्यान ठिकठिकाणी शीतपेय, अल्पोपहार व मिठाईचे वितरण करण्यात आले. नागरिकांनी मोठ्या उत्साहात रॅलीचे स्वागत केले.रॅलीचा समारोप बुद्ध विहार येथे करण्यात आला. संपूर्ण कार्यक्रम शांततेत व उत्साहात पार पडला. या जयंती उत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी भीमसैनिकांनी मोठ्या प्रमाणात परिश्रम घेतले.पुलगावातील हा जयंती उत्सव केवळ परंपरा नसून सामाजिक ऐक्य, समता आणि स्वाभिमानाचा संदेश देणारा ठरला.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त निबंध स्पर्धा

**वर्धा/जनमाध्यम**

कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागाच्या पुढाकारातून भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त १४ ते २० एप्रिल या कालावधीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलांसाठी केलेले कार्य या विषयावर निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. सदर निबंध स्पर्धा दोन गटामध्ये आयोजित करण्यात आली आहे. पहिल्या गटात आयटीआय, डिप्लोमा, बायफोकल व एमसीव्हीसी विद्यार्थ्यांचा समावेश असणार असून निबंध शब्द मर्यादा ५०० ते ८०० शब्द आहे. दुसऱ्या गटात पुरुष व महिलावर्गाचा समावेश असून ८०० ते १२०० शब्द मर्यादा असणार आहे. स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकविणाऱ्याला ३१ हजार रुपये, द्वितीय २१ हजार रुपये व तृतीय ११ हजार रुपयाचे पारितोषिक दिले जाणार आहे.निबंध स्पर्धेत सहभागी होणाऱ्या विद्यार्थी, महिला व पुरुषांनी आपले निबंध पीडीएफ स्वरुपात सादर करावे, असे कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन अधिकारी यांनी कळविले आहे.

### गोठ्यातून गाय-वासरू चोरा

**वर्धा-**बोरगाव नांदोरा शिवारात शेतातील गोठ्यात बांधून ठेवलेले गाय-वासरू अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकारामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून शेतकऱ्यांमध्ये संताप व्यक्त होत आहे. रामभाऊ खोत (रा. बोरगाव नांदोरा) यांचे सुमारे ८५ हजारांचे आर्थिक नुकसान झाले आहे. शेतमालासोबतच जनावरांच्या सुरक्षेचाही प्रश्न ऐरणीवर आला आहे. वाढत्या चोरीच्या घटनांमुळे ग्रामीण भागातील नागरिक चिंतेत आहेत. या प्रकरणी रामभाऊ खोत यांनी दिलेल्या तक्रारीवरून सावंगी पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# महिलांच्या विविध कौटूंबिक समस्याच्या ९२४ प्रकरणापैकी ८९४ प्रकरणाचा निपटारा

## महिला समुपदेशन केंद्रामार्फत कारवाई

**वर्धा/जनमाध्यम**

जिल्ह्यात महिला व बाल विकास विभागाच्यावतीने महिलांचे कौटूंबिक वाद व समस्याच्या निवारणासाठी सल्ला देणे आदी करीता समुपदेशन केंद्र स्थापित करण्यात आलेले आहे. या केंद्रामार्फत महिलांच्या विविध कौटूंबिक समस्याच्या ९२४ प्रकरणापैकी ८९४ प्रकरणाचा निपटारा करण्यात आला आहे.



१ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीमध्ये समुपदेशन केंद्राकडे ९२४ प्रकरणे प्राप्त झाली असुन एकुन ८२४ प्रकरणात निपटारा करण्यात आला आहे त्यात ४४३ प्रकरणामध्ये आपसी समझौता करण्यात आला, १४० प्रकरणे संरक्षण अधिकारी यांच्या पाठविण्यात आले, १० प्रकरणांमध्ये महिलेची स्त्रीधन मिळवुन देण्यात आले. ७ प्रकरणांमध्ये मुलांचा ताबा मिळवुन देण्यात आला. १२१ प्रकरणांमध्ये कायदेविषयक सल्लाकरीता न्यायालयाकडे पाठविण्यात आले, तसेच २० प्रकरणांना इतर सेवा उपलब्ध करुन देण्यात आल्या व उर्वरित ३० प्रकरणांमध्ये कार्यवाही सुरु आहे. सदर समुपदेशन केंद्राचा लाभ जास्तीत नागरीकांनी घ्यावा असे आवाहन श्रीमती तृप्ती चव्हाण, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी वर्धा यांनी केले आहे.

महिला व बालविकास विभाग अंतर्गत वर्धा जिल्हयात पोलिस स्टेशन परीसर सेलु, हिंगणघाट,कारंजा व महिला व मुलांचे सहाययता कक्ष पोलिस अधिक्षक कार्यालय वर्धा येथे एकुण ४ समुपदेशन केंद्र कार्यरत आहे. सदर समुपदेशन केंद्राचा उद्देश असा आहे कि, महिला समुपदेशन केंद्रात कौटुंबिक वाद असलेल्या पती-पत्नीतील वाद सोडविण्याचा प्रयत्न केला जातो. सदर पती-पत्नीतील वाद न्यायालयात न जाता व दोन जिवांची ताटातूट होवू नये, मूलांची आबाळ हेळसांड होवू नये यासाठी महिला समुपदेशन केंद्राची स्थापना करण्यात आलेली आहे. तसेच महिलांना त्यांच्या कौटूंबिक, कायदेविषयक, सामाजिक समस्या सोडविण्याकरीता मदत करणे तसेच कौटूंबिक समस्येमध्ये समुपदेशन करणे व महिलांना पोलिस मदत, विधी सहाय्य, वैदयकीय मदत, आश्रय गृह अशा इतर आवश्यक मदत मिळवुन देण्याकरीता समुपदेशन केंद्र कार्य करीत आहे.सदर महिला समुपदेशन केंद्राकडे कौटुंबिक वाद, शारीरीक, आर्थिक व मानसिक त्रास, दारु पिणे, स्वभाव दोष, इतरांचा हस्तक्षेप, विवाहबाहय संबंध, दुसरी पत्नी, स्त्रीधन इत्यादी कारणामुळे प्राप्त तक्रारींचा समावेश होतो.सदर तक्रारींच्या अनुषंगाणे समुपदेशक दोन्ही पक्षांचे म्हणने ऐकुन घेवुन निपटारा करता येण्याजोग्या प्रकरणांमध्ये निपटारा करुन प्रकरणे निकाली काढतात. तसेच ज्या प्रकरणांमध्ये निपटारा होवु शकत नाही अशा प्रकरणांमध्ये कौटूंबिक हिंसाचारापासून महिलांचे सरंक्षण अधिनियम २००५ अंतर्गत न्यायालयात जाण्याचा सल्ला दिला जातो.


जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक १३८**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**- अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# जिल्हात विविध ठिकाणी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन







**अमरावती- भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विद्यालय, महाविद्यालय, समिती आणि ग्रामपंचायत, कार्यालयात विविध शैक्षणिक व प्रेरणादायी उपक्रमांचो आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमांतर्गत वाचन प्रेरणा अभियान, प्रश्नमंजुषा स्पर्धा,व्याख्यान, भाषण स्पर्धा तसेच निबंध लेखन स्पर्धा,पुस्तके व ग्रंथ भेट यांचे आयोजन करण्यात आले.**

**जिल्हाधिकारी कार्यालय**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त आज जिल्हाधिकारी कार्यालयात अपर जिल्हाधिकारी गोविंद दानेज यांनी पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे, उपजिल्हाधिकारी महसूल विवेक जाधव, अधिक्षक निलेश खटके, विधी अधिकारी नरेंद्र बोहरा, नाझर विजय सांगळे तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांनी डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

**जिल्हा माहिती कार्यालयात**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त आज जिल्हा माहिती कार्यालय येथे जिल्हा माहिती अधिकारी गजानन कोटूरवार यांनी पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. यावेळी मनोज थोरात, योगेश गांवडे, सागर राणे, कोमल भगत, साजिद अख्तर शेख यांनीही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

**डॉ. आंबेडकर यांच्या जयंती निमित्त व्याख्यान**

**पापड-** जवळच्या पापळ येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती निमित्त निलचक्र परिवर्तन समिती आणि ग्रामपंचायत पापळ यांच्या संयुक्त विद्यमाने विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

'आजची शिक्षण पद्धती आणि कौशल्य विकास' या विषयावर आयोजित व्याख्यान कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून सामाजिक कार्यकर्ते अजय घरडे यांनी काळानुसार आपण स्वतः मध्ये कौशल्य विकसित केले पाहिजे. असे दिशादर्शक मत व्याख्यानातून व्यक्त केले. तर हिंदूकोड बिल या विषयी सामाजिक कार्यकर्ते रवी गणवीर यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर याचं योगदान आणि महिलांनी कायदाचा अभ्यास केला पाहिजे असो मत यावेळी व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष छोटू मुंदे यांनी सर्वधर्म समभाव राहूनच समाजात एकोपा राहू शकतो असे सांगून थोर मानवांचे विचार आपल्या अंगी रुजवावे असे आवाहन यावेळी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.निशिगंधा सोनोने यांनी केले. कार्यक्रमाला सर्व महिला मंडळ तथा समस्त सुकळी गुरव ग्रामस्थ उपस्थित होते.



## विद्यानिकेतन इंग्लिश स्कूल,नेरपिंगळाई

**लेहेगाव-** विद्यानिकेतन इंग्लिश स्कूल,नेरपिंगळाई येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.त्यांच्या जयंती निमित्त वर्ग १ ते ८ साठी प्रश्नमं जूषा स्पर्धा घेण्यात आली. त्यामध्ये क्रमांक पटकविलेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले. या कार्यक्रमाला शाळेच्या संचालिका सोनाली ग. नवले यांनी प्रमुख उपस्थिती दर्शविली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान शाळेचे मुख्याध्यापक सिद्धांत म. दाभेकर व प्रमुख अतिथी म्हणून पायल नंदरधने यांनी भूषविले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सायली इंगळे व आभार प्रदर्शन मयुरी बुरंगे यांनी केले.या कार्यक्रमाला प्रिया झोडगे,निकिता संभे,श्रध्दा पांडे,अनुराधा मोरस्कर,शितल काकस, पल्लवी तायडे आणि सर्व शिक्षकेत्तर कर्मचारी शिला उपरीकर, सुवर्णा पातुरकर उपस्थित होत्या.





## मनपात विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात

अमरावती/का.प्र.

१४ एप्रिल,२०२६ रोजी विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात अमरावती महानगरपालिकेत साजरी करण्यात आली. विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्य महापौर श्रीचंद तेजवाणी यांचे शुभहस्ते विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रतिमेस हारार्पण विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृह येथे करण्यात आले.

यावेळी उपमहापौर सचिन भेंडे, अमरावती महानगरपालिका आयुक्त वर्षा लड्डा, स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर, सभागृह नेता चेतन गावंडे, विरोधी पक्षनेता विलास इंगोले, गटनेता नाना आमले, विधी समिती सभापती स्नेहा लुल्ला, महिला व बाल कल्याण समिती सभापती ममता आवारे, नगरसेवक बबलु शेखावत, संजय नरवणे,आशिष अतकरे, धीरज हिवसे, मिलींद बांबल, प्रमोद महल्ले, चंदु खेडकर,दिपक साहू सम्राट,सचिन वैद्य, इस्माईल लालुवाले, ॲड.प्रशांत देशपांडे, नगरसेविका सुरेखा लुंगारे,स्वाती कुलकर्णी, सोनाली नाईक,नुतन भुजाडे,प्रियंका पाटणे, अर्चना पांडे,अर्चना पाटील,मीनल सवाई,विद्या माटे, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक,उपायुक्त नरेंद्र वानखडे, उपायुक्त योगेश पिठे,मुख्यलेखाधिकारी तथा मुख्यलेखापरिक्षक श्यामसुंदर देव, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर,नगरसचिव संदिप वडुरकर, उपअभियंता जयंत काळमेघ, सुरेश रतावा, भुषण पाटणे, सचिन नाईक,आशिष लुल्ला, अशोक पांडे, संदिप आवारे, भुषण खडेकार, शिवा फुटाणे, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

त्यानंतर विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक (इर्विन) येथील विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळ्यास हारार्पण करण्यात आले.विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या वेशभुषेत सर्जेराव गलपट यावेळी उपस्थित होते.



## तनसुखदास राठी विद्यालय

**कुऱ्हा-** श्री. गणेशदास राठी छात्रालय समिती अमरावती द्वारा संचालित तनसुखदास राठी विद्यालय वऱ्हा येथे १४ एप्रिलला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यालयाचे मुख्याध्यापक संजय पाचंगे होते.प्रमुख अतिथी म्हणून जीआरसीएस कॉन्व्हेंटच्या मुख्याध्यापिका सरिता मुंधडा तसेच जेष्ठ शिक्षक निवृत्ती सातपुते, मंगेश भालेराव व्यासपिठावर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमापुजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक भूमिका ठाकरे यांनी केले. डॉ. आंबेडकरांच्या जयंती निमित्त अनन्या धनंजय नाखले, भावना अतुल मातकर, इशिका सावरकर, नुपूर राऊत, मोक्षाली राऊत यांनी इंग्रजी भाषेतून भाषणे दिली. लावण्य अजमिरे,सोहम देवळे,आर्या लुटे,जीविका मलवार, यांनी त्याच्या कार्याबद्दल माहिती सादर केली. अंतरा बुगुल हिने डॉ आंबेडकरांनी महाड येथील चवदार तळ्याचा सत्याग्रहाद्वारे अस्पृश्य बांधवांना पिण्याचे पाणी कसे खूले करून दिले याबद्दल कवितेच्या माध्यमातून सादरीकरण केले. सुरेंद्र गणोरकर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अत्यंत कठीण परिस्थितीतून शिक्षण घेतले. याबद्दल मोलाचे मार्गदर्शन केले. मंगेश भालेराव यांनी आपल्या मनोगतातून डॉ आंबेडकरांच्या जीवन चरित्राची माहिती सादर केली. आपल्या अध्यक्षीय भाषणातून संजय पाचंगे यांनी शालेय जीवनामध्ये डॉ.आंबेडकरांना अस्पृश्यतेचा सामना करावा लागला. ते भारताच्या संविधानाचे मुख्य शिल्पकार होते.त्यांनी संविधानाच्या माध्यमातून न्याय,स्वातंत्र्य,समता बंधुत्व ही शिकवण सर्व बांधवांना दिली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राधिका गांजरे हिने केले. तर आभार मानवी वानखडे हिने व्यक्त केले. कार्यक्रमाचे मुख्य आयोजन रत्नप्रभा डोंगरे यांनी केले होते.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षिका, तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी व इयत्ता आठवीच्या सर्व विद्यार्थी आणि विद्यार्थिनींनी अथक परिश्रम घेतले.

## विद्यापीठात 'समता सप्ताह' उत्साहात

**अमरावती-** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्ताने विद्यापीठातील संविधान शिल्प येथून डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकापर्यंत भव्य रॅली काढण्यात आली. रॅलीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कटआऊट लावण्यात आले होते. कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांच्या प्रमुख उपस्थितीत रॅलीला सुरुवात झाली. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीचे औचित्य साधून संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात आयोजित करण्यात आलेल्या 'समता सप्ताहाचा' समारोप झाला.८ एप्रिलपासून सुरू झालेल्या या सप्ताहात विविध प्रबोधनात्मक आणि शैक्षणिक कार्यक्रमांद्वारे समतेचा संदेश देण्यात आला. सर्वप्रथम



कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून विद्यापीठाच्यावतीने त्यांना अभिवादन केले.याप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे उपस्थित होते.यावेळी विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. प्रविण रघुवंशी, डॉ.मनिषा कोडापे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ.नितीन कोळी, वित्त व लेखा अधिकारी सीए. पुष्कर देशपांडे, नवोपक्रमचे संचालक डॉ. अजय लाड, रासेयो संचालक डॉ. निलेश कडू, डॉ.आंबेडकर अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ.संतोष बनसोड, विद्यापीठ आरोग्य अधिकारी डॉ. स्मिता थोरात, डॉ. प्रेमानंद तिडके, डॉ. गजानन मुळे, तसेच डॉ. प्रफुल्ल गवई, डॉ. मनिष गवई, डॉ. रत्नशील खोब्रागडे, विद्यापीठ कार्यकारी अभियंता शशिकांत रोडे, डॉ. दादाराव चव्हाण,विक्रांत मालवीय,मंगेश वरखेडे,मिनल मालधुरे, राहुल नरवाडे, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर, विद्यापीठ कर्मचारी संघाचे अध्यक्ष अजय देशमुख यांचेसह विद्यापीठाचे अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

# भारतरत्नाच्या विचारांचे दर्शन पुतळा सौंदर्यकरणातून घडविणार-आ.प्रताप अडसड

## नगराध्यक्षा डॉ अर्चना अडसड (रोठ) यांचे हस्ते भूमिपूजन

**धामणगाव रेल्वे/वार्ताहर**

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या समता, बंधुता, न्याय आणि शिक्षणाच्या विचारांचा संदेश समाजाच्या सर्व स्तरांपर्यंत पोहोचविण्यासाठी त्यांच्या विचारांचे दर्शन पुतळा सौंदर्यकरणातून घडविणार असल्याचे मत आ. प्रतापदादा अडसड यांनी व्यक्त केले.

शहराच्या सर्वांगीण विकासाला चालना देत नगरपरिषद कार्यालय परिसरात असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याच्या सौंदर्यकरणाच्या ३० लक्ष रुपये किमतीच्या कामाचे भूमिपूजन महामानवाच्या जयंतीदिनी आ.प्रतापदादा अडसड यांच्या पुढाकाराने नगराध्यक्षा डॉ अर्चना



अडसड - रोठे यांचे हस्ते करण्यात आल, यावेळी प्रमुख अतिथी न. प उपाध्यक्ष गिरीश मुंदडा, बांधकाम सभापती मंजिरी भोगे, यांची उपस्थिती होती.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा परिसर हा सामाजिक व ऐतिहासिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा असून दररोज मोठ्या संख्येने नागरिक, विद्यार्थी आणि आंबेडकरी अनुयायी येथे भेट देतात त्यामुळे रात्रीच्या वेळी उत्कृष्ट दृश्यतेसाठी विद्युत रोषणाई, स्वच्छता व्यवस्था पुतळा परिसराचे सर्वंकष आणि नियोजनबद्ध सौंदर्यीकरण करण्यात येणार असल्याचे नगराध्यक्षा डॉ अर्चना अडसड - रोठे म्हणाल्या .यावेळी नगरसेवक नरेंद्र चौधरी , डॉ. हेमकरण कांकरीया, गोपाल द्विवेदी, रवि कुकरेजा, मुरलीधर पतके, दर्शन राठी, जगदीश रॉय ,विलास बूटले, अंशुल बडगैया, प्रतिभा खोब्रागडे, मनिषा शिरभाते, रीना साहू, रंजना शेलोकार, सीमा बागडे, प्रियंका जवंजाळ, काजल उपरीकर, सीमा पेंदाम, अंजली मार्वे,तसेच बाबासाहेब आंबेडकर कर्मचारी संघटनेचे विलास पाटील, सुरेंद्र मनोहर, ईश्वरदास बागडे ,संजय श्रीरामे, रीपाई आठवले गटाचे नेते प्रशांत मुन, रवी मेश्राम सिद्धार्थ टाले ,सदानंद कांबळे प्रेम मोटघरे, भाजपा महिला आघाडीच्या जिल्हा उपाध्यक्ष ज्योती पाटील यांची उपस्थिती होती.

## आसेगाव येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादनासह लिंबू शरबत वाटप



**आसेगाव पूर्णा -** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त आसेगाव येथील बस स्थानकावर विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी विश्वरत्न युवा बहुउद्देशीय मंडळ व पंचक्रोशीतील नागरिकांच्या वतीने उभारण्यात आलेल्या लिंबू सरबत स्टॉलचे उद्घाटन ठाणेदार सुरज तेलगोटे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमादरम्यान आंबेडकरांच्या प्रतिमेचे पूजन करून उपस्थितांनी अभिवादन केले.ग्रामस्थांनी फटाके फोडून व जयघोष करत उत्साह व्यक्त केला.तसेच प्रवाशांना लिंबू सरबताचे वाटप करण्यात आले, ज्याचा अमरावती–परतवाडा मार्गावरील प्रवाशांनी लाभ घेतला.कार्यक्रमास परिसरातील सामाजिक कार्यकर्ते व महिलांची लक्षणीय उपस्थिती होती.

## कला व विज्ञान महाविद्यालयात महात्मा ज्योतीबा फुले जयंती



**कुऱ्हा-** कला व विज्ञान महाविद्यालय,येथे ज्योतीबा फुले जयंती उत्साहात व आदरपूर्वक साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय अभ्यंकर होते, तर प्रमुख वक्ता म्हणून डॉ. हर्षा कांबे उपस्थित होत्या.कार्यक्रमाची सुरुवात महात्मा ज्योतीबा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यानंतर डॉ. निशा जोशी यांनी प्रास्ताविक केले. आपल्या मार्गदर्शनपर भाषणात डॉ. हर्षा कांबे यांनी महात्मा फुले यांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि स्त्री-शिक्षणाच्या कार्याचा आढावा घेतला. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. अजय अभ्यंकर यांनी विद्यार्थ्यांनी महात्मा फुले यांच्या विचारांचा अभ्यास करून समाजातील समता, शिक्षण आणि मानवतेच्या मूल्यांचा अंगीकार करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्र वंदना आणि 'वंदे मातरम' गीताने झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नुतन ठाकरे हिने केले, तर आभारप्रदर्शन अश्विनी किरमरे हिने मानले. या प्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जगातील सर्वोत्कृष्ठ संविधान भारताला प्रदान करणारे महामानव डॉ. आंबेडकर

## १३५ व्या जयंतीनिमित्त बाबासाहेबाना आ.सुलभा खोडके यांनी केले अभिवादन

**अमरावती/का.प्र.**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्याने अमरावती रेल्वे स्टेशन चौक ते मध्यवर्ती बस स्थानक मार्ग परिसर स्थित जनसंपर्क कार्यालयात आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. जगातील सर्वोत्कृष्ठ संविधान भारताला प्रदान करणारे महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त सर्वप्रथम आ. सुलभा खोडके व आ. संजय खोडके यांनी विश्वरत्न बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करीत त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन केले.



यासोबतच बाबासाहेब आंबेडकर भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून त्यांचे योगदान केवळ कायदे लिहिण्या पुरते मर्यादित नाही. त्यांनी भारताच्या भवितव्याची दिशा ठरवली. समानता, स्वातंत्र्य आणि बंधुता या मूल्यांना त्यांनी राज्यघटनेतून मूर्तरूप दिले. आज आपण ज्या लोकशाहीत जगतो, तिची भक्कम पायाभरणी बाबासाहेबांनी केली आहे.

मतदानाचा अधिकार, समानतेचा अधिकार, अभिव्यक्ती स्वातंत्र्य हे सर्व त्यांच्या विचारांचेच फलित आहे.संविधान म्हणजे फक्त कलमे नाहीत तर ते आपल्या सगळ्यांच्या आयुष्याचे संरक्षण कवच आहे. यामुळे प्रत्येक नागरिकाला सन्मानाने जगण्याची दिशा मिळाली. आजच्या काळात विकास, बदल आणि विविधता यांसोबतच परस्पर समज आणि आदर यांचीही गरज आहे. बाबासाहेबांनी दिलेले संविधान हे आपल्या देशाची सर्वात मोठी ताकद आहे.

ते जपणे आणि त्यानुसार जगणे ही आपली सामूहिक जवाबदारी आहे. १४ एप्रिल साजरी करताना आपण हा विचार मनात ठेवला तर तीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.या शब्दसुमनांनी आ.संजय खोडके यांनी उपस्थितांना संबोधित केले. आ.सुलभा खोडके यांच्या जनसंपर्क कार्यालयातील अभिवादन कार्यक्रमाची सांगता झाल्यानंतर आ. सुलभा खोडके व आ. संजय खोडके यांच्या समवेत सर्व राष्ट्रवादी परिवार सदस्यांनी तदनंतर इर्वीन चौक परिसर स्थित डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसर येथे जाऊन महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करीत विनम्र अभिवादन केले.'बाबासाहेबांचे संविधान म्हणजे. एकसंघ भारताची पोलादी चौकट' असे अशा गगनभेदी घोषणा देत याप्रसंगी राष्ट्रवादी परिवार सदस्यांनी आसमंत दणाणून टाकल्याचे दृश्य दिसून आले. यावेळी इर्वीन चौक परिसरात आयोजित सामूहिक अभिवादन स्थळी आयोजित विविध कार्यक्रम व उपक्रमात सर्वांनी सहभाग नोंदवला. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्व सदस्य, पदाधिकारी, मनपा नगरसेवक प्रामुख्याने उपस्थित होते.

# जिलेटीन-डिटोनेटरच्या स्फोटांनी सातपुड्याचा कणा पोखरला

## नरनाळा अभयारण्यालगतचा संवेदनशील परिसर धोक्यात

### शेतकरी, वन्यजीव आणि धरणाची सुरक्षितता संकटात







**ॲड. समीर ठाकूर**

**अकोला** : अकोट तालुक्यातील सातपुड्याच्या पायथ्याशी वसलेल्या गाजीपूर आणि रुदाळी या आदिवासी बहुल भागात बेकायदेशीर खननाने अक्षरशः थैमान घातले असून, जिलेटीन व डिटोनेटरच्या स्फोटांनी डोंगर पोखरले जात असल्याचा गंभीर आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. नरनाळा अभयारण्याच्या लगत असलेल्या या संवेदनशील पट्ट्यात सुरू असलेले अंधाधुंद ब्लास्टिंग पर्यावरण, शेती आणि वन्यजीवांसाठी मोठा धोका ठरत असतानाच आता धरणाच्या सुरक्षिततेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. प्रशासन मात्र या गंभीर प्रकाराकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा संताप व्यक्त होत आहे.गेल्या काही वर्षांत या परिसरात खदानी व स्टोन क्रशर उद्योग झपाट्याने वाढला आहे. आदिवासी बांधवांच्या शेतजमिनी भाडेपट्ट्यावर घेऊन त्यांच्या नावावर खनन परवाने काढण्याचा प्रकार मोठ्या प्रमाणावर सुरू असल्याचे समोर आले आहे. प्रत्यक्षात या व्यवसायामागे गैर-आदिवासींचे जाळे कार्यरत असल्याची चर्चा आहे. शासनाच्या नियमांना हरताळ फासून भूगर्भातील पाणी लागेपर्यंत उत्खनन केले जात असून, कठीण खडक फोडण्यासाठी जिलेटीन आणि डिटोनेटरसारख्या शक्तिशाली स्फोटकांचा सर्रास वापर होत आहे.या स्फोटांमुळे निर्माण होणाऱ्या कंपनांचा फटका थेट शेतकऱ्यांना बसत आहे. अनेकांच्या शेतात मोठमोठे दगड उडून पडत असून जमिनीची सुपीकता झपाट्याने घटत आहे. फळबागांवर धुळीचे जाड थर साचत असल्याने उत्पादनावर मोठा परिणाम झाला आहे. अल्पभूधारक शेतकरी आर्थिक संकटात सापडले असून त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे.


वन्यजीवांवरही या स्फोटांचा गंभीर परिणाम होत आहे. नरनाळा अभयारण्यालगतचा हा भाग असल्याने स्फोटांच्या आवाजामुळे वन्य प्राणी स्थलांतर करत असल्याची भीती व्यक्त होत आहे. पर्यावरणप्रेमींनी याकडे गंभीरतेने लक्ष वेधले असून, हा प्रकार थांबवला नाही तर संपूर्ण जैवविविधतेला धोका निर्माण होईल, असा इशारा दिला आहे.

दरम्यान, या संपूर्ण प्रकारात महसूल, वन व पोलीस प्रशासनाच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणावर स्फोटके वापरून ब्लास्टिंग सुरू असताना संबंधित यंत्रणा निष्क्रिय का, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

काही ठिकाणी परवानग्यांच्या नावाखाली नियमांचे उघड उल्लंघन सुरू असल्याचा आरोपही होत आहे. तर सूर्यास्तानंतर सुद्धा गौण खनिजाचे उत्खनन, त्यावर प्रक्रिया आणि वाहतूक सुरू असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे.

या सर्व पार्श्वभूमीवर बेकायदेशीर खनन, अनियंत्रित ब्लास्टिंग आणि प्रशासनाची निष्क्रियता यामुळे सातपुडा परिसर अक्षरशः विनाशाच्या उंबरठ्यावर उभा राहिला आहे. तातडीने कठोर कारवाई न झाल्यास परिस्थिती हाताबाहेर जाईल, असा इशारा देत स्थानिक नागरिकांनी तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही दिला आहे.

### ■ पोपटखेड-रुदाळी मार्गाची दुर्दशा; मृत्यूचा सापळा



खनिजांनी भरलेले हायवा व ट्रक यांच्या सततच्या अवजड वाहतुकीमुळे पोपटखेड-रुदाळी मार्गाची अक्षरशः चाळणी झाली आहे. रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले असून दुचाकी किंवा चारचाकीने प्रवास करणे धोकादायक ठरत आहे. स्थानिक आदिवासी नागरिकांना रोजच्या प्रवासात जीव मुठीत धरून चालावे लागत आहे. हा मार्ग आता सामान्य नागरिकांसाठी नसून केवळ 'खनिज वाहतुकीसाठीच' उरल्याची संतप्त प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

### ■ धरणाच्या भिंतीवर स्फोटांचा परिणाम; मोठा धोका-


स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार सतत होणाऱ्या स्फोटांच्या कंपनांचा परिणाम परिसरातील धरणाच्या मातीच्या भिंतींवर होत असल्याची भीती व्यक्त केली जात आहे. काही खदानींमध्ये 'शेतीसाठी वापरल्या जाणाऱ्या स्फोटक परवान्याचा गैरवापर करून डोंगर पोखरण्याचे काम' सुरू असल्याचा आरोप आहे. कागदोपत्री पोलीस व महसूल प्रशासनाची परवानगी घेतली जात असली तरी प्रत्यक्षात अनेक अटी-शर्तींचा भंग होत असल्याचे स्पष्ट होत आहे. या अनियंत्रित स्फोटांमुळे धरणाच्या भिंतींच्या मजबुतीवर परिणाम होऊन भविष्यात मोठा अनर्थ ओढवण्याची शक्यता स्थानिकांनी व्यक्त केली आहे.

### ■ आठ टन क्षमतेच्या पुलावर ३५ टनांचा ताण

पोपटखेड-रुदाळी मार्गावरील पुलाची अधिकृत क्षमता केवळ आठ टन असतानाही ३० ते ३५ टन वजनाचे ट्रक आणि हायवा बेधडकपणे धावत असल्याचे उघड झाले आहे. सूचना फलकांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असून, प्रशासनाकडून कोणतीही प्रभावी कारवाई होत नाही. दररोज दीडशे ते दोनशे अवजड वाहने या मार्गावरून जात असल्याची माहिती समोर आली आहे. या अतिवजनी वाहतुकीमुळे पुलाच्या सुरक्षिततेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून मोठा अपघात घडण्याची भीती व्यक्त होत आहे.

# बिल्डर मालूच्या मृत्यूचा फायदा उचलत ५८ लाखांनी फसवणुक

### पाच आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल



**अमरावती/प्रतिनिधीः-**

सुप्रसिद्ध बिल्डर प्रवीण मालू यांच्या आकस्मिक मृत्यूचा फायदा उचलून त्यांच्या सोबत जमीन व्यवहारात केलेल्या इसारकडे दुर्लक्ष करून ही जमीन दुसऱ्याला विकून मालू कुटुंबांना ५८ लाखांनी फसविण्यात आल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणात मालू कुटुंबातील एका महिलेच्या तक्रारीवरून कोतवाली पोलिसांनी आरोपी रवींद्र बबनराव चव्हाण (वय ४६),योगिता अरुण चव्हाण (वय ४१),सारिका विजया चव्हाण (वय ४७), सीमा संजय चव्हाण (वय ५४) व एका अल्पवयीनाविरुद्ध कलम ३१८(४) व ३ (५) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. माहितीनुसार प्रवीण मालू यांचा ७ सप्टेंबर २०२१ रोजी आकस्मिक मृत्यू झाला. मृत्यू पूर्वी त्यांनी रेवसा ग्रामपंचायत अंतर्गत मौजे रेवसा, प्रगणे नांदगाव पेठ गट क्रमांक १८२ सर्वे नंबर ६७/४, भोगवटा वर्ग १ मध्ये एकूण १ हेक्टर १९ आर म्हणजे २ एकर २९ कुंटे, कृषी जमिनीचा सौदा २ कोटी ३० लाख ५६ हजार २५० रुपयांमध्ये चव्हाण कुटुंबीयांसोबत केला होता. ५८ लाख रुपये चव्हाण यांना इसार स्वरूप देण्यात आले होते. दरम्यान यांनतर प्रवीण मालू यांचा मृत्यू झाला. मृत्यूनंतर रवींद्र चव्हाण आणि त्यांच्या कुटुंबीयांनी इसार चे ५८ लाख रुपये हडपून घेतले आणि जमीन गोपाल नारायणराव पनपालीया यांना विकून टाकली. चव्हाण कुटुंबीयांनी मालू परिवाराला ५८ लाखांनी गंडविले. या प्रकरणात कोतवाली पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# अकोला अपर जिल्हाधिकारी गायकवाड यांच्यावर गुन्हा दाखल

## -गिट्टी व दगड खाणी सुरू ठेवण्यासाठी लाचेची मागणी

### -खाण मालक संघटनेचा आरोप

अकोला/प्रतिनिधीः-

अकोला अपर जिल्हाधिकारी प्रमोद गायकवाड यांच्यावर शहरातील एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गिट्टी व दगड खाणी सुरू ठेवण्यासाठी प्रमोद गायकवाड यांनी प्रत्येक महिन्याला लाचेची मागणी केली होती, असा गंभीर आरोप खाण मालक संघटनेने केला. या प्रकरणी पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली होती. या प्रकरणी चौकशी करून नऊ दिवसांनंतर प्रमोद गायकवाड यांच्यावर गुन्हा दाखल केला. या प्रकरणांत संभाषणाची एक ध्वनीफित देखील समाज माध्यमातून प्रसारित झाली. अपर जिल्हाधिकारी प्रमोद गायकवाड यांनी हे आरोप फेटाळले आहेत. एका वरिष्ठ अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल झाल्याने चांगलीच खळबळ उडाली. जिल्ह्यात गौण खनिजाच्या असंख्य खाणी आहेत. या खाणींमधून दगड, गिट्टी, मुरूम काढला जातो. त्यापोटी गौण खनिज विभागाला स्वामित्वधन शुल्क प्राप्त होते. महसूल विभागाकडून गौण खनिज विभागाला वसुलीचे लक्ष्य दिल्या जाते. मार्च महिन्यात स्वामित्व शुल्क वसुलीची लगबग सुरू असतांना खाण मालक संघटनेने



अपर जिल्हाधिकारी प्रमोद गायकवाड यांच्यावर गंभीर आरोप केला आहे. खाणी सुरू ठेवण्यासाठी अपर जिल्हाधिकारी गायकवाड यांनी प्रत्येकी १५ हजार रुपयांची मागणी करून धमकी दिल्याचा आरोप खाण मालकांनी केला. अपर जिल्हाधिकारी प्रमोद गायकवाड यांनी वारंवार भ्रमणध्वनीवरून संपर्क साधला. संघटनेच्या सदस्यांना कार्यालयात बोलावून अपमानित केले. पैशांची मागणी केली. काही ठिकाणी स्वत: जाऊन वसुली देखील केली. सर्व खाणी बंद पाडण्याची धमकी सुद्धा दिली. या प्रकरणात एमआयडीसी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केल्याचे खाण मालक संघटनेकडून सांगण्यात आले. या तक्रारी सोबत पुरावा म्हणून एक ध्वनीफित पोलिसांना देण्यात आली होती. एमआयडीसी पोलीस ठाण्यामध्ये खाण मालकांनी तक्रार दाखल केल्यानंतर ९ दिवसांनंतर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात पोलिसांनी चौकशी केली. त्यानंतर अप.नं. २७०/२०२६ कलम ३०८ (२), ३५१ (१), बीएनएस सह कलम ७ पीसीए नुसार गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणामुळे महसूल विभागात चांगलीच खळबळ माजली आहे. दरम्यान, अपर जिल्हाधिकारी प्रमोद गायकवाड यांनी हे आरोप फेटाळून लावत केवळ स्वामित्वधन शुल्क वसूल करण्याचे प्रयत्न करीत असल्याचे सांगितले. या प्रकरणी सखोल तपास करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

# महामानवाला अभिवादन करण्यासाठी उसळला भीमसागर

### इर्विन चौकात अनुयायांच्या रांगा





अमरावती/प्रतिनिधीः- भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती उत्साह, जल्लोष आणि आनंदाने साजरी करण्यात आली. यानिमित्त इर्विन चौकात मध्यरात्री पासून अनुयायांच्या रांगा लागल्या होत्या. भीमसागर अभिवादन करण्यासाठी उसळला होता. जय भीमच्या घोषणेणे परिसर दुमदुमला होता. आतिशबाजी करण्यात आली. रात्री १२ वाजता भीम सैनिकांनी महामानवला अभिवादन केले. डीजेच्या तालावर युवकांनी जल्लोष साजरा केला. संपूर्ण परिसर निळ्या रंगात न्हावून निघाल्याचे चित्र पाहायला मिळाले. अनेक अनुयायांनी निळ उधळून आनंद उत्सव साजरा केला. पहाटेपासून अभिवादनासाठी अनुयायांच्या मोठ्या रांगा लागल्या होत्या. शहरासह जिल्ह्याच्या विविध भागातून ☞(पान २ वर)

## जिल्हाधिकारी कार्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन



**अमरावती/प्रतिनिधीः-** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त आज (दि.१४) जिल्हाधिकारी कार्यालयात अपर जिल्हाधिकारी गोविंद दानेज यांनी पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे, उपजिल्हाधिकारी महसूल विवेक जाधव, अधिक्षक निलेश खटके, विधी अधिकारी नरेंद्र बोहरा, नाझर विजय सांगळे, अल्पेश हाते तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांनी डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

## विद्युत भवनात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन



**अमरावती/प्रतिनिधीः-**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना विद्युत भवनात अभिवादन करण्यात आले. मुख्य अभियंता अशोक साळुंके यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

तसेच यावेळी विद्युत भवनातील उपस्थित सर्व अधिकारी, अभियंते व कर्मचारी यांनी पुष्प अर्पण करत बाबासाहेब यांना अभिवादन केले.

यावेळी उपविधी अधिकारी प्रशात लहाने, कुमारी शुभांगी डोंगरे, प्रीतेश पाटकर, प्रविण वाट, प्रकाश लेंडे यांच्यासह अधिकारी,अभियंते व कर्मचारी उपस्थित होते.

# परतवाडा प्रकरणातील आरोपीवर कठोर कारवाई करा

### वकील संघाच्या माजी अध्यक्षाच्या नेतृत्वात ठाणेदाराला निवेदन

**परतवाडा/प्रतिनिधीः-**



अल्पवयीन मुलींचे लैंगिक शोषण करून त्यांचे अश्लील व्हिडिओ व्हायरल करणाऱ्या आरोपी अयान अहमद तनवीर अहमद (वय १९) याच्या वर कठोर कारवाई करून प्रकरणाच्या तपासासाठी एसआयटी गठीत करून चौकशी करण्यात यावी अशी मागणी जिल्हा वकील संघाचे माजी अध्यक्ष एड. शब्बीर खान यांच्या नेतृत्वात परतवाडा ठाणेदारांकडे आज मंगळवार १४ एप्रिल रोजी निवेदनातून केली आहे. निवेदनात म्हटले आहे की,हे प्रकरण गंभीर आहे. अल्पवयीन मुलींना प्रेम जाळ्यात ओढून त्यांच्याशी शारीरिक संबंध बनवून त्यांचे व्हिडिओ सोशल मीडियावर वायरल करण्यात आले आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून आरोपी☞(पान २ वर)

# अज्ञात वाहनाच्या धडकेत सायकल स्वार जखमी

### -मार्डी रोडवरील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** अज्ञात वाहनाच्या धडकेत सायकल स्वार जखमी झाल्याची घटना सोमवारी रात्री मार्डी रोडवरील सामाजिक वनीकरण नर्सरी समोर घडली आहे. पुंडलिक गणेश पारनेकर (वय ५५, मासोद) असे अपघातात जखमी झालेल्या इसमाचे नाव आहे. माहितीनुसार पुंडलिक गणेश पारनेकर नेहमी प्रमाणे सोमवारी रात्री ८.३० वाजता सायकलने घरी जात होते. त्यावेळी सामाजिक वनीकरण नर्सरी समोर अज्ञात वाहनाने त्यांना धडक दिली. यामुळे ते जखमी झाले. नागरिकांनी त्यांना जखमी अवस्थेत डॉ.गोडे हॉस्पिटलमध्ये दाखल केले. त्यांच्या डोक्याला मार आहे. त्यांना पुढील उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालय येथे ☞(पान २ वर)

## भारत फायनान्स कंपनीच्या एजंटवरील हल्ला प्रकरण

# पाच आरोपी जेरबंद, एक फरार

**अमरावती/प्रतिनिधीः-** भारत फायनान्स कंपनीच्या एजंटवर हल्ला करून रोख रक्कम व मौल्यवान वस्तूंची लूट करणाऱ्या टोळीचा स्थानिक गुन्हे शाखेने पर्दाफाश केला असून पाच आरोपींना अटक करण्यात आली आहे, तर एक आरोपी अद्याप फरार आहे.



पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी आकाश गोपाळराव पाटणे (रा. गव्हानिपाणी, ता. धामणगाव रेल्वे) हे चांदूर रेल्वे येथील भारत फायनान्स कंपनीत डेली कलेक्शनचे काम करतात. दि. १० एप्रिल २०२६ रोजी ते नांदगाव खंडेश्वर परिसरातून बचत गटाची रक्कम गोळा करून सायंकाळी मोटारसायकलने चांदूर रेल्वेकडे जात असताना एकपाळा ते सावंगी संगम मार्गावरील त्रिवेणी संगम पुलाजवळ तीन अज्ञात इसमांनी त्यांना धक्का देत खाली पाडले. त्यानंतर काठीने मारहाण करून त्यांच्या ताब्यातील १,१०,३२८ रुपये रोख, लिनोवा कंपनीचा टॅब व मोबाईल असा एकूण १,२५,३२८ रुपयांचा मुद्देमाल लुटून आरोपी फरार झाले होते.

या प्रकरणी चांदूर रेल्वे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या दोन पथकांनी तपास सुरू केला. सीसीटीव्ही फुटेज, गोपनीय माहितीदार आणि बचत गट सदस्यांची चौकशी यावरून आरोपींचा माग काढण्यात आला. तपासा ☞(पान २ वर)